# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## दिनांक २०-७-२०१७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

गुरुवार दिनांक २० जुलै २०१७ रोजी (का.प.क्र ४४) मा.महापौर श्री.भगवान (बापू) देविदास घडमोडे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ०२-४५ वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.डी.एम मुगळीकर भाप्रसे, नगर सचिव,श्री डी.डी.सुर्यवंशी संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
२. स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल
३. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
५. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
६. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
७. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
८. स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव
९. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
१०. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
११. स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे
१२. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
१३. स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान
१४. स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे
१५. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१६. स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१७. स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
१८. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
१९. स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
२०. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२१. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
२२. स.स. श्रीमती परवीन खैसर खान
२३. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२४. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल

२५. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२६. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
२७. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२८. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
२९. स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे
३०. स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
३१. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३२. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३३. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३४. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३५. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
३६. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
३७. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
३८. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
३९. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४०. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४१. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
४२. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
४३. स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
४४. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
४५. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
४६. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
४७. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
४८. स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव
४९. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
५०. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
५१. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
५२. स.स.श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
५३. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
५४. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
५५. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
५६. स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
५७. स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत

५८. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
५९. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
६०. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
६१. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
६२. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
६३. स.स.श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे
६४. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
६५. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
६६. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
६७. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
६८. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
६९. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
७०. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
७१. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
७२. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
७३. स.स. श्री.सोहेल शकील शेख
७४. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
७५. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
७६. स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
७७. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
७८. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
७९. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
८०. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
८१. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
८२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
८३. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
८४. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
८५. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
८६. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
८७. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
८८. स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट
८९. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
९०. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे

९१. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
९२. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
९३. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
९४. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
९५. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
९६. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
९७. स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे
९८. स.स.कु.जमादार सायली भागवत

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन

श्री.रेणुकादास वैद्य :मा.सभागृह नेते यांचे वडील स्व.भानुदास मनगटे यांचे दु:खद निधन झाले श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :तसेच अमरनाथ यात्रेकरूवर जो हल्ला झाला त्यात मृत्यू झालेल्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.दिलीप थोरात :अमरनाथ यात्रेकरूची बस दरीत कोसळून ज्यांचा मृत्यू झाला त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :संत गाडगे महाराज यांचे विचाराने प्रभावित झालेले स्व.खंडूजी गायकवाड यांचेही निधन झाले श्रध्दांजली अर्पण करावी.

(यास स.श्री.गजानन बारवाल, श्री.नंदकुमार घोडेले, श्री.इरशाद खान, श्री.मकरंद कुलकर्णी, श्री.प्रमोद राठोड, श्री.दिलीप थोरात, श्री.भाऊसाहेब जगताप यांनी अनुमोदन दिले.)

मा.महापौर :ठिक आहे, आताच नावे सुचविल्यानुसार श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी उभे रहावे.

(या वेळी स्व.भानुदास मनगटे स्व.खंडुजी गायकवाड तसेच अमरनाथ यात्रेत मृत्यू झालेल्यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

या वेळी सभागृहात स.सदस्यांनी सुचना केली त्यानुसार आंतर राष्ट्रीय संचालक या पदावर २२० देशातून डॉ.नवल मालू यांची नियुक्ती झाल्याने त्यांचा सभागृहाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात येतो.यावेळी मा.महापौर व डॉ.मालू यांनी यथोचित भाषण केले.

श्रीमती समीना शेख :मागिल बैठकीत एमआयएम पक्षाच्या सदस्यांचे प्रस्ताव स्थगित ठेवले यापुर्वी असे कधीही झाले नाही.

मा.महापौर :सभागृहात सुचक अनुमोदक नव्हते म्हणून ते प्रस्ताव स्थगित केलेले आहे.

श्री.प्रमोद राठोड :मा.महापौर यांनी निर्णय घेतलेला आहे. त्यांचे निर्णयाचा सन्मान ठेवावा.

(या वेळी डायस समोर जाऊन स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.) ११९२/१

श्री.रेणुकादास वैद्य :१०० कोटी रस्त्यांसाठी शासनाने देऊ केले. ते आणण्यासाठी सर्वच लोकप्रतिनिधी, मा.पालकमंत्री महोदय, मा.खासदार, मा.आमदार तसेच माजी महापौर श्री.त्र्यंबक तुपे असतांना तेंव्हा पासून या सर्वांच्या सहकार्यामूळे तो निधी आला. सर्वाचे अभिनंदन करावे.

मा.महापौर :आताच सुचना केल्यानुसार सर्व लोकप्रतिनिधी मा.पालकमंत्री महोदय, मा.खासदार, मा.आमदार असतील माजी महापौर श्री. तुपे या सर्वांनी व ज्यांनी ज्यांनी हे पैसे आणण्यासाठी प्रयत्न केले. तसेच आपल्या विनंतीला मान देऊन मा.मुख्यमंत्री महोदय, मा.हरीभाऊजी बागडे तसेच प्रदेशाध्यक्ष मा.रावसाहेबजी दानवे व मा.श्री.सुधीर मुनगूंटीवार यांनी यास मंजूरी दिली. या सर्वांचे अभिनंदन करण्यात येते.

**<u>विषय क्रमांक ११२६:-</u>**

शुक्रवार दिनांक १२.०५.२०१७ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-४१) रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>ठराव:-</u>**

शुक्रवार दिनांक १२.०५.२०१७ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-४१) रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ११२७:-</u>** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

श्री.गजानन बारवाल :स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबविले जात आहे. या माध्यमातून शहरात मोठया प्रमाणात टॉयलेट बांधून व त्यासाठी अनुदान देणार होते. सविस्तर माहिती घ्यावी.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :शहर हगणदारी मुक्त करण्याकरीता शासनाने ७००० वैयक्तिक शौचालय करण्याचे टारगेट दिले होते. त्यात वाढ करून आता ८००० टारगेट केले. यासाठी विविध वार्डातून अर्ज मागविण्यात येत असून काम चालू आहे. आतापर्यत ७६३९ लाभार्थी निवड केली ७४०५ लाभार्थीना आरटीजीएसद्वारे ६००० हप्ता दिला तसेच ४००२ लोकांना दुसरा हप्ता ही दिला आहे. अशा प्रकारे ४८२० टॉयलेट तयार झाले आहे.

श्री.अफसर खान :कोणत्या वार्डात टॉयलेट केले? किती खर्च झाला? कोठे केला? सर्व समोर यावे. नुसते कागदावर लिखान ठेवून अंदाजे उत्तर दिले जाते.

श्री.गजानन बारवाल :अनेक वार्डातील संचिका प्रलंबीत आहे. माझे वार्डात शुन्य टॉयलेटचे नियोजन आहे. कुणालाही फायदा मिळत नाही.

श्रीमती संगीता वाघुले:दुसरा हप्ता दिला नाही. २५ टक्केच लोकांना फायदा झाला. बाकी अधिकारी पाठपुरावा करीत नाही.

श्री.अब्दुल नाईकवाडी :कोणत्या वार्डात किती टॉयलेट झाले? किती हप्ता दिला? केंव्हा दिला? ऑनलाईन का केले जात नाही? कोठे काम केले? सर्व सदस्यांना माहिती द्यावी.

श्रीमती माधुरी देशमुख:कामाची प्रगती कशी कशी होते? प्रत्येक बैठकीच्या वेळी समोर यावे. महिला शौचालय बाबत काय कार्यवाही केली? मा.कोर्टाने आदेश देऊनही कार्यवाही होत नाही.

श्री.भाऊसाहेब जगताप:दुसरा हप्ता दिला नाही. त्यामूळे पुढे लोक काम करीत नाही. तसेच नव्याने दाखल सचिंका प्रलंबीत आहे. माझे वार्डातील २५ संचिका परत केल्या. ते नागरीक स्वत: हून बांधत असेल तर बायडींग करू नये. जे स्वत: बांधत असतील त्यांना बांधून द्यावे.

श्रीमती समीना शेख :महिलांसाठी शौचालय बांधणार होते. पुढील कार्यवाही काय? तसा प्रस्ताव मंजूर केला कार्यवाही का होत नाही?

कार्य.अभियंता-्ड्रेनेज :दुसरा हप्ता का दिला नाही? माहिती घेतली जाईल उद्या श्रीमती वाघुले यांचे वार्डात अधिकारी यांना पाठविले जाईल. जेंव्हा काम होते तेंव्हा फोटो काढून ते शासनाच्या वेबसाईटवर अपलोड केले जाते.

श्रीमती संगिता वाघुले :फोटो काढतात तेंव्हा तेथे पत्राचा किंवा प्लायऊडचा दरवाजा असतो. तो चालत नाही असे सांगतात. अडथळा घालण्यासाठी अमुक दरवाजा लावा, अमुकच बांधकाम करा, सिमेंट लावा एवढ्या अटी घालण्याची गरज नाही. दुसरा हप्ता दिला तर अडी अडचणी येणार नाही. दुसरा हप्ता देणेसाठी वर्ष लागते. आरतीनगर मिसारवाडीमध्ये असा प्रकार झालेला आहे.

श्री.चेतन कांबळे :वार्डात ५५० पैकी १०० लोकांना टॉयलेट मंजूर केले. १२ हजार मध्ये टॉयलेट होत नाही. वैयक्तिक शौचालयाचा लाभ घेणेकरीता कर्मचारी पैसेची मागणी करतात.

कार्य.अभियता-ड्रेनेज :वार्ड अधिकारी व त्यांचेकडील एसआय लाभार्थीची यादी करून पाठवितात. ती त्यानंतर आरटीजीएस केली जाते.

श्री.नंदकुमार घोडेले :वार्ड-ब चे अधिकारी श्रीमती खरपे मॅडम मनपात डेप्युटेशनवर अतिरिक्त चार्ज खुलताबादचा पुर्ण वेळ मनपाकडे शासनाचे अधिकारी पाहिजे. श्री.खाटेकर आले ते मेडीकलवर गेले. नवीन अधिकारी आले माहिती दिली जात नाही. काम करण्यास इच्छुक नसेल तर शासनाकडे पाठवावे. वैयक्तिक टॉयलेट देता येतील त्यांना द्यावे अटी शर्ती शिथील कराव्यात. त्यांचे फॉर्म रिजेक्ट होऊ नये. टारगेट पुर्ण करावे.

श्री.सय्यद मतीन :सदस्यांनी पत्र दिल्यानंतर तीन दिवसात उत्तर दिले जावे.

कु.सायली जमादार :नागरीक वार्ड कार्यालयात जातात त्यांना घर इलिगल आहे. या योजनेचा लाभ मिळणार नाही असे सांगण्यात येते. इतरही वार्डात इलिगल घरे आहे त्यांना लाभ दिला जातो.

श्री.अब्दुल मं.नाविद :माझे वार्डातील नागरीकांना पहिला हफ्ता सुध्दा दिला नाही.

श्री.अफसर खान :माझे वार्डात सर्वे केला ते सर्व फॉर्म पाठविले का? दिले नसेल तर वार्ड अधिकारी वर काय कार्यवाही करणार आहे? पहिला टप्प्याची रक्कम सुध्दा दिली नाही.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :वार्ड अधिकारी एसआय व जवान हे खरोखरच जे उघड्यावर शौचालयास जातात. त्यांचा सर्वे करतात.

श्री.अफसर खान :श्री.पैठणे काम करीत नसेल तर कार्यवाही करावी. सर्वे करीत नाही. झालेल्या सर्वेचे फॉर्म सबमिट करीत नाही. कुठे सर्वे केला? कुणाला लाभ दिला? किती रक्कम दिली? सर्व माहिती द्यावी.

मा.महापौर :वैयक्तिक शौचालय संदर्भात आयुक्त किंवा अति.आयुक्त यांचे मार्फत काही आदेश काढले काय?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :ते आदेश वार्ड अभियंताची नियुक्तीचे आहे. फॉर्म सुलभ पध्दतीचा आहे साधा अर्ज आहे.

श्रीमती मुल्ला सलीमा :माझे वार्डात बांधकाम केले. पहिला हप्ता दिला. परंतु पुन्हा कार्यवाही झाली नाही. आता रेल्वे पटरीकडे लोक उघड्यावर शौचास जातात.

श्री.राजू शिंदे :यापुर्वी रु.६३० देण्याची स्कीम आली होती. त्यावेळी लोकांनी ढापे टाकून शौचालय बांधले. त्यांचा वापर ते आता स्नानासाठी करतात. ते पाहून सर्वेला जाणारे सांगतात की, लाभ देता येत नाही. जेथे नाही तेथे जाऊन पाहणी केली पाहिजे. सर्वे मध्ये त्यांचे नाव येत नाही. ज्यांना नव्हते त्यांना मिळाले नाही. हे शहर हगणदारीमुक्त करायचे असेल तर प्रॅक्टीकली काम करावे लागेल. नुसते कागदावर काम होऊ नये.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :७६३९ लोकांना पहिला हप्ता दिला. त्यापैकी १२८४ लोकांनी बांधकाम सुरू केले नाही.

श्री.राजू शिंदे :काही नागरीक पैसे घेऊन बांधकाम करीत नसतील व बाहेर शौचास जात असतील अशा नागरीकांवर कार्यवाही करावी.

कार्य.अभियंता :१०-१२ लोकांवर पोलीसात तक्रारही केली आहे.

श्री.रामेश्वर भादवे :बापूनगर भागात घरे लहान असल्याने ते शौचालय घेत नाही. नाल्यात शौचास जातात. यासाठी काय उपाय करता येईल?

श्री.सय्यद मतीन :ज्या अधिकाऱ्यांनी कामात उशीर केला त्याचेवर काय कार्यवाही करणार आहे?

श्रीमती मनीषा लोखंडे :पहिला हप्ता दिला, परंतु दुसरा हप्ता मिळत नाही.

श्री.मनोज गांगवे :खरपे मॅडमचे सहकार्य मिळत नाही. जन्म प्रमाणपत्र वेळेवर दिले जात नाही. एक नागरीक नॉरमल करेक्शनसाठी १५ दिवसापासून चकरा मारतो. वर्ग-४ चे कर्मचारी श्री.लाहोट काम करतो. त्याचे ते काम नाही. तो सांगतो की, सही पाहिजे असेल तर खुलताबादला खरपे मॅडमकडे जावे लागेल, हे योग्य नाही.

श्री.राहूल सोनवणे :वार्डात शौचालयाचे उद्घाटन केले होते. त्या संस्थेने अद्याप काम सुरू केले नाही. लाभार्थीचे नाव आले, काहींची शौचालये तयार केले. ड्रेनेज लाईनचे काम होत नाही.

श्रीमती ज्योती अभंग :सर्वेला येणारे लोक पैसे मागतात, नसता फॉर्म स्वीकारत नाही.

श्रीमती स्वाती नागरे :माझ्या वार्डात भाजी मंडई जवळ शौचालय बांधावे.

मा.आयुक्त :एकूण ७९९७ टारगेट होते. सन-२०११ च्या जनगणनेनुसार १२ हजार शौचालय करायचे. लाभार्थीची यादी केली. ४५५० शौचालय बांधले, २५०० इतके बांधणे

शिल्लक आहे. टारगेट पेक्षा जास्तीचे बांधू शकतो. पुणे मनपाला १५ हजार टारगेट होते, ४० हजार बांधले. येथे मिळालेला निधी व दिलेले टारगेट नुसार काम चालू आहे. जे अर्ज वॉर्डवॉईज शिल्लक आहे त्याची प्रोसेस करायची. वाढीव शौचालयाचे काम टप्प्याने होईल. जे टारगेट दिले त्यानुसार ३० जुलै पर्यंत काम पुर्ण करायची कार्यवाही चालू आहे. उघडयावर शौचास जाणे विविध कारणे असु शकतात. कम्युनिटी व पब्लीक टॉयलेटसाठी ५५ लक्ष निधी प्राप्त आहे. त्यातून काम केले जाईल. ३५ शौचालय विना वापर पडून त्यांचे दुरूस्तीसाठी अंदाजपत्रक तयार केले. बजेटमध्ये १ कोटीची तरतुदीसाठी पत्र दिले शासनाकडे यासाठी निधी मागविला. ह्या सर्व शौचालय बांधकामासाठी काही स्वंयसेवी संस्था समोर येत आहेत. लायन्स या संस्थेने टॉयलेटचे काम चालू केले आहे. इतर संस्थेने काम हाती घेतले. ज्यांचे अर्ज राहिलेले आहे. जे वैयक्तिक शौचालय बांधण्यास तयार आहे त्या सर्वांचा समावेश होईल. कोणी भ्रष्टाचार करीत असेल पैसे मागत असेल तर कार्यवाही होईल.

श्री.रूपचंद वाघमारे :सर्वे नंबर २१६ मध्ये काही लोकांनी अतिक्रमण केले. ते उघड्यावर शौचास जातात. त्यांचे बाबतीत काय उपाययोजना करणार आहे?

श्री.अफसर खान :श्री.पैठणे यांनी संचिका थांबवून ठेवली. त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे?

मा.आयुक्त :या योजनेचा कालावधी निश्चित करून दिला होता, परंतु लाभार्थी निवड करणे, निधी प्राप्त होणे, पहिला हप्ता वितरीत करणे व लाभार्थी यांनी काम केल्यानंतर तेथील पाहणी होऊन दुसरा हप्ता वितरीत होणे यासाठी वेळ लागतो. बजेट आले त्यानुसार काम केले. माहे जुलै पर्यंत काम झाले नाही तर ऑगस्ट पर्यत काम करण्याचा प्रयत्न होईल.

श्रीमती समीना शेख :महिलासांठीचे शौचालय बांधणे करीता ८ मार्च-२०१६ ही तारीख अंतिम होती काम केले नाही. आता जर कोणी अवमान याचिका दाखल केली तर जबाबदार कोण असणार आहे?

मा.आयुक्त :लवकरात लवकर काम केले जाईल. गट नं.२१६ मधील अतिक्रमण काढले जाईल त्या लोकांना योग्य ठिकाणी स्थायीक करून त्यांना पब्लीक टॉयलेट शासन करून देईल. शौचालय बांधण्याच्या कामात उशीर का होतो? कुणामूळे झाला? याची माहिती घेऊन कार्यवाही होईल.

मा.महापौर :प्रशासनाने दिलेले उत्तर समाधानकारक नाही. महत्वाची योजना आहे. शासनाने दर महिन्याच्या बैठकीला अहवाल मागितला. परंतु दोन ओळीत अहवाल येतो. प्रशासनाने परिपत्रक काढले ते स्वच्छ भारत अभियान संदर्भातच आहे. वार्ड अधिकारी, वार्ड अभियंता व घनकचरा व्यवस्थापन, मुख्यलेखाधिकारी कार्यकारी अभियंता यांनी पार पाडायची कामे त्यात नमूद आहे. मागे सुध्दा या विषयावर चर्चा झाली की, प्रत्येकाने यात लक्ष घालून वॉर्ड वॉईज जाऊन लक्ष दिले पाहिजे. जे-जे या योजनेच्या कामात निष्काळजीपणा करीत असेल त्यांचेवर कार्यवाही करावी. सर्व विभाग प्रमुख यांनी प्रत्येक वॉर्डवॉईज सकाळी ५ ते ८ या वेळात जाऊन जे लाभार्थी यात सहभाग होऊ शकतात. त्याचा सर्वे करावा. ज्यांना लाभ

देता येईल तो द्यावा. इतर सर्व कार्यवाही ही योजना पुर्ण होईपर्यत या टीमने करावी. सर्व स.सदस्य व स.पदाधिकारी यांनीही सहकार्य करावे. ही मोहिम पुर्णपणे यशस्वी होणेसाठी कार्यवाही करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :खरपे मॅडमचा खुलासा करावा.

उपआयुक्त-आस्थापना:श्रीमती खरपे ह्या दिनांक २०.०२.२०१७ पासून रजेवर होत्या. १९ मे २०१७ रोजी शासनाकडून आदेश प्राप्त झाला की, श्रीमती खरपे यांचेकडे खुलताबाद येथील नगरपरिषदेचा अति.कार्यभार देण्यात येतो. त्यानंतर त्या १२ जून रोजी रूजू झाल्या. आता दोन्ही कारभार पाहत आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :शासनाने तसे आदेश काढले असा चार्ज देता का? येतो शासनाला कळवायला पाहिजे होते.

उपआयुक्त-आस्थापना:शासनाकडे पत्र व्यवहारासाठी कार्यवाही होत आहे. श्री.खाटेकर हे वैद्यकीय रजेवर गेले त्या बाबतीत मा. आयुक्त यांनी त्याची मेडीकल रजा तपासणीचे आदेश केले. ते आजारी नसतील तर त्यांनी रूजू व्हावे. नसता कार्यवाही करावी असे आदेशीत केले आहे.

श्रीमती सुरेखा सानप :वार्ड अधिकारी यांनी एकाच्या नावाने रजिस्ट्री झालेली असतांना पुर्वीच्याच व्यक्तीच्या नावाने टॅक्स पावती दिली जात आहे.

मा.आयुक्त :याची चौकशी केली जाईल.

श्रीमती माधुरी देशमुख:महिलांसाठीचे जेथे शौचालय करायचे होते.तेथील जागा का बदलली जात आहे?

कार्य.अभियंता :पाच ठिकाणी प्रस्तावित केले होते. एन-८ येथे मनपाची जागा असल्याने काम सुरू केले. आरसीसी काम चालू आहे. दुसरे एसबी कॉलेजच्या बाजूला नाल्यावर काम सुरू केले होते, परंतु ती जागा त्यांचे मालकीची असल्याने ॲड. गंगापूरवाला यांनी नोटीस दिली त्याची भेट घेतली. ट्रस्टचे जे प्रमुख आहे त्यांना भेटलो व त्यांचे म्हणणे की, एस बी संस्थेच्या सौजन्याने व मनपाच्या संयुक्त विद्यमाने असे त्यावर नमूद करावे. मागणी केली त्यास मा.आयुक्तांनी मंजूरी दिली. आता ते काम लवकरच सुरू होईल. तिसरे शौचालय ज्यूब्लीपार्क भागात पाण्याच्या टाकीजवळ सुरू केले होते तेथील काही नागरीकांनी अक्षेप घेतला म्हणून आता पर्यायी जागा टाऊन हॉल भागात आहे. त्याची मान्यता घेऊन कार्यवाही होईल.

**<u>ठरावः-</u>**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ११२८:-</u>** **(कार्यकारी अभियंता जलनिःस्सारण प्रकल्प)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र व राज्य शासन अनुदानातून शहरातील विविध भागात मल-जल प्रक्रिया केंद्र बांधणे व मलनिःस्सारण वाहिन्या टाकणे करीता र.रु.३६५.६९ कोटीचा प्रकल्प प्रस्ताव राज्य शासनामार्फत लहान व मध्यम शहराच्या पायाभूत सोयी-सुविधांचा विकास कार्यक्रम (UISSDMT) या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडे मंजुरीस्तव सादर करण्यात आलेला होता. सदरील

प्रस्तावास केंद्र शासनाने शहरी विकास मंत्रालयाचे पत्र क्रमांक/के/१४०११/१५/२०१३-युडी-१ दिनांक २४ डिसेंबर २०१३ च्या Office Memorandum नूसार मंजुरी प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पासाठी रितसर निविदा कार्यवाही अंती मा.स्थायी समिती ठराव क्रमांक-२३१ दिनांक २९.०४.२०१४ च्या मंजुरी अन्वये मे.खिल्लारी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. आणि घारपुरे इंजिनिअरींग ॲण्ड कन्स्ट्रक्शन प्रा.लि.(जे.व्ही) यांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.७८% जास्त दराने (योजनेची दरसूची सन २०१२-१३ नूसार काम प्रदान करण्यात आले आहे. निविदा अंतिम करण्याचे वेळी लागू असलेली दरसूची सन २०१३-१४ नुसार तुलना केली असता, हे दर अ.प.दरापेक्षा केवळ २.१८ % एवढे जास्त आहेत.

सदरील प्रकल्पासंदर्भात प्रत्यक्ष काम करतांना येणाऱ्या अडचणी व बदलांसंदर्भात सविस्तर प्रस्ताव सादर करून दिनांक ३०.११.२०१६ च्या मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर असून ७०% काम पुर्ण झाले आहे.

या योजनेअंतर्गत पुर्व नियोजनानूसार व सविस्तर प्रकल्प अहवालानूसार (DPR) रेल्वेपुलाच्या खालून पाच ठिकाणी जलनि:स्सारण वाहिनी टाकण्याचे नियोजन होते. त्यामुळे पुर्वी अस्तित्वात असलेल्या जलनि:स्सारण वाहिनीच्या ठिकाणी जुनी नादुरूस्त जलनि:स्सारण वाहिनी काढून त्याठिकाणी नवीन अधिक व्यासाची जलनि:स्सारण वाहिनी टाकण्याचे प्रयोजन होते. मात्र याबाबत रेल्वे खात्याशी पत्रव्यवहार केला असता रेल्वेखात्याने कळविले की, रेल्वे कार्यालयाने सुरक्षिततेच्या कारणास्तव रेल्वे पुला खालून खोदकाम करून जलनि:स्सारण वाहिनी टाकण्यास प्रतिबंध केल्याने रेल्वे पुलाच्या खालून जलनि:स्सारण वाहिनी टाकणे ऐवजी रेल्वेलाईनच्या खालून (Below Track) Trench Less Technology द्वारे जलनि:स्सारण वाहिनी टाकावी लागणार आहे. त्यासाठी रेल्वेखात्याने Way Leave Charges तसेच Planning & Design Charges म्हणून एकूण र.रु.६४.६१ लक्षचा भरणा सिनिअर मॅनेजर, सिनिअर डिव्हीजन दक्षिण रेल्वे नांदेड यांच्या नावे करणे बाबत पत्र दिले होते. त्यानूसार सदर रक्कम रु.६४.६१ लक्ष भरणा रेल्वे खात्याकडे करण्यात आला आहे. या शिवाय रेल्वेच्या सुचनेनुसार अस्तित्वातील पुलाखालून जलनि:स्सारण वाहिनी न टाकता ती रेल्वे ट्रॅक खालून Trenchless Technologhy द्वारे रेल्वे विभागाच्या Dy.Chief Engineer (Bridges) Railway यांच्या सुचनेनुसार टाकण्यात येणार होती व त्यासाठी रु.३.५० कोटी एवढा व वरील परिच्छेदात नमुद रु.६४.६१ लक्ष असा एकूण रु.४.१४ कोटीचा खर्च रेल्वे विभागाच्या सुचनेनूसार नव्याने करावा लागणार होता. व तसा प्रस्ताव यासंदर्भाने यापुर्वी मा.सर्वसाधारण सभा दिनांक ३०.११.२०१६ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. परंतु यानंतर रेल्वे विभागाने GAD मंजुरी देतेवेळी यात बदल केला आहे. पुर्वी रेल्वे विभागाच्या सुचनेनूसार रेल्वेस्ट्रॅकची रुंदी दोन्ही बाजूस ६ मीटर अंतरापर्यंत गृहीत धरून ट्रॅंचलेस टेक्नॉलॉजी द्वारे काम करण्याचे सुचविले होते. मात्र अंतिम मंजुरी देतेवेळी त्यांनी त्यात बदल करून ज्या हद्दीपर्यंत रेल्वे विभागाची जाग आहे. त्या रुंदी एवढ्या लांबीमध्ये वरील पध्दती वापरून काम करावे लागणार आहे.यामध्ये Micro Tunneling व Manaual Jacking Pushing Method पध्दत वापरण्यात येणार आहे. त्यासाठी एकूण ०५ रेल्वे क्रॉसींगच्या ठिकाणी बृहन्मुंबई महापालिका यांच्या उपलब्ध दरसुची सन-२०१३ नुसार व Indian Standard Trechless (SOR-२०१७) मजिप्रा दरसुची २०१५-१६ पुणे मनपा पा.पु. दरसुची २०१६ व दरसुचीमध्ये उपलब्ध नसलेल्या तथापि या कामासाठी आवश्यक असलेल्या बाबींसाठी बाजार भावानूसार दर घेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून यासाठी सुधारीत रुपये ७,८८,२६,३८५/- एवढा खर्च येणार आहे. आतापर्यंत वरील परिच्छेदात नमुद

केल्याप्रमाणे रेल्वे विभागाकडे कार्यालयीन शुल्क म्हणुन रुपये ८२,२४,८६२/- व आता त्यांच्या सुचनेप्रमाणे अंदाजपत्रकात बदल झाल्याने Way leave Charges मधील फरकापोटी रुपये ३,१९,२७४/- भरावे लागणार असून सदर रक्कम गृहीत धरता रेल्वे रुळाखालून जलनि:स्सारण वाहिनी टाकण्यासाठी त्यांचे कार्यालयीन शुल्क म्हणुन एकूण रुपये ८५,४४,१३६/- एवढी रक्कम भरणा करावी लागत आहे. या योजनेतील विविध कामांसाठी द्यावयाचे सेवा शुल्क व थर्ड पार्टी इन्सपेक्शन इत्यादी कामासाठी लागणाऱ्या सेवा शुल्काची रक्कम या योजनेसाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या व बँकेत जमा केलेल्या अनुदानाच्या रकमेवरील व्याजाच्या रकमेतून करणे बाबत महाराष्ट्र शासनाने शासन परिपत्रक संकीर्ण ३४१६प्र.क्र.-४०/नवि-४ दिनांक २७ मे २०१६ नुसार अनुज्ञेय केले आहे. त्यानुसार विविध शासकीय कार्यालयाकडे या योजनेच्या कामासाठी लागणारी सेवा शुल्काची रक्कम भरणा करण्यात येणार आहे.

वर उल्लेख केल्यानुसार रेल्वे विभागाचे धोरण बदलल्याने व त्यांनी अंतिमतः दिलेल्या मान्यतेमध्ये (GAD Drwaing) बदल झाल्याने व सदरचे काम त्यांच्या सुचनेनुसार करणे अपरिहार्य असल्याने हा खर्च करणे आवश्यक आहे. सदरची बाब अतिरीक्त ठरणार असून औरंगाबाद शहर भुमिगत गटार योजनेचे काम या ठिकाणचे काम करण्यासाठी इतर पर्याय उपलब्ध नसल्याने करणे गरजेचे आहे. हा अतिरीक्त खर्च या योजनेअंतर्गत होणाऱ्या इतर बाबींतून होणाऱ्या बचतीमधून होणार असल्याने कोणताही वाढीव खर्च या योजनेवर करावा लागणार नाही. सदरचे अतिरीक्त बाबींचे होणारे हे काम करणे बाबत या कामाचे मुळ कंत्राटदार मे.खिल्लारी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व घारपुरे इंजिनियरींग (जे.व्ही.) यांना विचारणा केली असता, त्यांनी सदरचे काम प्रस्तावीत अंदाजपत्रकाच्या खर्चात करणे बाबत संमती दर्शविली आहे. तरी उपरोक्त नमुद प्रमाणे रेल्वे लाईन खालून मुख्य जलनि:स्सारण वाहिनी टाकण्यासाठी येणाऱ्या खर्च ७,८८,२६,३८५/- अतिरीक्त बाब म्हणुन मान्यता देण्याचा व सदरचे काम याकामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाच्या दरात योजनेचे मुळ कंत्राटदार यांचेकडून करून घेण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

श्री.राजगौरव वानखेडे :अंदाजपत्रकीय रक्कमेला मंजुरी व त्याच ठेकेदाराला काम द्यायचे असा प्रस्ताव आहे, तर स्थायी समितीकडे हा प्रस्ताव यायला पाहिजे होता. आता रेल्वे क्रॉसींगच्या ठिकाणी लाईन टाकायची असे सांगता तर डीपीआर मध्ये हे नमूद का नव्हते?

श्री.रेणुकादास वैद्य :हा विषय एक्स्ट्रा ॲटमचा आहे. स्थायी समितीला यायला पाहिजे होता. खुलासा होणे अपेक्षीत आहे.

मा.आयुक्त :जो प्रश्न उपस्थित केला,उत्तर प्रस्तावात शेवटी आहे. त्यांनी सदरचे काम प्रस्तावीत अंदाजपत्रकाच्या खर्चात करणे बाबत संमती दर्शविली आहे. तरी उपरोक्त नमुद प्रमाणे रेल्वे लाईन खालुन मुख्य जलनि:स्सारण वाहिनी टाकण्यासाठी येणाऱ्या खर्च अमुक अमुक अतिरिक्त बाब म्हणुन मान्यता देण्याचा व सदरच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाच्या दरात योजनेचे मुळ कंत्राटदार यांचेकडून करून घेण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव.

श्री.राजगौरव वानखेडे :डीपीआर काय होता? चेंजेस का करत आहोत?

मा.आयुक्त :प्रस्तावात आहे. या योजनेअंतर्गत पुर्व नियोजनानूसार व सविस्तर प्रकल्प अहवालानुसार डीपीआर रेल्वे पुलाच्या खालून पाच ठिकाणी जलनि:स्सारण

वाहिनी टाकण्याचे नियोजन होते. त्यामूळे पुर्वी अस्तित्वात असलेल्या जलनि:स्सारण वाहिनीच्या ठिकाणी जुनी नादुरूस्त जलनि:स्सारण वाहिनी काढुन त्या ठिकाणी नवीन अधिक व्यासाची जलनि:स्सारण वाहिनी टाकण्याचे प्रयोजन होते. मात्र या बाबत रेल्वे खात्याशी पत्रव्यवहार केला असता रेल्वेखात्याने कळविले की, रेल्वे कार्यालयाने सुरक्षितेच्या कारणास्तव रेल्वे पुलाखालून खोदकाम करून जलनि:स्सारण वाहिनी टाकण्यास प्रतिबंध केल्याने हे करीत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :डीपीआर तयार करण्या अगोदर हे पीएमसीला लक्षात आले नाही का? त्यावेळी पीएमसीने का नमूद केले नाही? त्याच एजन्सीला हे काम का द्यायचे? वेगळे टेंडर काढावे.

श्री.रेणुकादास वैद्य :पीएमसीने डीपीआर मध्ये का नमूद केले नव्हते? रेल्वे क्रॉसींग त्यावेळीही होती.

श्रीमती समीना शेख :प्लॅनींग आणि डिझाईन करण्याचे काम पीएमसीचे होते.

श्री.राजू शिंदे :पीएमसीने या कामासाठी ३.७४ कोटीचे अंदाजपत्रक दिले होते. पीएमसीला कमीशन देतो. डीपीआर तयार करतांना ही लाईन कोठून टाकावी लागणार? रेल्वे विभागाची परवानगीची आवश्यकता आहे की नाही? हे लक्षात का आले नाही? आता मुळ रक्कमेच्या डबल वाढ सुचविली. मी प्रश्न उपस्थित केले त्यानंतर दिनांक १४.०६.२०१७ रोजी आयुक्तांना पत्र दिले. त्यांचे उत्तर दिले नाही. ते बाजूला ठेवून पुन्हा विषय समोर येतो. हे योग्य वाटत नाही. ३ कोटीच्या ठिकाणी आठ कोटी वाढीव लागणार असेल हे योग्य नाही. असे होत असेल तर पीएमसी कशासाठी होती? प्रस्तावात जे दिले ते आमच्या प्रश्नाचे उत्तर होऊ शकत नाही. प्रशासनाच्या वतीने महापालिकाचे आर्थीक नुकसान करण्याचे धोरण आहे. त्यास आमचा विरोध आहे. कोणत्याही प्रकारचा वाढीव खर्च मनपाने न करता तो पीएमसीने द्यावे तो खर्च वसुली करावा.

श्री.नंदकुमार घोडेले :सुधारीत अंदाजपत्रक देखभाल दुरूस्ती तसेच या प्रस्तावानुसार ३ कोटीचे ८ कोटी असे वाढीव खर्चाचे प्रस्ताव आणून सभागृहाची दिशाभुल केली जाते. या एजन्सीचे ऑडीट करण्याचे आदेशीत केले अहवाल नाही. या एजन्सीची ३० जुन ही मुदत होती. अद्यापही काम पुर्ण नाही. आणखी दोन वर्ष लागू शकतात. एजन्सीचे बील थांबविण्याचे आदेशीत केले. बील दिले जाते. ज्या अटी शर्ती असतील त्यानुसार कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. मागिल वेळेस समिती गठीत केली. अहवाल घ्यावा तोपर्यत देयक देऊ नये. अर्धवट कामे पुर्ण करुन घ्यावे. कांचनवाडीपर्यतच्या एसटीपी पर्यत रॉ-वॉटर जायला पाहिजे. ते गेले नाही. उपवाहिनी जोडल्या नाही.

श्रीमती समीना शेख :खिल्लारी एजन्सीला १८८ कोटी, पीएमसीला ४.३५ कोटी दिले. कोणतेही काम व्यवस्थीत नाही. एजन्सीच्या नावाखाली ही योजना चालते. त्यांचे काम करणारे ठेकेदार शहरातीलच आहे. ठेकेदाराचे हित बघून अधिकारी काम करतात.

श्री.राजगौरव वानखेडे :रेल्वे विभागाचे काय धोरण बदलले? त्यामूळे एवढा खर्च करावा लागत आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :हा प्रस्ताव मंजूर करू नये. स्थगित ठेवावे. चौकशी व्हावी. अहवाल घ्यावा त्यानंतरच योग्य काम असेल तर बील द्यावे. यावर चर्चा करण्यासाठी विशेष सभा घ्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :अनेक वेळा सभागृहात यावर चर्चा झाली, मुद्दे मांडले, प्रशासन कार्यवाही करीत नाही. आमच्या मुद्दे नुसार आयुक्तांनी एजन्सी पीएमसी व अधिकारी यांची बैठक घ्यायला पाहिजे. जे लोकहिताचे नाही, चुकीचे काम करीत असेल तर थांबवावे. अनेक सदस्यांनी लेखी तक्रारी केल्या, अनेकदा देयक देऊ नये असे सांगितले असतांना बील दिले. कार्यवाही करणार नसेल. एजन्सीचे चांगले काम असेल तर तसेही आयुक्तांनी सांगावे.

श्री.प्रमोद राठोड :कार्यकारी अभियंता, व उपअभियंता हे दोन्ही चार्ज श्री.अफसर सिध्दीकी यांचेकडे जे प्रश्न केले त्यांचा खुलासा करण्याचे आदेशीत करावे.

मा.आयुक्त :भुमिगत गटार योजनेचे काम चांगले की वाईट आहे? तसेच फायनॅनशीयल चुक झाली की नाही ते त्यावर नंतर येऊ. या प्रस्तावानुसार रेल्वेलाईन खालून मलनिःस्सारण वाहिनी टाकायची आणि ती टाकल्याशिवाय प्रकल्प पुर्ण होणार नाही.

श्री.अफसर खान :हा प्रस्ताव कुणी आणला? व नमूद केले अधिकारी यांनी सादर केले. आयुक्तांची नुसती सही घेतली. पीएमसी एजन्सीला अधिकारी नेहमीच पाठींशी घालत आहे. हे योग्य नाही. ३ कोटीचे काम वाढीव होऊन ८ कोटीकडे कसे जाते? अधिकारी मनपाचे हिताचे की खिल्लारीचे काम करतात.

श्री.रेणुकादास वैद्य :ही लाईन टाकली नाही तर प्रकल्प पुर्ण होणार नाही असे म्हटले, परंतु असे भाष्य करणे योग्य नाही. असे बोलून ठराव मंजूरीस सक्ती घातल्या सारखे होते.

श्री.राजगौरव वानखेडे :डीपीआर तयार करतांना त्या विभागाशी पुर्वीच चर्चा करून कार्यवाही करणे पीएमसीचे काम होते. आता बदल करून वाढीव खर्च होतो. नागरीकांच्या माथी हा भुर्दंड पडणार. वाढीव खर्च एजन्सी पीएमसीच्या माथी मारावा, त्यांच्याकडून वसुल करावा. ४२ कोटी सिव्हरेज कर वसुल करतो तो यासाठी वापरला जातो कुठे खर्च केले?

मा.आयुक्त :सामान्य नागरीकांवर कोणताच भुर्दंड पडणार नाही.

श्री.अफसर खान :स्थगिती द्यावी, पीएमसीला बोलवावे, माहिती घ्यावी. वाढीव खर्च पीएमसीकडून वसूल करावा.

श्री.नंदकुमार घोडेले :स्थगिती देण्यात यावी. विशेष बैठक यावर लावावी.

श्री.राजू शिंदे :एजन्सीच्या पाठीमागे प्रशासन असे वाटते. हे करावेच लागेल असे प्रशासन सांगत असेल तर चुकीचे होत असेल तरी मंजूर करायचे का? चुक होत असेल तर सांगावे लागेल. अनेक ठिकाणी चुका केल्या, एसटीपी बदल केले, लाईन बदलल्या, चेंबर नाल्याच्या मधोमध केले, टेक्नीकली आम्हाला कळते तर प्रशासनाला या गोष्टी का लक्षात येत नाही? १०-१५ % वाढ झाली असती तर समजू शकलो असतो. परंतु ५५ टक्के वाढीव खर्च होत आहे. रेल्वे विभागाची, एअरपोर्टची एनओसी, झु-ऑथर्टीची परवानगी अगोदरच का घेतली नाही? वाढीव

खर्च सुचवितात. डीपीआर करतांना हे लक्षात का आले नाही? प्रशासनाला योग्य वाटत असेल तर करावे. आमचा यात सहभाग असणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :जे कामात बदल केले त्यास राज्य व केंद्र शासनाची परवानगी नाही. सर्व बदल येथेच प्रशासनाने केले. याची चौकशी नक्कीच होणार आहे. जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही होईल. सदस्यांवरही कार्यवाही होऊ शकते. जळगावला जो प्रकार झाला ती प्रचिती येथे होईल. जे-जे बदल केले त्या बाबत शासनाकडे पाठविण्याची गरज. शासनाने मंजूरी दिली तरच हे करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :डीपीआर मध्ये बदल केला तर योजनेचे काम पुर्ण करणे योग्य नाही असा पवई आयआयटी संस्थेचा रिपोर्ट आहे. तरीही बदल होत आहे.

श्री.राजू शिंदे :मागिल बैठकीत आपण या योजनेची चौकशी करण्यासाठी समिती नेमली. तरी पुन्हा असे प्रस्ताव येतात. हा भुमिगत भ्रष्टाचार असून दिसणार नाही. डीपीआर नुसार १३६ एमएलडीची एसटीपी आहे. ती १६२ कशी होऊ शकते? या सर्व योजेनेच्या कामाची चौकशी व्हावी तोपर्यंत पीएमसी एजन्सी यांना बील देऊ नये. अर्धवट राहीलेली कामे करून घ्यावे.

श्रीमती समीना शेख :जे कामात बदल केले व बील देण्यात आले त्यास शासनाची मंजूरी नाही.

श्री.प्रमोद राठोड :डीपीआर मध्ये नसतांना ते बदल केले वाढीव खर्च होत आहे. त्याची कार्योत्तर मान्यता घेण्यात आली. टेक्नीकली माहिती देत नसाल व कार्योत्तर मान्यतेसाठी आणत असाल तर योग्य नाही. अधिकारी अनेक वर्षापासून त्या विभागात काम करतात व चुकीच्या पध्दतीने प्रस्ताव सादर करीत असेल व वेळ वाया घालत असेल तर योग्य नाही. मागिल बैठकीत समिती नेमली होती, समितीचा अहवाल सात दिवसात घ्यावा. टेक्नीकल अधिकारी समितीमध्ये असावा. एकाच अधिकाऱ्याकडे दोन चार्ज, सादर करणारे तेच व अंतिम करणारे तेच अधिकारी हे योग्य नाही.

श्री.भाऊसाहेब जगताप :डीपीआर केला तेंव्हा रेल्वे क्रॉसींग होते. त्यावेळीच हा खर्च नमूद असायला पाहिजे होता. पीएमसीचे प्लॅनींग नाही. चूक झाली चौकशी करावी, पीएमसीला बील देऊ नये.

श्रीमती समीना शेख :या योजनेचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन सुध्दा झाले होते. त्यावेळी काही त्रुटी आढळून आल्या का? पीएमसीच्या प्लॅनींग व डिझाईनमध्ये अनेक त्रुटी आहे.

श्री.राजू शिंदे :जे व्याज येईल त्यातून पैसे देणार असे म्हटले. परंतु त्यातून इतर कामे करता आले असते. मनपाकडे पैसे नाही. विकास कामासाठी कर्ज काढावे लागत आहे व्याजाची रक्कम ठेकेदाराची भरपाईसाठी नाही. या योजनेच्या सर्व कामाचे नियोजन करायला पाहिजे होते.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :हा खर्च अतर्गत ॲटम मध्ये बचत होणार त्यातून देणार आहे. खोदाईच्या कामात १०.९० कोटीची बचत आहे.

(या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.राजगौरव वानखेडे :बचत जनतेच्या कामासाठी होणार आहे. ठेकेदारास देणेसाठी नव्हे. हा ठराव रद्द करावा. वाढीव खर्च हा पीएमसीच्या खर्चातून करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :व्याजावर ठेकेदाराचे पैसे देणार व १०० कोटी कर्ज काढणार हे योग्य नाही.

श्री.अफसर खान :स्थगिती द्यावी, चौकशी करावी.

श्री.दिलीप थोरात :हे काम करण्याची गरज आहे. तशी सुचना देऊन जी चूक झाली, त्या बाबत चौकशी करावी. आपल्या निर्णयाचा ते मा.कोर्टाचा आधार घेऊन हे काम प्रलंबीत ठेवतील, चालू असलेले काम थांबवू नये.

श्री.राजगौरव वानखेडे :पीएमसीच्या चुकीमूळे नागरीकांवर बोजा का टाकायचा? हे योग्य नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :मनपाचे नुकसान करून हे काम पुर्ण करणार असेल तर आमचा विरोध आहे.

श्री.प्रमोद राठोड :मा.श्री.रामनाथ कोविंद हे राष्ट्रपती पदी निवडूण आले त्यांचे अभिनंदन करावे.

मा.महापौर :मा.श्री.रामनाथ कोविंद यांची राष्ट्रपती पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते.

श्री.नंदकुमार घोडेले :हा भुमीगतचा प्रस्ताव रद्द करावा. चौकशीचा अहवाल येऊ द्यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रस्ताव रद्द करावा. या योजनेच्या कामाविषयी स्थायी समितीत चर्चा झाली. ऑडीट करण्याच्या सुचना दिल्या तो रिपोर्ट येऊ द्यावा. काम योग्य असेल तर हरकत नाही. जर चुकीच्या पध्दतीने प्रशासन गुत्तेदाराचे घर भरणार असेल तर आमचा विरोध आहे. जबरदस्तीने मंजूर करू नये, नसता या विषयावर मतदान घ्यावे.

श्री.सचिन खैरे :किती टक्के काम केले? त्याची माहिती घ्यावी.

मा.महापौर :या कामामध्ये अनेक त्रुटी, सभागृहात अनेकदा चर्चा झाली अनेक चुका पीएमसी एजन्सीने केल्या कार्यवाही होत नाही. हा प्रस्ताव मंजूर केला नाही तर पुढे काम थांबेल. परंतु रॅमकी, समांतर, एलईडी असेल या एजन्सीच्या बाबतीत चर्चा झाली व त्या एजन्सी मा.कोर्टात प्रकरण गेले त्यामूळे काम थांबले.

श्री.रेणुकादास वैद्य :हा प्रस्ताव मंजूर करु नये. जबरदस्तीने मंजूर करणार असेल तर मतदान घ्यावे.

श्री.अफसर खान :यांचे विरोधात आम्ही मा.कोर्टात दाद मागवू की, यांनी मनपाची फसवणूक केली व भ्रष्टाचार केला.

श्री.राजगौरव वानखेडे :एजन्सीला प्रशासनामूळे अडचणी आलेल्या आहे.

श्री.राजू शिंदे :सभागृहाची भावना लक्षात घेऊन निर्णय घ्यावा.

मा.महापौर :अनेक वेळा एजन्सी मा.न्यायालयात गेल्याने काम थांबले व यामूळे दुसरे एजन्सीस येण्यास तयार होणार नाही. एजन्सीच्या कामाची चौकशी व्हावी. त्याचे ऑडीट व्हावे कामात त्रुट्या असेल तर पीएमसी एजन्सीला माफ करू नये. मागील बैठकीत समिती नेमली त्या समितीने ७ दिवसात अहवाल द्यावा. त्यानंतर पुन्हा हा प्रस्ताव आणावा असे आदेशीत करण्यात येते.

श्री.राजू शिंदे :ज्या एजन्सी कोर्टात गेल्या प्रशासनाच्या चुकीमूळे गेलेल्या आहे. सभागृहाच्या चुकीमूळे नाही. ज्या सुचना सभागृहाने दिल्या त्या पाळल्या गेल्या नाही.

**<u>ठराव:-</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार अनेक वेळा एजन्सी मा.न्यायालयात गेल्याने काम थांबले व यामूळे दुसरे एजन्सीस येण्यास तयार होणार नाही. एजन्सीच्या कामाची चौकशी व्हावी. त्याचे ऑडीट

व्हावे कामात त्रुट्या असेल तर पीएमसी एजन्सीला माफ करू नये समिती नेमली त्या समितीने ७ दिवसात अहवाल द्यावा. त्यानंतर पुन्हा हा प्रस्ताव सादर करावा.

**विषय क्रमांक ११२९:-** **(कार्यकारी अभियंता जलनि:स्सारण प्रकल्प)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११०, गारखेडा भागात डी-मार्ट या मॉल जवळून वाहणाऱ्या नाल्यातून मुख्य जलनि:सारण वाहिनीचे काम करण्यात येत आहे. त्यासाठी सदर ठिकाणी असलेला जुना पाईप कल्व्हर्ट तोडणे आवश्यक झाले आहे. या पुलाच्या दक्षिण बाजुला मोठ्या प्रमाणावर नागरी वसाहत विकसीत झालेली असून त्या वसाहतीसाठी हा रस्ता महत्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. त्यामुळे जलनि:सारण वाहिनीचे काम झाल्यानंतर येथे आर.सी.सी. कल्व्हर्ट बांधणे आवश्यक आहे.

या बाबत वॉर्डाच्या स.नगरसेवीका यांनी प्रशासनास विनंती केली असता, यासाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक सादर करणे बाबत औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजनेचे प्रकल्प व्यवस्थापक मे.फोट्रेस इन्फा.ॲड सर्व्हीसेस यांना आदेशीत केले असता त्यांनी मजीप्रा दरसूची सन २०१३-१४ व सन २०१५-१६ नुसार या कामाचे अंदाजपत्रक सादर केले आहे. सदर कामाचा मुळ प्रकल्प अहवालामध्ये व अंदाजपत्रकामध्ये समावेश नाही. परंतू या वॉर्डाचे स.नगरसेवक यांनी वर नमूद प्रमाणे वस्तूस्थिती असल्याने हे काम विशेष बाब म्हणून औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजनेच्या कामातून करणे बाबत विनंती केली आहे.

सदरचे काम करणे आवश्यक असून यासाठी एकूण ३२,१७,७४५/- एवढा खर्च अपेक्षित असून सदर कामे औरंगाबाद शहर भुमिगत गटार योजनेत समाविष्ठ करून योजनेतील अनुदानातून विशेष बाब म्हणून खर्च करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

श्री.प्रमोद राठोड :या प्रमाणे स.सदस्या श्रीमती मुंढे ताई यांचे वार्डाचा प्रश्न आहे ते सुध्दा काम याच पध्दतीने करावे.

मा.महापौर :वार्ड ९१ मध्ये अशीच परीस्थिती असेल तर तेही काम करावे. हा विषय मंजूर

श्रीमती सिमा चक्रनारायण:काबरानगर भागात मुख्य नाल्यावर अतिक्रमण असल्याने भुमिगत योजनेचे काम थांबले. तेथे बाजूला शाळा, पुलावरून पाणी जाते मुलांना जाता येत नाही.

श्री.मकरंद कुलकर्णी :बोटॅनीकल गार्डन समोर पाणी साचते ते सुध्दा काम करण्याबाबत प्रस्ताव भुमीगत योजनेकडे दिले.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यांनी पाहणी करावी काम करणेबाबत कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११०, गारखेडा भागात डी-मार्ट या मॉल जवळून वाहणाऱ्या नाल्यातून मुख्य जलनि:सारण वाहिनीच्या कामाच्या ठिकाणी आरसीसी कलव्हर्ट करण्याकरीता व इतर कामासाठी र.रु.३२,१७,७४५/- खर्च औरंगाबाद शहर भुमिगत गटार योजनेत समाविष्ठ करून योजनेतील अनुदानातून विशेष बाब म्हणून खर्च करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :खालील विषय क्रमांक-११३०,११३१,११३२ व ११३ या विषयावर एकत्रित चर्चा करावी.

**विषय क्रमांक ११३०:-** **(विषय क्रमांक -११३० ते ११३३ वर एकत्रित चर्चा करण्यात आली)** **(आस्थापना विभाग-१)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेने ईआरपी संगणक प्रकल्पावर रु.२.२१ कोटी खर्च करूनही प्रकल्प कार्यान्वित झालेला नसल्यामुळे

महापालिकेने केलेला खर्च व्यर्थ ठरला आहे, असा मुद्दा भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या सन २०११-१२ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्रमांक ६.२ मध्ये उपस्थित केला आहे. श्री.डी.पी.कुलकर्णी, सहाय्यक संचालक नगर रचना (निलंबीत) हे कार्यकारी अभियंता तथा इआरपी प्रकल्प व्यवस्थापक म्हणून कार्यरत असतांना सदर प्रकरणांत एकाच निविदाधारकास दोन वेळा वाटाघाटीस बोलावून निविदा अंतिम केल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त झाले नसताना कार्यादेश देणे, विना निविदा खरेदी करणे, दि.०२ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन न करणे, कामाचे परिपूर्ण नियोजन न करणे आणि सदर संगणक प्रणालीच्या कार्यान्वयनासाठी कोणतेही ठोस प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

वरील अनियमितता आढळून आल्यामुळे संबंधिताविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्यासाठी दिनांक २७.१०.२०१६ रोजी दोषारोपपत्र बजाविण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा अधिकाऱ्याची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. सबंधितांची वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु.६,६००/- अशी आहे.

करीता, श्री.डी.पी.कुलकर्णी, सहाय्यक संचालक नगररचना (निलंबित) यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**<u>विषय क्रमांक ११३१:-</u>** **(विषय क्रमांक -११३० ते ११३३ वर एकत्रित चर्चा करण्यात आली)** **(आस्थापना अधिकारी-१)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेने ईआरपी संगणक प्रकल्पावर रु.२.२१ कोटी खर्च करूनही प्रकल्प कार्यान्वित झालेला नसल्यामुळे महापालिकेने केलेला खर्च व्यर्थ ठरला आहे, असा मुद्दा भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या सन २०११-१२ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्रमांक ६.२ मध्ये उपस्थित केला आहे. श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता (निलंबीत) हे कार्यकारी अभियंता तथा इआरपी प्रकल्प व्यवस्थापक म्हणून कार्यरत असतांना सदर प्रकरणांत एकाच निविदाधारकास दोन वेळा वाटाघाटीस बोलावून निविदा अंतिम केल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त झाले नसतांना कार्यादेश देणे, विना निविदा खरेदी करणे, दि.०२ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन न करणे, कामाचे परिपूर्ण नियोजन न करणे आणि सदर संगणक प्रणालीच्या कार्यान्वयनासाठी कोणतेही ठोस प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

वरील अनियमितता आढळून आल्यामुळे संबंधिताविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्यासाठी दिनांक २७.१०.२०१६ रोजी दोषारोपपत्र बजाविण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा अधिकाऱ्याची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. संबंधितांची वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु.७,६००/- अशी आहे.

करीता, श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता (निलंबित) यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**विषय क्रमांक ११३२:- (विषय क्रमांक -११३० ते ११३३ वर एकत्रित चर्चा करण्यात आली) (आस्थापना अधिकारी-१)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.सय्यद सिकंदर अली हे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असतांना शासनाने औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्राथमिक सोयी-सुविधांच्या विकास कामासाठी रु.२४.३३ कोटी निधी उपलब्ध करून दिला होता. तथापी, निविदा प्रक्रियेच्या अटी/शर्ती CVC व PWD च्या Latest Guidelines/Norms चे उल्लंघन केल्याने निविदा दरांची स्पर्धा झाली नाही, निविदा प्रक्रियेसंदर्भाने निर्गमीत शासन निर्णयातील तरतूदींचे उल्लंघन करणे, अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.१३% जास्त दराने प्राप्त झालेल्या दराचे कोणतेही तांत्रिक मुल्यांकन न करणे, प्राप्त दराबाबत बाजारभाव/यास्वरुपाच्या कामासाठी वर्तमान स्थितीत प्राप्त होणाऱ्या दरांसोबत तुलना न करता फक्त ठेकेदाराने दिलेल्या पत्राच्या आधारे ९.१३% ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराने निविदा मंजुर करण्याची शिफारस केल्यामुळे महानगरपालिकेचे रु.१.६७ कोटीचे आर्थिक नुकसान होणे, निविदा पात्रतेसाठी संबंधित निविदाधारकाने निविदेसाबत सादर केलेले कामाचे प्रमाणपत्र दिनांक २५.०५.२०१५ हे संबंधित कार्यकारी अभियंत्याऐवजी त्यांच्या कार्यकक्षेतील काम नसतांना व काम अद्याप पूर्ण झालेले नसतांना त्यांच्या स्वाक्षरीने देणे, सनिविदा सुचनेतील अटींचे उल्लंघन करणे इत्यादी गंभीर अनियमितता केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

वरील अनियमितता आढळून आल्यामुळे संबंधिताविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्यासाठी दिनांक १५.१२.२०१६ रोजी दोषारोपपत्र बजाविण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा अधिकाऱ्याची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. संबंधितांची वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु.६,६००/- अशी आहे.

करीता, श्री.सय्यद सिकंदर अली, कार्यकारी अभियंता यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**विषय क्रमांक ११३३:- (विषय क्रमांक -११३० ते ११३३ वर एकत्रित चर्चा करण्यात आली) (आस्थापना अधिकारी-१)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता (निलंबित) हे तांत्रिक विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत असतांना शासनाने औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्राथमिक सोयीसुविधांच्या विकास कामासाठी रु.२४.३३ कोटी निधी उपलब्ध करून दिला होता. तथापी, या निधीतून निविदा करावयाच्या कामांची अंदाजपत्रके तयार करण्यासाठी दरपत्रके मागवून १.५% दराने पीएमसी नियुक्त करणे, प्रकरणात ई-निविदा मागविणे अनिवार्य असतांना दरपत्रके मागविणे, लेखा विभागाचा अभिप्राय न घेणे तसेच निविदा प्रक्रियेच्या अटी/शर्ती CVC व PWD च्या Latest Guidelines/Norms चे उल्लंघन करणे, निविदा प्रक्रियेसंदर्भाने निर्गमीत शासन निर्णयातील तरतूदींचे उल्लंघन केल्याने निविदा दरांची स्पर्धा झाली नाही, अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.१३% जास्त दराने प्राप्त झालेल्या दराचे कोणतेही तांत्रिक मुल्यांकन न करणे, प्राप्त दराबाबत बाजारभाव/यास्वरुपाच्या कामासाठी वर्तमान स्थितीत प्राप्त होणाऱ्या दरांसोबत

तुलना न करता फक्त ठेकेदाराने दिलेल्या पत्राच्या आधारे ९.१३% ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराने निविदा मंजुर करण्याची शिफारस केल्यामुळे महानगरपालिकेचे रु.१.६७ कोटीचे आर्थिक नुकसान होणे, निविदा सुचनेतील निविदा पात्रतेचे निकष पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारास पात्र ठरविणे, काम अद्यापपावेतो अंतिम झालेले नसल्याने किंवा काम पूर्ण केल्याचे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केलेले नसतांना व ही बाब ज्ञात असतांना ठेकेदारास मदत करण्याचे असद्हेतूने निविदाधारकास पात्र ठरविणे इत्यादी गंभीर अनियमितता केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

वरील अनियमितता आढळून आल्यामुळे संबंधिताविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्यासाठी दिनांक १५.१२.२०१६ रोजी दोषारोपपत्र बजाविण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा अधिकाऱ्याची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. संबंधितांची वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु.७,६००/- अशी आहे.

करीता, श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता (निलंबित) यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

मा.महापौर :विषय क्रमांक-११३० ते ११३३ हे अधिकारी यांची विभागीय चौकशीचे प्रस्ताव आहे संबंधीत अधिकारी यांनी माहिती द्यावी.

श्री.विकास एडके :दिनांक २७-१०-२०१६ ला निलंबीत केले तर चौकशीसाठी उशीरा प्रस्तावीत का केले? मा.आयुक्त यांना वारंवार निवेदन दिले की हे अधिकारी दोषी आहे, भ्रष्ट अधिकारी आहे. यांचेवर एफआयआर व गुन्हा दर्ज करावा. असे सांगूनही कार्यवाही होत नाही. यांना ९० टक्के आता पगार दिला जातो. एवढी सवलत कशासाठी देत आहोत? यांचेवर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

श्रीमती किर्ती शिंदे :नोटीस दिल्यानंतर खुलासा घेतला असेल व तो प्रशासनाला मान्य नसेल तर चौकशी किती दिवसात केली पाहिजे?

उपआयुक्त-आस्थापना:इआरपी सिस्टमचा सन-२००७ ला प्रकल्प मंजूर केला. त्याचे ऑडीट झाले. त्यामध्ये काही त्रुटी झाल्या व प्रकल्प कार्यान्वित झाला नाही. रु.२.११ कोटी खर्च व्यर्थ गेला. म्हणून जे अधिकारी कर्मचारी असतील त्यांचे विरूध्द कार्यवाही करावी असे समोर आले. संबंधीतांना नोटीसा दिल्या, खुलासा आल्यानंतर तत्कालीन प्रशासन यांनी या संदर्भात खाते निहाय चौकशी करणे आवश्यक आहे. या निर्णयाला ते आले व सदर अधिकारी यांची नियुक्ती ही महासभा असल्यामूळे शिस्त व अपील नियम १९७९ चे कलम ७ (१) ब नुसार आपल्या समोर सादर केले. नोटीशीचा खुलासा व नोटीस मध्ये दिलेली कारणे यांची कारणमिमांसा करून चौकशी करणे आवश्यक आहे की नाही यासह पाठविले.

श्री.प्रमोद राठोड :संबंधीताचा खुलासा काय? त्यावर प्रशासनाचा काय अभिप्राय मांडला आहे?

मा.आयुक्त :जो खुलासा आला तो असमाधानकारक आहे. असे तत्कालीन आयुक्ताचे मत होते. त्यामूळे त्यांनी त्यांचेवर दोषारोप ठेवलेले आहे. चौकशी करण्याकरीता प्रस्ताव सादर केला.

श्री.प्रमोद राठोड :प्रस्ताव आता आला. आताचे प्रशासनाचा अभिप्राय काय आहे?

मा.आयुक्त :आयुक्त ही एक संस्था असते व एखाद्या अधिकाऱ्याचा खुलासा आयुक्तांना असमाधानकारक वाटत असेल व दोषारोप तामील केले. याचा अर्थ तो खुलासा असमाधानकारक आहे असे त्या संस्थेचे मत आहे.

श्री.राजू शिंदे :एखाद्या आयुक्तांनी आकसबुध्दीने कार्यवाही करीत असेल तर ते आम्ही मान्य करायचे का?

श्री.प्रमोद राठोड :बाकीच्या अधिकाऱ्यांना निलंबीत करून चौकशी करता तर श्री.सिंकदर अली यांना कामावर ठेवून का चौकशी होत आहे. सर्वांनाच निलंबीत करून चौकशी करायला पाहिजे.

मा.आयुक्त :कोणाला निलंबीत करायचे? कोणाची चौकशी करायची? कोणत्या कलमाखाली करायची? हा तो त्या संस्थेचा अधिकार आहे.

श्री.राजू शिंदे :एखादया आयुक्तांनी आकस बुध्दीने हे करीत असेल तर मान्य करायचे का? जे आयुक्त असतील त्यांनी ठरवावे हे खरे की खोटे? प्रशासनाने खात्री करावी. त्यानंतर सभागृहासमोर यावे. मा.आयुक्तांनी त्यांचे स्तरावर कार्यवाही करावी. जेंव्हा आम्ही चौकशीसाठी मंजूरी देतो कार्यवाही करीत नाही. कामावर घ्या असे सांगतो घेत नाही. प्रशासनाच्या सोयीनुसार प्रस्ताव येतो. एवढा उशीरा प्रस्ताव येण्यास का लागला? या अधिकाऱ्याच्या बाबतीत आतापर्यत काय काय कार्यवाही केली? ते सर्व समोर ठेवावे तो पर्यत आयुक्तांनी त्यांचे स्तरावर कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :हे अधिकारी दोषी असेल तर एकदाच ठोस कार्यवाही करावी. परंतु दोषी नसतील तर याची चौकशी कोण करणार आहे? सर्व चौकशी आयुक्तांनी करावी. आताच सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे आकसबुध्दीने कार्यवाही झाली असेल तर ती होऊ नये. त्याची काळजी संस्थेचे प्रमुख म्हणून आयुक्तांनी घेतली पाहिजे. आयुक्त हे सक्षम अधिकारी असतात. आयुक्तांनी चौकशी करावी.

मा.आयुक्त :आयुक्तांना चौकशी करता येणार नाही. जी व्यक्ती आरोप ठेवते ते चौकशी करू शकत नाही. त्र्ययस्त व्यक्तीकडून याची चौकशी होणे अपेक्षीत आहे. चौकशी करण्याची एक पध्दत असते. त्यासाठी एक त्र्ययस्त यंत्रणा म्हणून चौकशी अधिकारी सादर करता अधिकारी नेमला जातो.

श्री.अफसर खान :सहा महिन्याच्या आत चौकशी करायला पाहिजे. नियमाचे पालन केले नाही. १८ महिने उशीर का झाला? जेंव्हा चौकशी करण्याचे आदेश केले चौकशी केली नाही. आता आम्ही सांगतो आयुक्तांनी चौकशी करावी, करीत नाही. जर दोषी असेल तर कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :चौकशीचा प्रस्ताव येण्यास उशीर का झाला?

मा.आयुक्त :सर्वसाधारण सभेची मान्यता झाल्या शिवाय चौकशी करता येत नाही.

श्री.राजू शिंदे :सभागृह सांगते आहे की, आयुक्तांनी चौकशी करावी का करीत नाही. सहा महिन्याच्या आत चौकशी होऊन कार्यवाही होणे अपेक्षीत असते तसे झाले नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्वसाधारण सभेचे मत लक्षात घेऊन प्रशासनाला आदेशीत करावे.

श्री.नंदकुमार घोडेले :विभागीय चौकशी कोण करणार आहे? निर्णय घ्यावा प्रशासन चौकशी करेल.

श्री.राजू शिंदे :आयुक्तांनी त्यांचे स्थरावर चौकशी करावी. यापुर्वी विभागीय चौकशी करावी आदेशीत केले. सहा महिन्याच्या आत चौकशी होणे आवश्यक आहे. त्यांना कामावर का घेत नाही? चौकशी करीत नाही? उशीरा प्रस्ताव येतो. आमची सुचना की, आयुक्तांनी चौकशी करावी तत्कालीन आयुक्त यांनी आकसबुध्दीने कार्यवाही केली अशी आमची धारणा आहे. दोषी असेल तर बडतर्फ करावे दोषी नसेल त्यांना न्याय द्यावा.

श्री.रामेश्वर भादवे :दोषी म्हणूनच निलंबीत केले असेल. चौकशी करावी दोषी असेल तर कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :चौकशी अधिकारी वेगळा असतो प्रकरण पाठवून चौकशी करावी लागते. आयुक्त स्तरावर चौकशी करता येत नाही.

श्रीमती किर्ती शिंदे :विभागीय चौकशी करण्याचे आदेशीत करावे. संबंधीतास नोटीस केव्हा दिली? त्यांचा खुलासा केव्हा आला.

श्री.सिताराम सुरे :महानगरपालिकेत अधिकारी कर्मचारी संख्या कमी आहे. याची चौकशी करावी. परंतु आता त्यांना कामावर घ्यावे. आजही त्यांना ९० टक्के पगार दिला जातो. विषय मंजूर करावा.

श्रीमती सरवत बेगम :अधिकारी यांनी नुकसान केले, असे म्हटले, परंतु आणखी या प्रकरणात किती लोक दोषी आहेत? संचिका सादर होते व टेंडर होते. तोपर्यत ज्यांच्या त्यांच्या सह्या आहे त्या सर्वांवर कार्यवाही करावी. निलंबीत केल्यानंतर किती दिवसात प्रस्ताव यायला पाहिजे हा प्रस्ताव नियमाने बरोबर नाही रद्द करावा.

श्री.विकास एडके :विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस उशीर का झाला? एकाच गुन्ह्यात हे अडकलेले आहेत का? वेगवेगळया गुन्ह्यात हे लोक आहे. गाळ काढणे, प्रकरणात आहे. यांचेवर गुन्हा का दाखल केला नाही? चौकशीला उशीर का होतो?

उपआयुक्त-आस्थापना:नियमाप्रमाणे कारणे दाखवा नोटीस दिल्यानंतर ७ दिवसाची मुदत दिली जाते. परंतु काहींना संचिका बघून माहिती घ्यायची असेल तर, मुदतवाढ घेऊ शकतात. ७ दिवसाची मुदत दिली होती. त्यांनी मुदत वाढ घेतली व खुलासा केला. तत्कालीन आयुक्त यांनी चार महिन्यापुर्वी हे प्रस्ताव पाठविले होते. मान्यता झाल्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

श्री.चेतन कांबळे :या अधिकाऱ्यांवर दोषारोप ठेवले. अंतिम सही आयुक्तांची असते यात आयुक्त सुध्दा दोषी असतील, त्यांची चौकशी कोणी करायची? आयुक्तांची सुध्दा चौकशी करावी. भ्रष्टाचार झाला असेल तर पहिले चौकशी व त्यानंतर कार्यवाही करायला पाहिजे.

मा.महापौर :विषय क्रमांक ११३०,११३१,११३२,११३३ हे अधिकारी यांची विभागीय चौकशी करण्याचे प्रस्ताव आहे.यावर सदस्यांनी मत व्यक्त केले व शंका उपस्थित केल्या

त्या संदर्भात प्रशासनाने त्या सदस्यांचे शंकाचे उत्तर १५ दिवसात देण्यात यावे. तसेच सदरील प्रस्तावाबाबत संबंधीत अधिका-यांच्या खुलाशा बाबत आयुक्तांनी योग्यती चौकशी/अभ्यास करुन चौकशीची आवश्यकता असल्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवावा.

**ठराव:-**

वरील विषय क्रमांक ११३०,११३१,११३२,११३३ हे अधिकारी यांची विभागीय चौकशी करण्याचे प्रस्ताव आहे. यावर सदस्यांनी मत व्यक्त केले व शंका उपस्थित केल्या त्या संदर्भात प्रशासनाने त्या सदस्यांचे शंकाचे उत्तर १५ दिवसात देण्यात यावे. तसेच सदरील प्रस्तावाबाबत संबंधीत अधिका-यांच्या खुलाशा बाबत आयुक्तांनी योग्यती चौकशी/अभ्यास करुन चौकशीची आवश्यकता असल्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवावा.

**विषय क्रमांक ११३४:-** **(शहर अभियंता)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८, चिकलठाणा एम.आय.डी.सी. अंतर्गत महाराष्ट्र डिस्टीलरी ते चिकलठाणा एम.आय.डी.सी. पोलिस स्टेशन ते ब्ल्यु बेल रेसिडेन्सी या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी, सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१५-१६ च्या दरसुचीनुसार र.रु.२,९८,०५,८०३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. या कामचा खर्च "शहर एकात्मीक रस्ते विकसित करणे" या लेखा शिर्षा मधुन प्रस्तावित आहे.

करीता, अंदाजपत्रक र.रु.२,९८,०५,८०३/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८, चिकलठाणा एम.आय.डी.सी. अंतर्गत महाराष्ट्र डिस्टीलरी ते चिकलठाणा एम.आय.डी.सी. पोलिस स्टेशन ते ब्ल्यु बेल रेसिडेन्सी या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.२,९८,०५,८०३/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११३५:-** **(शहर अभियंता)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९१, जयभवानीनगर येथील नाल्यास आर.सी.संरक्षीत भिंत बांधणे, नाला चॅनेलिंग करणे, बॉक्स कलर्व्हट बांधणे, या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जिवन प्राधिकरणांच्या सन २०१५-१६ दरसुचीनूसार र.रु.१,४४,२८,८०२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामास मा.आयुक्त महोदय, यांची मान्यता प्राप्त आहे. कामाचा खर्च मा.महापौर यांनी सुचविलेल्या अत्यावश्यक कामे या लेखाशिर्षक सन २०१७-१८ अंतर्गत तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

करीता, कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १,४४,२८,८०२/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९१, जयभवानीनगर येथील नाल्यास आर.सी.संरक्षीत भिंत बांधणे, नाला चॅनेलिंग करणे, बॉक्स कलर्व्हट बांधणे, या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.१,४४,२८,८०२/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११३६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२८ येथील एन-१२ महानगरपालिका शाळेच्या परिसरामध्ये धन्नुलाल मेघावाले बहुउद्देशिय हॉल व त्या समोरील खुली जागा असून त्याचे बांधकाम दि.२४.०२.२०१० पासून त्याचे बांधकाम विना वापर पडून आहे. त्यापासून महानगरपालिकेस कोणतेही उत्पन्न मिळत नाही. कारण सदरील हॉल बांधत्या वेळी सदर हॉलचा वापर हा शालेय कारणासाठी वापरणे बाबतचे आदेश आहे. त्यामुळे सदरची वास्तु विना वापर पडून असून सदरची वास्तु उभारणेसाठी महानगरपालिकेने रु.३० लक्ष एवढा खर्च करून बांधण्यात आलेला आहे. अशा प्रकारे वास्तु विनावापर पडून असल्याने त्या ठिकाणी रात्री बेरात्री मद्यपीचा सततचा वावर असून वॉर्डातील नागरीकांना त्रास होत आहे.

सदरील इमारत बांधल्यापासून महानगरपालिकेस कोणतेही उत्पन्न मिळत नाही. उलट त्या वास्तुवर/इमारतीवर देखभाल दुरूस्तीच्या खर्चाचा बोझा पडत आहे. त्यामुळे सदरील हॉलच्या वापरात बदल करून त्या हॉलचा वापर सांस्कृतिक कार्यक्रम, लग्न समारंभ, वाढदिवस समारंभ इत्यादीसाठी केल्यास त्यापासून महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्न मिळेल व त्या वास्तुचा महानगरपालिकेवर देखभाल दुरूस्तीच्या खर्चाचा बोझा पडणार नाही. तसेच सदरील सभागृह एखाद्या सेवाभावी संस्थेस भाडेतत्वावर देऊन त्या इमारतीवरील देखभालीचा खर्च, विद्युत देयक व इतर खर्चाची बचत होऊन महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल.

करीता, सदर हॉलच्या वापरात बदल करणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सिमा गणपत खरात **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२८ येथील एन-१२ महानगरपालिका शाळेच्या परिसरामध्ये असलेला धन्नुलाल मेघावाले बहुउद्देशिय हॉलच्या व त्या समोरील खुल्या जागेच्या वापरात बदल करून सदरील हॉलच्या वापरात बदल करून तो हॉल सांस्कृतिक कार्यक्रम, लग्न समारंभ, वाढदिवस समारंभ इत्यादीसाठी सेवाभावी संस्थेस भाडेतत्वावर नियमाप्रमाणे देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११३७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५० ही दलित वसाहत असून अनेक गोर-गरीब नागरीक येथे राहतात. येथील खालील कामे दलित वस्ती सुधार योजना (विशेष अनुदान) अंतर्गत करण्यासाठी प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेसाठी मा.जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव पाठविण्यासाठी शिफारस करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.५० मधील लक्ष्मी कॉलनी येथे रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे. | २५ लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.५० मधील गरमपाणी येथील गल्ल्यात कॉंक्रेट व रस्ते तयार करणे. | २५ लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.५० मधील कोतवालपुरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रेट रस्ते करणे | २० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ४. | वॉर्ड क्र.५० मधील अशोक नगर, प्रज्ञानगर येथील ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रेट रस्ते तयार करणे | ३० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती नसरीन बेगम समद यार खान

**अनुमोदक:-**श्री.सय्यद मतीन रशीद, श्रीमती शेख नरगीस सलीम

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५० ही दलित वसाहतींमध्ये दलित वस्ती सुधार योजना (विशेष अनुदान) अंतर्गत खालील कामे करण्यासाठी प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेस मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.५० मधील लक्ष्मी कॉलनी येथे रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे. | २५ लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.५० मधील गरमपाणी येथील गल्ल्यात कॉंक्रेट व रस्ते तयार करणे. | २५ लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.५० मधील कोतवालपुरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रेट रस्ते करणे | २० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.५० मधील अशोक नगर, प्रज्ञानगर येथील ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रेट रस्ते तयार करणे | ३० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११३८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथे महानगरपालिकेची मराठी माध्यमिक शाळा आहे. मिसरवाडीत काही परिसर मुस्लीम बहुल वसाहत असून या परिसरातील मुला-मुलींना ऊर्दु शिक्षण घेण्याकरीता त्या शाळेमध्ये ऊर्दु बालवाडी सुरू करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी **अनुमोदक:-**श्रीमती खतीजाबी छोटू कुरेशी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथील महानगरपालिकेच्या मराठी माध्यमिक शाळेत ऊर्दु बालवाडी सुरू करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११३९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-३४, आरतीनगर-मिसरवाडी येथील येणाऱ्या दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्ड क्रमांक-३४, आरतीनगर मिसरवाडी भागामध्ये विविध विकास कामे करणेसाठी व प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजे तरतूद |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र. अंतर्गत विविध ठिकाणी क्रॉक्रीट रस्ते तयार करणे | ५० लक्ष |
| ०२ | वार्ड क्र. ३४ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे | ५० लक्ष |
| ०३ | वार्ड क्र. ३४ मध्ये विविध ठिकाणी पोलसह पथदिवे बसविणे | २५ लक्ष |

**सुचक:-**श्रीमती संगिता सुभाष वाघुले

**अनुमोदक:-**श्री.खान फेरोज मोईनोद्दीन श्री.नासेर सिद्दीकी तकीउद्दीन

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-३४, आरतीनगर-मिसरवाडी येथील दलित वसाहतींमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील विविध विकास कामे करणेसाठी निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजे तरतूद |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र. अंतर्गत विविध ठिकाणी क्रॉक्रीट रस्ते तयार करणे | ५० लक्ष |
| ०२ | वार्ड क्र. ३४ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे | ५० लक्ष |
| ०३ | वार्ड क्र. ३४ मध्ये विविध ठिकाणी पोलसह पथदिवे बसविणे | २५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११४०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा वॉर्ड क्र.६० मध्ये गल्ली क्र.८, नुरगेट जवळ मनपाचे सार्वजनिक सभागृह आहे. सदरील सभागृह पडिक असून यामध्ये कोणतेही कार्यक्रम होत नसल्याने त्या सभागृहाची देखेरेख व्यवस्थित राहावी व सभागृह चांगल्या परिस्थितीत राहून वार्डातील रहिवासीयांना याचा लाभ व्हावा म्हणुन सदरील सभागृहात रहीवासीयांची मागणी व आवश्यकतेप्रमाणे आणखीन विविध आवश्यक कामे असल्याचे आमच्या निदर्शनास आलेले आहे.

सदरील सभागृह सेवाभावी संस्था राज एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी, औरंगाबाद यांना ना-नफा ना-तोटा या तत्वावर चालविण्यास दिल्यास सोसायटीच्या वतीने रहिवासीयांच्या मागणी प्रमाणे तेथे सोई-सुविधा देण्याचा सोसायटीचा प्रयत्न व मानस आहे.

करीता उपरोक्त सभागृह सेवाभावी संस्था राज एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी, औरंगाबाद या सोसायटीला ना-नफा ना-तोटा या तत्वावर चालविण्याची परवानगी व मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.शेख जफर अख्तर, श्री.विकास प्रकाश एडके

**अनुमोदक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ, श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६० मधील गल्ली क्र.८, नुरगेट जवळील महानगरपालिकेचे सार्वजनिक सभागृह राज एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी, औरंगाबाद या सेवाभावी संस्थेस ना-नफा ना-तोटा या तत्वावर नियमाप्रमाणे चालविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११४१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-१०४, बनेवाडी हा भाग शहरामध्ये असुन देखिल या भागात महानगरपालिकेची शाळा नसल्यामुळे या भागातील मुलांना शाळेपासून वंचीत रहावे लागत आहे. कारण या भागातील मुलांना शाळेसाठी राहूलनगर परिसरातील शाळेत रेल्वे-पटरी क्रॉस करून जावे लागत असल्यामुळे मुलांचे पालक त्यांना शाळेतच पाठवित नाहीत. त्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तत्कालीन आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरिया यांनी याची दखल घेऊन या परिसरात बालवाडी सुरू केली. तथापि, प्राथमिक शाळेचा प्रश्न तसाच कायम राहीला आहे. त्यामुळे या परिसरातील नागरीकांनी या ठिकाणी प्राथमिक शाळा सुरू करण्याची मागणी केलेली आहे.

नागरीकांच्या मागणीचा विचार करता व मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी बनेवाडी परिसरात महानगरपालिकेची प्राथमिक शाळा सुरू करण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिध्दांत संजय शिरसाट

**अनुमोदक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे,श्री.विकास रतनलाल जैन, श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-१०४, बनेवाडी परिसरात महानगरपालिकेची प्राथमिक शाळा सुरू करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११४२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-१०४ बनेवाडी प्रभागाअंतर्गत रेल्वेस्टेशन रोड ते बनेवाडी हा रस्ता अत्यंत खराब झालेला असल्याने सदरील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे अत्यावश्यक असल्याने या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण कामासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात एक कोटी रुपयांची तरतुद करण्यात आलेली असून सदरील रस्ता हा मिलीटरीच्या ताब्यात असल्याने त्यांची परवानगी घेणेस तसेच या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिध्दांत संजय शिरसाट

**अनुमोदक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे,श्री.विकास रतनलाल जैन, श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-१०४ बनेवाडी प्रभागाअंतर्गत मिल्ट्रीच्या ताब्यात असलेला रेल्वेस्टेशन ते बनेवाडी या रस्त्याचे मिल्ट्रीची परवानगी घेऊन खडीकरण व डांबरीकरण करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११४३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३ मधील मनपा अर्थसंकल्प २०१७-१८ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र.व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| SCR WARD 07 P.No.53 P.No.53 | वार्ड क्र.९६ अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे. रु.३० लक्ष | वॉर्ड क्र.९६ येथे स्वप्ननगरी येथे सिमेंट रस्ता तयार करणे. १० लक्ष. |
| | | वॉर्ड क्र.९६ येथे सुमंगल विहार व खिवंसरा विहार येथे सिमेंट रस्ता तयार करणे रु.१० लक्ष. |
| | | वॉर्ड क्र.९६ येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. रु.१० लक्ष. |

**सुचक:-**श्रीमती विमल गोविंद केंद्रे **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३ मध्ये मनपा अर्थसंकल्प २०१७-१८ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र.व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| SCR WARD 07 P.No.53 P.No.53 | वार्ड क्र.९६ अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे. रु.३० लक्ष. | वॉर्ड क्र.९६ येथे स्वप्ननगरी येथे सिमेंट रस्ता तयार करणे. १० लक्ष. |
| | | वॉर्ड क्र.९६ येथे सुमंगल विहार व खिवंसरा विहार येथे सिमेंट रस्ता तयार करणे रु.१० लक्ष. |
| | | वॉर्ड क्र.९६ येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. रु.१० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११४४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मसनतपुर वसाहत ही संपुर्ण १०० टक्के दलित वस्ती असुन येथील नागरीकांना मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी तसेच मसनतपुर गावालगतच्या सुखना नदीचे पाणी नागरीकांच्या घरात शिरु नये या दृष्टिकोनातून सदर नदीच्या पात्रास संरक्षण भिंत बांधणे अत्यावश्यक आहे. जेणेकरून जिवीत हानी व वित्तहानी होणार नाही. खालील कामांचा समावेश सन २०१७-१८ च्या आर्थिक वर्षाकरीताच्या नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत कामाचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेस्तव व निधी प्राप्तीस्तव मा.सर्वसाधारण सभसमोर मान्यतेस्तव ठेवण्यात येतो. सदर प्रस्ताव पारित करून शासनाकडे शिफारस करण्यात यावी.

१) मसनतपुर गावाजवळील सुखना नदीच्या बाजुला संरक्षक भिंत बांधणे. रु.१.०० कोटी
२) मसनतपुर येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे रु.७०.०० लक्ष
३) अशोकनगर, मसनतपुर येथील पाणीपुरवठा व्यवस्था सुरळीत करण्यासाठी जलवाहीनी टाकणे. रु.५०.०० लक्ष
४) मसनतपुर येथे पोलसहित पथदिव्यांची व्यवस्था करणे रु.२५.०० लक्ष
५) मसनतपुर येथे विविध ठिकाणी जलनि:स्सारण वाहिनी टाकणे. रु.२०.०० लक्ष

करीता, मा.सर्वसाधारण सभेत वरील कामाचा प्रस्ताव पारित करून उपरोक्त कामासाठी निधी प्राप्ती साठी व मान्यतेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मसनतपुर या दलित वसाहतींमध्ये नागरीकांना मुलभूत सोई-सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी निधी मिळण्याकरीता प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

१) मसनतपुर गावाजवळील सुखना नदीच्या बाजुला संरक्षक भिंत बांधणे. रु.१.०० कोटी
२) मसनतपुर येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे रु.७०.०० लक्ष
३) अशोकनगर, मसनतपुर येथील पाणीपुरवठा व्यवस्था सुरळीत करण्यासाठी जलवाहीनी टाकणे. रु.५०.०० लक्ष

४) मसनतपुर येथे पोलसहित पथदिव्यांची व्यवस्था करणे रु.२५.०० लक्ष
५) मसनतपुर येथे विविध ठिकाणी जलनि:स्सारण वाहिनी टाकणे. रु.२०.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११४५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नागरीकांच्या मागणीनुसार व त्यांच्या सोयी करीता खालील नमुद तक्त्यांमधील लेखाशिर्षक तसेच स्थळ बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| सन २०१७-१८ मधील मा.स्थायी समितीने शिफारस केलेली कामे | रक्कम रुपये (हजारात) | च्याऐवजी | रक्कम रुपये (हजारात) |
|---|---|---|---|
| ८.मिलींदनगर येथील सार्वजनिक शौचालयाची दुरूस्ती करणे. SCR- Ward-9 P.No.70 | १००० | मिलींदनगर येथे सामाजिक सभागृह बांधणे व शौचालयाची दुरूस्ती करणे | १००० |
| ३३.वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करणे. SCR- Ward-9 P.No.72 | ३००० | फुलेनगर येथील सामाजिक सभागृहाची दुरुस्ती करून बांधणे व विकसीत करणे. | ३००० |
| ४.वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत विविध ठिकाणी जिर्ण झालेल्या पाण्याच्या पाईप लाईन बदलणे. SCR- Ward-9 P.No.76 | १००० | वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत विविध विकास कामे करणे | ५०० |
| | | वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत मनपाच्या खुल्या जागा विकसीत करणे व दुरूस्ती करणे | ५०० |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती लता मगनराव निकाळजे

**अनुमोदक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग,श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे,श्रीमती सुनिता रामराव चव्हाण

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागरीकांच्या मागणीनुसार व त्यांच्या सोई-सुविधांकरीता खालील नमुद तक्त्यांमधील लेखाशिर्षक तसेच स्थळ बदलास मंजुरी देण्यात येते.

| सन २०१७-१८ मधील मा.स्थायी समितीने शिफारस केलेली कामे | रक्कम रुपये (हजारात) | च्याऐवजी | रक्कम रुपये (हजारात) |
|---|---|---|---|
| ८.मिलींदनगर येथील सार्वजनिक शौचालयाची दुरूस्ती करणे. SCR- Ward-9 P.No.70 | १००० | मिलींदनगर येथे सामाजिक सभागृह बांधणे व शौचालयाची दुरूस्ती करणे | १००० |
| ३३.वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करणे. SCR- Ward-9 P.No.72 | ३००० | फुलेनगर येथील सामाजिक सभागृहाची दुरुस्ती करून बांधणे व विकसीत करणे. | ३००० |
| ४.वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत विविध ठिकाणी जिर्ण झालेल्या पाण्याच्या पाईप लाईन बदलणे. | १००० | वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत विविध विकास कामे करणे | ५०० |
| | | वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत मनपाच्या खुल्या | ५०० |

| | | | |
|---|---|---|---|
| SCR- Ward-9 P.No.76 | | जागा विकसीत करणे व दुरूस्ती करणे | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११४६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील कुमारी खुशी संजय डोंगरे हिची बास्केट बॉल ह्या खेळात १६ वर्षाखालील भारतीय कॅम्प मध्ये निवड झालेली आहे. सदरील कॅम्प संपलेला असून नागपूर येथे दिनांक २२ ते ३० जून २०१७ कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे व स्पर्धा दिनांक ०२ ते ९ जुलै २०१७ रोजी दरम्यान हैद्राबाद (तेलंगना) या ठिकाणी होणार आहे. सदरील बाब औरंगाबादकरांसाठी गौरवास्पद आहे.

तरी, कुमारी खुशी संजय डोंगरे ही भारतीय कॅम्पच्या अंतिम निवडीसाठी तयार करीता साहित्य खरेदी इत्यादीसाठी मनपा औरंगाबाद तर्फे रु.१.५० (अक्षरी एक लक्ष पन्नास हजार फक्त) इतकी आर्थीक मदत देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सचिन सुर्यकांत खैरे **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर, रु.१ लक्ष ५० हजार आर्थिक मदत देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कुमारी खुशी संजय डोंगरे ह्या खेळाडूस बास्केटबॉल खेळाच्या १६ वर्षाखालील हैद्राबाद (तेलंगना) येथे होणाऱ्या भारतीय कॅम्पच्या अंतिम स्पर्धेच्या निवडीच्या तयारीसाठी व साहित्य खरेदी करण्यासाठी मनपा औरंगाबाद तर्फे रु.१ लक्ष ५० हजार आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११४७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३५ नारेगाव येथे १०० टक्के अल्पसंख्यांक नागरीक असलेल्या वसाहती १) पटेलनगर, २) अजीजकॉलनी, ३) बिसमिल्ला कॉलनी ह्या तीन वसाहतींमध्ये महानगरपालिकेच्या वतीने गत १५ ते २० वर्षापासून एकही मुलभूत सुविधा दिलेल्या नाहीत. या तीनही भागात जवळपास पाच ते सहा हजार नागरीक नागरी सुविधेपासून वंचीत आहेत. या करीता मा.राज्य शासनाकडून अल्पसंख्यांक बहुल नागरीकांच्या वसाहती करीता जो दरवर्षी विकास कामासाठी निधी प्राप्त होतो. यामधून या भागांसाठी १) रस्त्यासाठी रु.५० लक्ष, २) ड्रेनेज लाईन साठी रु.५० लक्ष ३) विद्युत पथदिव्यांसाठी रु.५० लक्ष ४) पिण्याच्या पाणी पाईप लाईन करीता रु.५० लक्ष तरतुद करण्यासाठी शासनास शिफारस करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके **अनुमोदक:-**श्री.राजु रामराव शिंदे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३५ नारेगाव येथील अल्पसंख्यांक नागरीक असलेल्या पटेलनगर, अजीजकॉलनी, बिसमिल्ला कॉलनी ह्या तीन वसाहतींमध्ये मा.राज्य शासनाकडून अल्पसंख्यांक बहुल नागरीकांच्या वसाहती करीता जो दरवर्षी विकास कामासाठी निधी प्राप्त होतो. यामधून या भागांसाठी रस्त्यासाठी रु.५० लक्ष, ड्रेनेज लाईन साठी रु.५० लक्ष, विद्युत पथदिव्यांसाठी रु.५० लक्ष व पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईन करीता रु.५० लक्षची तरतुद करण्यासाठी शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११४८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नारेगाव आनंदगाडे नगर, साठेनगर या वसाहती ही संपुर्ण १०० टक्के दलित वस्ती असुन येथील नागरीकांना मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी तसेच नारेगाव लगतच्या सुखना नदीचे पाणी नागरीकांच्या घरात शिरु नये या दृष्टिकोनातून सदर नदीच्या पात्रास संरक्षण भिंत बांधणे अत्यावश्यक आहे. जेणेकरून जिवीत हानी व वित्तहानी होणार नाही. तरी खालील कामांचा समावेश सन २०१७-१८ च्या आर्थिक वर्षाकरीताच्या नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत कामांचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेस्तव व निधी प्राप्तीस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव ठेवण्यात येतो. सदर प्रस्ताव पारित करुन शासनाकडे शिफारस करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १) | नारेगाव, आनंदगाडेनगर गावाजवळील सुखना नदीच्या बाजुला संरक्षण भिंत बांधणे. | रु.१.०० कोटी |
| २) | आनंदगाडेनगर येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.५०.०० लक्ष |
| ३) | नारेगाव, आनंदगाडेनगर साठेनगर येथील पाणीपुरवठा व्यवस्था सुरळीत करण्यासाठी जलवाहिनी टाकणे | रु.२५.०० लक्ष |
| ४) | आनंदगाडे येथे पोल सहित पथदिव्यांची व्यवस्था करणे. | रु.२०.०० लक्ष |
| ५) | आनंदगाडेनगर, साठेनगर येथे विविध ठिकाणी जलनि:स्सारण वाहीनी टाकणे. | रु.२५.०० लक्ष |

करीता, मा.सर्वसाधारण सभेत वरील कामांचा प्रस्ताव पारित करून उपरोक्त कामासाठी निधी प्राप्तीसाठी व मान्यतेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय व शासनाकडे पाठविणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके **अनुमोदक:-**श्री.गजानन रामकिसन बारवाल

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगाव आनंदगाडे नगर, साठेनगर या वसाहतींमध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्याकरीता निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १) | नारेगाव, आनंदगाडेनगर गावाजवळील सुखना नदीच्या बाजुला संरक्षण भिंत बांधणे. | रु.१.०० कोटी |
| २) | आनंदगाडेनगर येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.५०.०० लक्ष |
| ३) | नारेगाव, आनंदगाडेनगर साठेनगर येथील पाणीपुरवठा व्यवस्था सुरळीत करण्यासाठी जलवाहिनी टाकणे | रु.२५.०० लक्ष |
| ४) | आनंदगाडे येथे पोल सहित पथदिव्यांची व्यवस्था करणे. | रु.२०.०० लक्ष |
| ५) | आनंदगाडेनगर, साठेनगर येथे विविध ठिकाणी जलनि:स्सारण वाहीनी टाकणे. | रु.२५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११४९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५१ मध्ये कोतवालपुरा व भोईवाडा, पारधीपुरा ही ५० टक्के दलित वसाहत असून सदरील वसाहतीत राहणाऱ्या रहिवासीयांचे जीवनमानाचा दर्जा उंचविण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजे तरतुद |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.५१ मध्ये कोतवालपुरा व भोईवाडा, पारधीपुरा अंतर्गत नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | २० लक्ष |
| २ | वॉर्ड क्र.५१ मध्ये कोतवालपुरा व भोईवाडा, पारधीपुरा अंतर्गत सिमेंट कॉंक्रेट रस्ते तयार करणे | २० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे **अनुमोदक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५१ मधील कोतवालपुरा, भोईवाडा, पारधीपुरा येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजे तरतुद |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.५१ मध्ये कोतवालपुरा व भोईवाडा, पारधीपुरा अंतर्गत नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | २० लक्ष |
| २ | वॉर्ड क्र.५१ मध्ये कोतवालपुरा व भोईवाडा, पारधीपुरा अंतर्गत सिमेंट कॉंक्रेट रस्ते तयार करणे | २० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ११५०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जानेवारी-२०१६ मध्ये सातारा-देवळाईचा समावेश महापालिका क्षेत्रात झाला. एप्रिल-२०१६ मध्ये सातारा-देवळाई अशा दोन प्रभागामध्ये निवडणूक संपन्न झालेली आहे. सातारा देवळाई भागातील नागरी मुलभूत सुविधा पुरविणेच्या दृष्टिकोनातून विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन सिडकोची शासनाने नेमणूक केलेली होती. या भागातील बांधकाम परवानगी देतांना डेव्हलपमेंट चार्जेस म्हणुन जमा करण्यात आलेली र.रु.८.५० कोटी सिडकोकडे जमा होती. सदरची रक्कम सातारा देवळाई भागात नागरी मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी वापरणे बंधनकारक असून ही रक्कम आठ महिन्यापुर्वी महापालिकेकडे वर्ग करण्यात आलेली आहे.

सातारा-देवळाई भागातील मुख्य रस्त्यांची समस्या गंभीर आहे. रस्त्यांची कामे प्राधान्याने हाती घेणे व प्रत्यक्षात कामे सुरू करण्यासाठी सिडकोने मनपाकडे वर्ग केलेल्या रक्कमेतून काम करून घेणे शक्य आहे. हा पैसा सातारा-देवळाई भागात सुविधा पुरविण्यासाठी जमा करण्यात आलेला होता व तो त्याच भागातील विकास कामांवर खर्च होणे अपेक्षीत आहे. खालील दर्शविलेल्या रस्त्यांची कामे या फंडातून रस्त्याचे कामे करणे त्यासाठी अंदाजपत्रके तयार करणे, निविदा प्रक्रिया करणे व प्रत्यक्ष काम करण्यास मान्यता देण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

१. रेणुकामाता मंदीर ते चाटे शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.
२. शिवाजीनगर रेल्वेपटरी ते बीड बायपास देवळाई चौक ते देवळाई तांडा पर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे व नाल्यावर पुल बांधणे.
३. नाईकनगर ते विनायकनगर या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.
४. हॉटेल शिदोरी ते प्रकाश महाजन यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.
५. घराना फर्निचर ते श्री.प्रविण कुलकर्णी यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

६. दत्त मंदीर ते हरीप्रसादनगर या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.
७. साईनाथनगर ते आलोकनगर या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.
८. एमआयटी कॉलेज, बीडबायपास ते सातारा गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे व्हॉईट टॉपींग करणे व आरसीसी पुल बांधणे.
९. साताराागावातील पुलापासून ते खंडोबा मंदीराकडे जाणाऱ्या रस्त्याचे व्हॉईट टॉपींग करणे व आरसीसी पुल बांधणे.
१०. कमलनयन बजाज हॉस्पीटल बीडबायपास ते सुधाकरनगरकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

**सुचक:-**श्री.अप्पासाहेब विनायकराव हिवाळे

**अनुमोदक:-**श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड, श्री.कचरु छगनराव घोडके

श्री.सिध्दांत सिरसाट :डांबरीकरणा ऐवजी कॉक्रीट रस्ते करावे. यातील क्र.८ चा रस्ता मंजूर झालेला आहे तो वगळून दुसरा रस्ता घ्यावा. डांबरीकरणा ऐवजी कॉक्रीट रस्ते करावे अधिकारी यांनी पाहणी करून ते रस्ते घ्यावे.

श्री.नंदकुमार घोडेले :मंजूर झालेला आहे. त्या ऐवजी सदस्य जो प्रस्ताव देतील तो घ्यावा. सुचक म्हणून सिध्दांत सिरसाट यांचे नाव घ्यावे.

कु.सायली जमादार :स.सदस्य जे रस्ते सुचवतील ते घ्यावे. नियमानुसार काम करावे. एमआयटी ते खंडोबा मंदीर पर्यंतचा रस्त्याची प्रोसेस चालू आहे. तेथील पाहणी करून निर्णय घ्यावा.

श्री.अप्पासाहेब हिवाळे :वार्डातील इन्टरनल रस्ते करावे. यासाठी नागरीक मागणी करतात. ड्रेनेजचे कामासाठी या भागात १००-२०० कोटीचा निधी लागेल. ते काम यानंतर करता येईल. जनतेच्या मागणीनुसार हे रस्ते टाकले आहे. मंजूर करावे.

श्री.त्र्यंबक तुपे :रुपये १७-१८ कोटी सिडकोकडे जमा आहे. नागरीकाचे पैसे आहे. त्या भागात विकास व्हावा. सातारा भागात मागिल एका कामाची वर्क आर्डर झाली. काम सुरू होईल डबल काम होऊ नये. एकमेकांना विश्वासात घेऊन काम करावे. मुख्य रस्ते व्हॉईट टॅपिंगचे करावे

श्री.राजू शिंदे :सर्वच रस्ते सिमेंटचे केले तर आणखी निधी लागेल. मनपाने काही निधी खर्च करावा. सर्वच रस्ते कॉक्रीटचे करावे. त्या भागासाठी पाणीपुरवठा सुध्दा करावा.

श्री.प्रमोद राठोड :राज्य शासनाकडून रु.१०० कोटीतून यातील काही मुख्य रस्ते घ्यावे व या प्रस्तावानुसार रु.८ कोटीत स.सदस्य जे रस्ते सजेस करतील ते घ्यावे.

मा.महापौर :यास दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते. टेक्नीकली बाबी संबधीत अभियंता यानी तपासून घ्याव्यात सर्व रस्ते करावे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सातारा-देवळाई भागातील मुख्य रस्त्यांची समस्या गंभीर असून सिडकोने मनपाकडे वर्ग केलेल्या र.रू.८.५० कोटी रक्कमेतून प्रस्तावीत खालील दर्शविलेल्या रस्त्यांची कामे करणेसाठी अंदाजपत्रके तयार करणे, निविदा प्रक्रिया करणे व प्रत्यक्ष काम करण्यास मंजुरी देण्यात येते.

१. रेणुकामाता मंदीर ते चाटे शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

२. शिवाजीनगर रेल्वेपटरी ते बीड बायपास देवळाई चौक ते देवळाई तांडा पर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे व नाल्यावर पुल बांधणे.
३. नाईकनगर ते विनायकनगर या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.
४. हॉटेल शिदोरी ते प्रकाश महाजन यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.
५. घराना फर्निचर ते श्री.प्रविण कुलकर्णी यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.
६. दत्त मंदीर ते हरीप्रसादनगर या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.
७. साईनाथनगर ते आलोकनगर या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.
८. एमआयटी कॉलेज, बीडबायपास ते सातारा गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे व्हॉईट टॉपींग करणे व आरसीसी पुल बांधणे.
९. सातारागावातील पुलापासून ते खंडोबा मंदीराकडे जाणाऱ्या रस्त्याचे व्हॉईट टॉपींग करणे व आरसीसी पुल बांधणे.
१०. कमलनयन बजाज हॉस्पीटल बीडबायपास ते सुधाकरनगरकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ११५१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७९ न्यायनगर, भुषणनगर सोसायटी मधील खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्षक बदलण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| **पान क्रमांक** | **जुने कामाचे नाव** | **नवीन कामाचे नाव** |
|---|---|---|
| SCR-WARD-6 P.No.45 Sr.No.2 | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत भुषणनगर सोसायटी येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. (र.रु.२० लक्ष) | १. त्याऐवजी वॉर्ड क्र.७९ भुषणनगर येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे-(र.रु. १२ लक्ष)<br>२. वॉर्ड क्र.७९ भुषणनगर व ८० फुटी रोडवरील ड्रेनेज लाईन टाकणे.(र.रु.०८ लक्ष) |
| | | एकुण र.रु.२० लक्ष |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे

मा.महापौर : विषय मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९ न्यायनगर, भुषणनगर सोसायटी मधील खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| **पान क्रमांक** | **जुने कामाचे नाव** | **नवीन कामाचे नाव** |
|---|---|---|
| SCR-WARD-6 P.No.45 Sr.No.2 | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत भुषणनगर सोसायटी येथील अंतर्गत रस्ते | १. त्याऐवजी वॉर्ड क्र.७९ भुषणनगर येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे-(र.रु. १२ लक्ष)<br>२. वॉर्ड क्र.७९ भुषणनगर व ८० फुटी रोडवरील ड्रेनेज |

| | | |
|---|---|---|
| | डांबरीकरण करणे.<br>(र.रु.२० लक्ष) | लाईन टाकणे. (र.रु.०८ लक्ष) |
| | | एकुण र.रु.२० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११५२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा, भिमनगर (दक्षिण) या भागात मोठ्या प्रमाणात दलित वस्ती असुन अनेक वर्षापासून मुलभूत सुविधा पासून वंचित असलेली वस्ती भावसिंगपुरा, भिमनगर या भागाअंतर्गत असलेल्या वस्त्या गावठाण, गितानगर, पंडीत कॉलनी, साठेनगर, मुक्ताईनगर, बॉबीनगर, दिपनगर, नवयुग कॉलनी, कानीफनाथ कॉलनी, प्रभात नगर, साईनगर या सर्व वसाहतीमध्ये अनेक वर्षापासून पिण्याचे पाणी, सिमेंट कॉंक्रीट रस्ते, ड्रेनेज लाईन, दिवा बत्ती, नाल्याचे संरक्षण भिंती, पुल बांधणे, वाचणालये उभारणे, स्मशान भुमी आर.सी.सी.शेड उभारणे, सामाजिक सभागृह उभारणे, व्यायाम शाळा उभारणे गरजेचे असून वरील सर्व सुविधांपासून भावसिंगपुरा, भिमनगर या भागातील नागरीकांना या सुविधांपासून बऱ्याच वर्षापासून वंचित असून वॉर्डातील नागरिकांची कळकळीची विनंती असून मा.सर्वसाधारण सभेमध्ये सन २०१७-१८ या वर्षाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी मिळण्या करीता प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठविण्यास्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक:- श्रीमती मनिषा विनोद लोखंडे अनुमोदक:- श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा, भिमनगर (दक्षिण) या भागातील भावसिंगपुरा, भिमनगर या भागाअंतर्गत असलेल्या वस्त्या गावठाण, गितानगर, पंडीत कॉलनी, साठेनगर, मुक्ताईनगर, बॉबीनगर, दिपनगर, नवयुग कॉलनी, कानीफनाथ कॉलनी, प्रभात नगर, साईनगर या सर्व वसाहतीमध्ये पिण्याचे पाणी, सिमेंट कॉंक्रीट रस्ते, ड्रेनेज लाईन, दिवा बत्ती, नाल्याचे संरक्षण भिंती, पुल बांधणे, वाचनालये उभारणे, स्मशान भुमी आर.सी.सी.शेड उभारणे, सामाजिक सभागृह उभारणे, व्यायाम शाळा उभारणे साठी सन २०१७-१८ या वर्षाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी मिळण्याकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११५३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या यशोधरा कॉलनी येथील शाळेत इयत्ता ८ वी पर्यंत वर्ग आहे या शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींची संख्या जास्त असुन नैसर्गिक वाढीने त्यांना इयत्ता ८ वी नंतर पुढील शिक्षणासाठी दुसऱ्या खाजगी शाळेत जावे लागते. या शाळेत इयत्ता ८ वीच्या ०२ तुकड्या असुन एकुण ३८ विद्यार्थी संख्या आहेत. या विद्यार्थ्यांची पुढे गैरसोय होऊ नये या करीता सन २०१७-१८ पासुन यशोधरा कॉलनी येथील महानगरपालिकेच्या शाळेत मराठी/ऊर्दु इयत्ता ०९ वी व १० वी चे वर्ग सुरु करण्यात यावे करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.खान इरशाद इब्राहीम **अनुमोदक:-** श्री.विकास प्रकाश एडके, श्रीमती शेख नरगीस सलीम

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या यशोधरा कॉलनी येथील महानगरपालिकेच्या शाळेत मराठी/ऊर्दु इयत्ता ०९ वी व १० वी चे वर्ग सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११५४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-१७ च्या स्थायी समितीने शिफारस केलेल्या Pro-Poor Budget New work P.No.४ वर दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलण्याकरीता

| | | |
|---|---|---|
| पृ.क्र.४ | अ.क्र.१ | वॉर्ड क्र.२८, स्वामी विवेकानंदनगर, एन-१२ अंतर्गत नामांतर कॉलनी सिध्दार्थनगर येथील रस्ता पुर्नडांबरीकरण करणे रक्कम रु.१०.०० लाख. |

सदरील कामाचे ५ वेळेस फेर निविदा करण्यात आली. हे काम करण्यास कुणी तयार नसुन करीता वरील कामाचे रक्कम एन-१२ डी सेक्टर येथील खुल्या जागेवर खुले सभागृह बांधणे व खुल्या जागेचे सुशोभीकरण करणे यासाठी वरील कामाची रक्कम वापरण्यास मंजुरी देण्यात यावी.

| |
|---|
| वॉर्ड क्र.२८, स्वामी विवेकानंदनगर, एन-१२ अंतर्गत डी सेक्टर येथील खुल्या जागेवर खुले सभागृह बांधणे व खुल्या जागेचे सुशोभीकरण करणे. रक्कम रु.१०.०० लाख. |

तरी, वरील सन २०१७-१८ मधील लेखा शिर्षक बदलण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सिमा गणपत खरात **अनुमोदक:-** श्री.सुरे सीताराम इसराम

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१६-१७ च्या स्थायी समितीने शिफारस केलेल्या Pro-Poor Budget New work P.No.४ वर दर्शविलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| पृ.क्र.४ | अ.क्र.१ | वॉर्ड क्र.२८, स्वामी विवेकानंदनगर, एन-१२ अंतर्गत नामांतर कॉलनी सिध्दार्थनगर येथील रस्ता पुर्नडांबरीकरण करणे रक्कम रु.१०.०० लाख. |

याऐवजी

| |
|---|
| वॉर्ड क्र.२८, स्वामी विवेकानंदनगर, एन-१२ अंतर्गत डी सेक्टर येथील खुल्या जागेवर खुले सभागृह बांधणे व खुल्या जागेचे सुशोभीकरण करणे. रक्कम रु.१०.०० लाख. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११५५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३६, नारेगाव, ब्रिजवाडी येथे १००% अल्पसंख्यांक नागरिक असलेल्या पॉवरलुम भागामध्ये गेल्या २० वर्षापासून महानगरपालिकेकडुन कोणतेही विकास काम झालेले नाही. त्यामुळे जवळपास १० गल्लीतील जवळपास ३००० ते ४००० नागरीक हे नागरी सुविधांपासून वंचित आहेत.

याकरीता मा.राज्य शासनाकडून अल्पसंख्यांक बहुल नागरीकांच्या वसाहतीसाठी जो दरवर्षी विकास कामासाठी निधी प्राप्त होतो. त्यामधून/त्याअंतर्गत पॉवरलुम या भागात ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी ५० लक्ष, विद्युत पथदिवेसाठी ३० लक्ष, पाण्याच्या लाईनसाठी २० लक्ष व कॉंक्रीटीकरण

करण्यासाठी ३० लक्षाची तरतुद करण्यासाठी प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती मा.जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे पाठविणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३६, नारेगाव, ब्रिजवाडी येथे शासनाकडून अल्पसंख्यांक बहुल नागरीकांच्या वसाहतीसाठी जो दरवर्षी विकास कामासाठी निधी प्राप्त यामधून/याअंतर्गत पॉवरलुम या भागात ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी ५० लक्ष, विद्युत पथदिवेसाठी ३० लक्ष, पाण्याच्या लाईनसाठी २० लक्ष व कॉंक्रीटीकरण करण्यासाठी ३० लक्षची तरतुद करण्यासाठी प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती मा.जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे पाठविणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११५६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत स्थळ बदलाचा व लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाच्या कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| | ०१. सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात एस.सी.आर. गार्डन पान क्र.७९ अनुक्रमांक ३७ वर सुराणानगर वॉर्ड अंतर्गत कॅनॉट गार्डन मध्ये पार्कींग व्यवस्था विकसीत करणे रु.३०.०० लक्ष.<br>०२. सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात एस.सी.आर. वॉर्ड ०७, पान क्र.५९ अनुक्रमांक ०७ वर वॉर्ड क्र.६५ येथील स्ट्रीट लाईट पोल व विविध कामे करणे रुपये २०.०० लक्ष पैकी रुपये १०.०० लक्षची कामे रद्द करणे.<br>०३. सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड ०७ पान क्र.६० अनुक्रमांक ०६ वर वॉर्ड क्र.६५ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे रुपये २० लक्ष पैकी रुपये १०.०० लक्षची कामे रद्द करणे. | १. वॉर्ड क्र.६५ अंतर्गत विद्यानिकेतन कॉलनी परिसरातील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, २५.०० लक्ष.<br>२. वॉर्ड क्र.६५ टाऊनसेंटर येथील डॉ.कोठारी यांच्या घरासमोरील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे रुपये २५.०० लक्ष. |

**सुचक:-**श्रीमती राखी प्रशांत देसरडा **अनुमोदक:-**श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६५ सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबतचा स्थळ बदलास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाच्या कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| | ०१. सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात एस.सी.आर. गार्डन पान क्र.७९ अनुक्रमांक ३७ वर सुराणानगर वॉर्ड अंतर्गत कॅनॉट गार्डन मध्ये पार्कींग व्यवस्था विकसीत करणे रु.३०.०० लक्ष.<br>०२. सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात एस.सी.आर. वॉर्ड ०७, पान क्र.५९ अनुक्रमांक ०७ वर वॉर्ड क्र.६५ येथील स्ट्रीट लाईट पोल व विविध कामे करणे रुपये २०.०० लक्ष पैकी रुपये १०.०० लक्षची कामे रद्द करणे.<br>०३. सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड ०७ पान क्र.६० अनुक्रमांक ०६ वर वॉर्ड क्र.६५ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे रुपये २० लक्ष पैकी रुपये १०.०० लक्षची कामे रद्द करणे. | १. वॉर्ड क्र.६५ अंतर्गत विद्यानिकेतन कॉलनी परिसरातील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, २५.०० लक्ष.<br>२. वॉर्ड क्र.६५ टाऊनसेंटर येथील डॉ.कोठारी यांच्या घरासमोरील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे रुपये २५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११५७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चंपा चौक ते जालना रोड विकास योजना रस्ता माझ्या वॉर्डामधून जात असुन या रस्त्यात माझ्या वॉर्डातील गोरगरीब रहिवासीयांचे घर बाधीत होत आहे. ज्यामुळे तेथील रहिवासी प्रभावित होणार असून त्यांच्यावर बेघर होण्याची कार्यवाही होणार असल्याने तसेच हा भाग गोरगरीब नागरिकांचा असून काही लोकांकडे मालकी हक्का बाबतची आखिव पत्रिका आहे. काही लोकांकडे जमिनीच्या मालकी बाबत नोटरी करारनामे आहे. तसेच सर्व रहिवासी मालमत्ता कराचा नियमीत भरणा करीत आहे.

त्यामुळे माझ्या वॉर्डातील रहिवासीयांचे विकास योजना रस्ता रुंदीकरणात बाधीत होणाऱ्या मिळकतीसाठी यापूर्वी महानगरपालिकेने मा.सर्वसाधारण सभा दिनांक १८.०२.२०१२ रोजी विषय क्र.६०६ अन्वये लक्ष्मण चावडी ते एम.जी.एम, फुले नगर, उस्मानपुरा, जयभिमनगर घाटी येथील नागरिकांना या ठरावानुसार मौजे हर्सुल येथील सर्वे क्र.२१६ व २१७ मध्ये रेखांकन करून ६०० चौ.फुट या आकाराचे प्लॉट देण्यात आले आहे. त्याच धरतीवर माझ्या वॉर्डातील रस्ता रुंदीकरणात बाधीत होणाऱ्या मिळकत धारकांना हर्सुल येथील सर्वे क्र.२१६ व २१७ मधील उर्वरित जागेमध्ये विस्तापीतांना स्थापित करण्यात यावे. जेणे करून त्यांच्यावर बेघर होण्याची वेळ येणार नाही.

करीता, यापूर्वीच्या मा.सर्वसाधारण सभा दि.१८.०२.२०१२ ठराव क्र.६०६ नुसार भुखंड देणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ **अनुमोदक:-**श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे

श्री.मनोज बल्लाळ :३० मीटरचा रस्ता १९७२ पासून डीपी प्लॅन मध्ये त्या नागरीकांची तेथे जुनी घरे आहेत. बांधीत होणारे नागरीकांना पर्यायी जागा देण्याची कार्यवाही करावी. जुन्या

शहरात हा सर्वांत मोठा रोड होईल. रु.१०० कोटीतील निधी या रस्त्यासाठी राखीव ठेवावा.

श्री.फेरोज खान :हा रस्ता होणार आहेच जालना रोडचे काम चालू होणार आहे. हा महत्वाचा रस्ता आहे. काम सुरू करावे. तेथील नागरीक शिफ्ट होण्यास तयार आहे. त्यांना पर्यायी जागा द्यावी.

श्री.त्र्यंबक तुपे :तेथील घरे रेग्युलर होत नाही. जुनी वसाहत आहे. मार्कींग केले पाहिजे. प्रमुख रस्ते शासन निधीतून घेणार आहे. तर या रस्त्यासाठी निधी वापरता येणार असेल तर विचार करावा. यापुर्वी ज्यांची घरे रस्त्यात गेली. त्यांना पर्यायी जागा दिली. त्याप्रमाणे या नागरीकांना द्यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :उस्मानपुरा, जयभीमनगर घाटी रस्ता रूंदीकरण केले, त्याप्रमाणेच हा रस्ता होणार. यात ३००-४०० कुटूंब बेघर होणार आहे. रस्ता करावा व त्या रस्त्यात बांधीत होणारे नागरीकांचे पुर्नवसन होणे आवश्यक आहे. गरीब व मजुरी करणारे लोक आहे.या लोकांना पंतप्रधान आवास योजनेनुसार किंवा शासकीय जमिनीवर प्लॉट देता येतील का? याप्रमाणे यांना प्रस्तापित करून रस्त्याचे काम करावे.

श्री.चेतन कांबळे :वार्ड १३ मध्ये १९६० पासूनचा डीपी रोड अतिक्रमण केले. तो रस्ता करावा. रु.१०० कोटीचा निधी आणला शहरातील तीन प्रमुख गेट मधून ट्रॅफिक जाम होते. त्या गेटच्या पुलाचे काम होत नाही.

श्रीमती शोभा वळसे :टी व्ही सेंटर जिजाऊ चौकापासून ते बळीराम हायस्कूलकडे जाणारा रस्त्यावरील अतिक्रमण काढावे.

श्रीमती अशा निकाळजे:माझे वार्डातील ५० फुटी डीपी रोडचे काम तातडीने करावे.

मा.महापौर :विषय मंजुर. या लोकांना योग्य न्याय देण्यासाठी आवश्यक मदत करू. फुले नगर, उस्मानपुरा येथील रस्त्यांचे रुंदीकरण केले. त्या लोकांना हर्सुल येथे पर्यायी जागा दिली. त्याप्रमाणे या नागरीकांना ज्या योजनेत बसत असतील त्या योजनेत घेऊन लाभ द्यावा.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५५ मधील चंपा चौक ते जालना रोड विकास योजना रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होणाऱ्या मिळकत धारकांना सर्वसाधारण सभा दिनांक १८.०२.२०१२ ठराव क्र.६०६ अन्वये लक्ष्मण चावडी ते एम.जी.एम, फुले नगर, उस्मानपुरा, जयभिमनगर घाटी येथील नागरिकांना मौजे हर्सुल येथील सर्वे क्र.२१६ व २१७ मध्ये रेखांकन करून ६०० चौ.फुट आकाराचे प्लॉट देण्यात आले त्याच धरतीवर या वॉर्डातील रस्ता रुंदीकरणात बाधीत होणाऱ्या मिळकत धारकांना हर्सुल येथील सर्वे क्र.२१६ व २१७ मधील उर्वरित जागेमध्ये विस्तापीतांना नियमाप्रमाणे स्थापित करण्याची कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११५८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सध्या औरंगाबाद महानगरपालिकेत बहुतांश अधिकारी सेवानिवृत्त झालेले असल्याने महानगरपालिकेत एका अधिकाऱ्यांकडे दोन पेक्षा जास्त पदभार असल्याने कामाचा व्याप जास्त झाल्याने अधिकाऱ्यांना प्रत्येक कामावर वेळ देता येत नसल्याने विकास कामे ठप्प झालेले आहे.

करीता, औरंगाबाद महानगरपालिकेतून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या कामाचा अनुभव पाहता त्यांना मनपा सेवेत मानधनावर नियुक्त करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सरीता अरुण बोर्डे **अनुमोदक:-**श्री. जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी

मा.महापौर :प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक ११५९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत स्थळ बदलाचा व लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड ०७ पान क्र.५६ वरील अनुक्रमांक ४३ वर वॉर्ड क्र.९९ अंतर्गत विश्वभारतीकॉलनी येथील मनोहर वाटीकेच्या मागील रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. रक्कम रुपये १५.०० लक्ष. | १. वॉर्ड क्र.९९ अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट रस्ते तयार करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. रुपये १५.०० लक्ष. |
| २. | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड ०७ पान क्र.५७ वरील अनुक्रमांक ४४ वर वॉर्ड क्र.९९ अंतर्गत तंत्रनगर येथील रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. रक्कम रुपये १५.०० लक्ष. | वॉर्ड क्र.९९ अंतर्गत तंत्रनगर येथील विविध ठिकाणी रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे रुपये १५.०० लक्ष. |
| ३. | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड ०७ पान क्र.५७ वरील अनुक्रमांक ४५ वर वॉर्ड क्र.९९ अंतर्गत जुनी त्रिमुर्ती शाळेच्या मागील रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. रक्कम रुपये २५.०० लक्ष. | वॉर्ड क्र.९९ अंतर्गत जुनी त्रिमुर्ती शाळे जवळील विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते व पेव्हर ब्लॉक बसविणे. रुपये २५.०० लक्ष. |
| ४. | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड ०७ पान क्र.५७ वरील अनुक्रमांक ४९ वर वॉर्ड क्र.९९ अंतर्गत पावन मंदिर परिसरातील रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे रक्कम रुपये २०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.९९ अंतर्गत पावन मंदिर परिसरातील विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. रुपये २०.०० लक्ष. |
| ५ | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड ०७ पान क्र.५७ वरील अनुक्रमांक ४७ वर वॉर्ड क्र.९९ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे रक्कम रुपये २०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.९९ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. रुपये २०.०० लक्ष. |

**सुचक:-**श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ **अनुमोदक:-**श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंढे

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पातील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड ०७ पान क्र.५६ वरील अनुक्रमांक ४३ वर वॉर्ड क्र.९९ अंतर्गत विश्वभारतीकॉलनी येथील मनोहर वाटीकेच्या मागील रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. रक्कम रुपये १५.०० लक्ष. | १. वॉर्ड क्र.९९ अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट रस्ते तयार करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. रुपये १५.०० लक्ष. |
| २. | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड ०७ पान क्र.५७ वरील अनुक्रमांक ४४ वर वॉर्ड क्र.९९ अंतर्गत तंत्रनगर येथील रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. रक्कम रुपये १५.०० लक्ष. | वॉर्ड क्र.९९ अंतर्गत तंत्रनगर येथील विविध ठिकाणी रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे रुपये १५.०० लक्ष. |
| ३. | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड ०७ पान क्र.५७ वरील अनुक्रमांक ४५ वर वॉर्ड क्र.९९ अंतर्गत जुनी त्रिमुर्ती शाळेच्या मागील रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. रक्कम रुपये २५.०० लक्ष. | वॉर्ड क्र.९९ अंतर्गत जुनी त्रिमुर्ती शाळे जवळील विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते व पेव्हर ब्लॉक बसविणे. रुपये २५.०० लक्ष. |
| ४. | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड ०७ पान क्र.५७ वरील अनुक्रमांक ४९ वर वॉर्ड क्र.९९ अंतर्गत पावन मंदिर परिसरातील रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे रक्कम रुपये २०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.९९ अंतर्गत पावन मंदिर परिसरातील विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. रुपये २०.०० लक्ष. |
| ५. | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड ०७ पान क्र.५७ वरील अनुक्रमांक ४७ वर वॉर्ड क्र.९९ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे रक्कम रुपये २०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.९९ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. रुपये २०.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११६०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नारेगाव वॉर्ड क्र.३५ अंतर्गत आनंदगाडे नगर मधील गरीब कुटूंबातील मंदा राधाकिसन दाभाडे यांचे रहाते घर मागील पंधरा दिवसापुर्वी जोरदार पाऊस झाल्यामुळे पाऊसाच्या पाण्यामध्ये घर कोसळून पडले व सुदैवाने त्यामध्ये कोणतीही जिवीत हानी झाली नाही. सध्या ते कुटूंब रस्त्यावर आले आहे. तरी मा.सर्वसाधारण सभेमध्ये त्या कुटूंबाला रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके **अनुमोदक:-**श्री.राजु रामराव शिंदे

मा.महापौर :विषय मंजुर. नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगाव वॉर्ड क्र.३५ अंतर्गत आनंदगाडे नगर मधील मंदा राधाकिसन दाभाडे यांचे रहाते घर मागील पंधरा दिवसापुर्वी जोरदार पाऊस झाल्यामुळे पाऊसाच्या पाण्यामध्ये घर कोसळून पडल्यामुळे यांच्या कुटूंबाला नियमाप्रमाणे रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११६१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या १४ माध्यमिक शाळेवर गेल्या ६ वर्षापासून तासिका तत्वावरील २२ माध्यमिक शिक्षक अध्यापनाचे कार्य करत असून तासिका तत्वावरील २२ माध्यमिक शिक्षक जाहिरात, बिंदुनामावली आरक्षणाचा विचार करून रितसर भरती केलेली असून दिनांक ०२.०३.२०१५ रोजीच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक ७६३ नुसार रितसर भरती केलेल्या तासिका तत्वावरील २२ माध्यमिक सहशिक्षक पदनाम देण्यात यावे याप्रकारचा ठराव मंजूर करण्यात आला होता या पदासाठी अनुज्ञेय वेतन श्रेणी रु.(९३००-३४८०० रु.ग्रेड पे ४३०० रु.) अशी आहे याप्रमाणे असून शासनाकडून अनुदान प्राप्त होईपर्यंत महानगरपालिकेच्या तिजोरीतून सहशिक्षकाच्या वेतन श्रेणीनुसार वेतन अदा करण्यात यावे. शिक्षकांच्या वेतन अनुदानासाठीचा प्रस्ताव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ (महाराष्ट्र शासन) यांच्याकडे प्रशासनाने (मनपा शिक्षण विभागाने) तात्काळ सादर करावा तोपर्यंत सहशिक्षकाच्या वेतन श्रेणीनुसार वेतन (९३००-४३८०० रु.ग्रेड पे ४३०० रु.) महानगरपालिकेच्या तिजोरीतून तात्काळ अदा करावे करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे **अनुमोदक:-**श्रीमती पुष्पा उत्तमराव रोजतकर

श्रीमती ज्योती नाडे :मनपाच्या माध्यमिक शाळेत ६ वर्षापासून २२ शिक्षक तासीका तत्वावर काम करीत असून या शिक्षकांना जाहिरात, बिंदुनामावली आरक्षणाचा विचार करून भरती केले होते तसा ठराव ही झाला परंतु अद्याप कार्यावाही केली नाही. विषय मंजूर करून शासनाकडे पाठवावे.

मा.महापौर :हे शिक्षक अनेक वर्षापासून काम करतात. शाळेचा दर्जा उंचाविण्याचे काम त्यांनी केले. त्यांचे काम चांगले असून एक प्रकारे त्यांच्यावर अन्याय होत आहे. सहानुभूतीपुर्वक विचार करून नियमानुसार कार्यवाही करावी. विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या तासिका तत्वावरील २२ माध्यमिक शिक्षक यांना जाहिरात, बिंदुनामावली आरक्षणाचा विचार करून रितसर भरती केलेले असून या सहशिक्षकांना पदनाम देण्यात यावे याप्रकारचा ठराव मंजूर करण्यात आला असुन या पदासाठी अनुज्ञेय वेतन श्रेणी रु.(९३००-३४८०० रु.ग्रेड पे ४३०० रु.) प्रमाणे असून शासनाकडून अनुदान प्राप्त होईपर्यंत महानगरपालिकेच्या तिजोरीतून सहशीक्षकाच्या वेतन श्रेणीनुसार वेतन अदा करण्याबाबत तसेच शिक्षकांच्या वेतन अनुदानासाठीचा प्रस्ताव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ (म्शहाराष्ट्र शासन) यांच्याकडे प्रशासनाने (मनपा शिक्षण विभागाने) सादर करण्यास व सदर सहशिक्षकांना वेतन देण्याबाबत सहानुभूती पुर्वक विचार करून नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११६२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २०१७-१८ मध्ये वॉर्ड क्र.०३ अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलणे आवश्यक आहे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील लेखाशिर्ष | नविन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१ | **स्मशानभूमी विकास**<br>वॉर्ड क्र.३ अंतर्गत असलेल्या स्मशानभूमीस वॉल कम्पाऊंड करणे व विकसीत करणे. र.रु.१५.०० लक्ष<br>पान क्र.एससीआर-वॉर्ड क्र.०४ P.No.३३ अ.क्र.१ | वॉर्ड क्र.३ अंतर्गत विविध ठिकाणी पोलसह एलईडी फिटींग लावणे. र.रु.१५.०० लक्ष. |

**सुचक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०३ मधील अर्थसंकल्प सन २०१७-१८ अंतर्गत असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील लेखाशिर्ष | नविन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१ | **स्मशानभूमी विकास**<br>वॉर्ड क्र.३ अंतर्गत असलेल्या स्मशानभूमीस वॉल कम्पाऊंड करणे व विकसीत करणे. र.रु.१५.०० लक्ष<br>पान क्र.एससीआर-वॉर्ड क्र.०४ P.No.३३ अ.क्र.१ | वॉर्ड क्र.३ अंतर्गत विविध ठिकाणी पोलसह एलईडी फिटींग लावणे. र.रु.१५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११६३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर, पुंडलिकनगर, हुसेन कॉलनी मधील खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्षक बदलण्या बाबतच्या प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| पान क्रमांक | जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव |
|---|---|---|
| SCR-WARD-6 P.NO.51 S.r.No.4 | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे.<br>रक्कम रुपये (१८ लक्ष.) | १. त्याऐवजी वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत नेहरुनगर येथे विद्युत पथदिवे बसविणे. र.रु.(०५ लक्ष).<br>२. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत पुंडलिकनगर पश्चिम येथे विद्युत पथदिवे बसविणे. र.रु.(०५ लक्ष).<br>३. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत हुसेन कॉलनी येथे पथदिवे बसविणे.र.रु.(०५ लक्ष).<br>४. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत फॉरेस्ट कॉलनी येथे विद्युत पथदिवे बसविणे. र.रु.(०३ लक्ष). |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर, पुंडलिकनगर, हुसेन कॉलनी येथे खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक | जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव |
|---|---|---|
| SCR-WARD-6 P.NO.51 S.r.No.4 | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे.<br>रक्कम रुपये (१८ लक्ष.) | १. त्याऐवजी वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत नेहरुनगर येथे विद्युत पथदिवे बसविणे. र.रु.(०५ लक्ष).<br>२. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत पुंडलिकनगर पश्चिम येथे विद्युत पथदिवे बसविणे. र.रु.(०५ लक्ष).<br>३. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत हुसेन कॉलनी येथे पथदिवे बसविणे.र.रु.(०५ लक्ष).<br>४. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत फॉरेस्ट कॉलनी येथे विद्युत पथदिवे बसविणे. र.रु.(०३ लक्ष). |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११६४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७४ येथे नागरीकांच्या मागणीनुसार व त्यांच्या सोयीकरीता खालील नमुद तक्त्यामधील लेखाशिर्षक तसेच स्थळ बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| सन २०१७-१८ मधील मा.स्थायी समितीने शिफारस केलेली कामे | रक्कम रु. (हजारात) | च्या ऐवजी | रक्कम रु. (हजारात) |
|---|---|---|---|
| **लेखाशिर्षक:** नविन पथदिवे व्यवस्था पोलसहित<br>१. वॉर्ड क्र.७४ अंतर्गत विविध विद्युत व्यवस्था करणे व दुरुस्त करणे.<br>SCR-Ward-9, P.No.73 | २००० | वॉर्ड क्र.७४ अंतर्गत विश्वभारती कॉलनी येथील रस्त्यालगत पाथ-वे तयार करणे. | १००० |
| **लेखाशिर्षक:** नविन उद्याने<br>२५. वॉर्ड क्र.७४ अंतर्गत असलेले विविध उद्याने विकसीत करणे.<br>SCR-Ward-9, P.No.78 | १००० | वॉर्ड क्र.७४ अंतर्गत मुख्य रस्त्या लगत पाथ-वे तयार करणे. | १००० |

**सुचक:-** श्री.नितीन दशरथ साळवी **अनुमोदक:-** श्री.आत्माराम माणिकराव पवार

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७४ येथे नागरीकांच्या मागणीनुसार व त्यांच्या सोयीकरीता खालील नमुद तक्त्यामधील लेखाशिर्षक तसेच स्थळ बदलास मंजुरी देण्यात येते.

| सन २०१७-१८ मधील मा.स्थायी समितीने शिफारस केलेली कामे | रक्कम रु. (हजारात) | च्या ऐवजी | रक्कम रु. (हजारात) |
|---|---|---|---|
| **लेखाशिर्षक:** नविन पथदिवे व्यवस्था पोलसहित | २००० | वॉर्ड क्र.७४ अंतर्गत विश्वभारती कॉलनी येथील रस्त्यालगत पाथ- | १००० |

| | | | |
|---|---|---|---|
| २. वॉर्ड क्र.७४ अंतर्गत विविध विद्युत व्यवस्था करणे व दुरुस्त करणे. SCR-Ward-9, P.No.73 | | वे तयार करणे. | |
| **लेखाशिर्षक:** नविन उद्याने २५. वॉर्ड क्र.७४ अंतर्गत असलेले विविध उद्याने विकसीत करणे. SCR-Ward-9, P.No.78 | १००० | वॉर्ड क्र.७४ अंतर्गत मुख्य रस्त्या लगत पाथ-वे तयार करणे. | १००० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११६५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील वॉर्ड क्र.७२ येथे क्रांतीचौक करीता असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्रमांक | अ.क्र | जुने कामांचे नाव | नविन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| SCR-Ward-9, P.No.73 | ४७ | फाल्गुणी अपार्टमेंट समोरील रस्त्यास कॉंक्रीटींग करणे रु.१० लक्ष. | खेमणार यांच्या घरापासुन ते पवन गॅस गोडावून पर्यंत रु.१० लक्ष. |

**सुचक:-** श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर **अनुमोदक:-** श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७२ येथील क्रांतीचौक येथे खालील प्रमाणे कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक | अ.क्र | जुने कामांचे नाव | नविन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| SCR-Ward-9, P.No.73 | ४७ | फाल्गुणी अपार्टमेंट समोरील रस्त्यास कॉंक्रीटींग करणे रु.१० लक्ष. | खेमणार यांच्या घरापासुन ते पवन गॅस गोडावून पर्यंत रु.१० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११६६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो.बुढ्ढीलेन, कबाडीपुरा, जुना बाजार, आसेफिया कॉलनी, आरेफ कॉलनी, हिलाल कॉलनी, जलाल कॉलनी या भागातील नागरीकांना पाणी पुरवठा बरोबर होत नाही, येथील नागरीक वारंवार तक्रार करीत आहे.

करीता, कमळ तलावाच्या बाजुला एक ३० लाख लीटर पाण्याची टाकी बांधण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती परवीन कैसर खान **अनुमोदक:-** श्री.सय्यद मतीन रशीद

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.बुढ्ढीलेन, कबाडीपुरा, जुना बाजार, आसेफिया कॉलनी, आरेफ कॉलनी, हिलाल कॉलनी, जलाल कॉलनी या भागातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्याकरीता कमळ

तलावाच्या बाजुला एक ३० लाख लीटर पाण्याची टाकी बांधण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११६७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०५ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र व पान क्रमांक | मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील मंजुर कामांचे नाव | या कामासाठी लेखाशिर्ष बदलण्यात यावे |
|---|---|---|
| एस.सी.आर.वॉर्ड ०८, पान क्र.६५, अ.क्र..२३ | वॉर्ड क्र.१०५ अंतर्गत रेल्वे ब्रिज ते राहुलनगरकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर व्हाईट टॉपिंग करणे. आर्थिक तरतुद रु.८० लक्ष. | १. वॉर्ड क्र.१०५ अंतर्गत सादातनगर गल्ली नं.८ व आडव्या गल्ल्यामध्ये ट्रिमिक्स कॉंक्रेटींग करणे. रु.२० लक्ष |
| | | २. वॉर्ड क्र.१०५ अंतर्गत सादातनगर गल्ली नं.९ मध्ये ट्रिमिक्स कॉंक्रेटींग करणे. रु.२० लक्ष |
| | | ३. वॉर्ड क्र.१०५ अंतर्गत सादातनगर गल्ली नं.१० चे आडव्या गल्ल्यामध्ये ट्रिमिक्स कॉंक्रेटींग करणे. रु.२० लक्ष |
| | | ४. वॉर्ड क्र.१०५ अंतर्गत सादातनगर, राहुलनगर भागात विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे व ड्रेनेजचे कामे करणे. रु.२० लक्ष. या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |

**सुचक:-** श्री.अब्दुल मं.नावीद अब्दुल रशीद **अनुमोदक:-** श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

मा.महापौर :या विषयावर श्रीमती मुल्ला सलीमा बेगम यांनी आक्षेप घेतला आहे की, माझ्या वार्डातील हा विषय आहे.

श्रीमती मुल्ला सलीमा बेगम:यास माझा विरोध आहे.

श्री.अब्दुल मं.नाविद :बजेट बुक मध्ये काम कोणत्या वार्डातील आहे. प्रत्यक्ष बघितल्यास लक्षात येईल. ऑलरेडी डांबरीकारणासाठी बजेट घेतलेले आहे.

श्रीमती मुल्ला सलीमा बेगम:जो लेखाशिर्ष बदलण्यात येत आहे त्यासाठी स.सदस्यांची सहमती घेतली काय?

श्री.अब्दुल म.नावीद :बजेट बुक मध्ये वाचावे बजेट मध्ये यासाठी तरतुद आहे.प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.नंदकुमार घोडेले :संबंधीत अभियंता यांनी प्रत्यक्ष तेथे जाऊन पाहणी करावी. कोणत्या वार्डात येते. त्यानंतर संबंधीत सदस्य यांचेशी संपर्क करून माहिती घ्यावी. त्यानंतर मंजूरी द्यावी.

श्रीमती सलीमा बेगम :स्थगिती द्यावी संबंधीत सदस्यांची मान्यता घेतली नाही. स्थळ पाहणी करावी.

मा.महापौर :संबंधीत वार्ड अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी. हा रस्ता कोणत्या वार्डात येतो? बजेट बुक मध्ये कोणत्या वार्डासाठी तरतुद आहे? कोणत्या लेखाशिर्षकामध्ये आहे? याची माहिती घ्यावी. त्यानंतर कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत वार्ड अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन हा रस्ता कोणत्या वार्डात येतो? बजेट बुक मध्ये कोणत्या वार्डासाठी तरतुद व कोणत्या लेखाशिर्षकामध्ये आहे याची माहिती घेऊन कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक ११६८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१३, भिमनगर, भावसिंगपुरा (उत्तर) या भागातील विकास कामे करणे अत्यंत आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | विकास कामाचे नांव |
|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१३, भिमनगर, भावसिंगपुरा सर्व्हे नं.२७ पेठेनगर येथील ५० फुटी डी.पी. रोड समोरील मनपाच्या खुल्या जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने भिमनगर, भावसिंगपुरा वॉर्ड क्र.१३ येथील ३५० सुशिक्षित बेरोजगार तरुण/तरुणीकरीता व्यापार संकुल उभारण्यात यावे. |

**सुचक:-** श्रीमती आशा विजय निकाळजे **अनुमोदक:-** श्रीमती आशा नरेश भालेराव

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यांनी जागेची माहिती घ्यावी व नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत संबंधीत अधिकारी यांनी जागेची माहिती घ्यावी व नियमानुसार कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक ११६९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१३, भिमनगर, भावसिंगपुरा (उत्तर) या भागातील विकास कामे करणे अत्यंत आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | विकास कामाचे नांव |
|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१३, भिमनगर, भावसिंगपुरा (उत्तर) सर्व्हे नं.४६ हा पुर्णतः स्लम एरिया असुन या ठिकाणी ९०० घरांची वसाहत आहे. येथील नागरीकांना पी.आर.कार्ड मिळण्याची प्रक्रिया सुरु असून शासकीय मोजणी फिस रु.५,२२,०००/- आहे. ती भरण्यासाठी माझ्या स्वेच्छा निधीतून ही रक्कम शासकीय मोजणी कार्यालयास देण्यात यावी. |

**सुचक:-** श्रीमती आशा विजय निकाळजे **अनुमोदक:-** श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे

श्री.भाऊसाहेब जगताप:मुकूंदवाडी चिकलठाणा नारेगाव असेल या भागात आजपर्यंत पीआर कार्ड नाही.

श्री.राजू शिंदे :शासनाच्या पीआर कार्डचा व महापालिकेचा काहीही संबंध येत नाही.

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत नियमानुसार कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक ११७०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१३, भिमनगर, भावसिंगपुरा (उत्तर) या भागातील विकास कामे करणे अत्यंत आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | विकास कामाचे नांव |
|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१३, भिमनगर, भावसिंगपुरा सर्व्हे नं.३२ येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यामध्ये शहीद झालेल्या विरांचे तसेच हा लढा यशस्वी |

| | |
|---|---|
| | करण्यासाठी कष्ट घेतलेल्या नेते व स्वयंसेवकांचे पुढील पिढीला स्मरण राहावे याकरीता सर्व्हे नं.३२, भिमनगर येथील ०२ एकर जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्याचे संग्रहालय तयार करण्यात यावे. |

**सुचकः-** श्रीमती आशा विजय निकाळजे **अनुमोदकः-** श्रीमती आशा नरेश भालेराव

मा.महापौर :प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठरावः-**

प्रस्तुत प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्रमांक ११७१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रामनगर-विठ्ठलनगर अंतर्गत जालना रोड ते शाहूनगर या २४ मीटर रुंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१५-१६ च्या दरसुचीनूसार र.रु.२,४८,९२,८५३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता प्राप्त आहे. या कामाचा खर्च शासकीय अनुदानातून प्रस्तावीत आहे.

करीता, अंदाजपत्रक र.रु.२,४८,९२,८५३/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रामनगर-विठ्ठलनगर अंतर्गत जालना रोड ते शाहूनगर या २४ मीटर रुंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.२,४८,९२,८५३/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११७२:-** **(आस्थापना अधिकारी-१)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधास मान्यता मिळणेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास मा.सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.९६२ दिनांक १७.०३.२०१७ अन्वये आकृतीबंधासह सेवा प्रवेश नियमातही दुरूस्त्या करणेबाबत मान्यता देण्यात आली होती. परंतु, दिनांक ०७.०७.२०१७ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये झालेल्या चर्चेमध्ये स.सदस्यांनी विविध सुचना मांडल्या. त्यामध्ये प्रामुख्याने आकृतीबंधामध्ये सफाई कामगार या पदाचा समावेश करणेच्या सुचना आहेत. त्यानुषंगाने येत्या सर्वसाधारण सभेत आकृतीबंधा सोबतच सेवा प्रवेश नियमास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव ठेवणेबाबत निर्णय घेण्यात आला. तद्नुषंगाने विविध वॉर्ड कार्यालयांनी अतिरीक्त मागणी केल्याप्रमाणे आकृतीबंधामध्ये सफाई कामगारांची ३२२ पदे वाढविण्यात आली आहेत.

औरंगाबाद महानगरपालिकेत सद्यस्थितीत गट-अ ते गट-ड संवर्गातील मंजुर पदे, भरलेली पदे, रिक्त पदे व नवनिर्मीत पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| सद्यस्थितीत मंजुर पदे | एकुण भरलेली पदे | एकुण रिक्त पदे | नवनिर्मित पदे | सद्यस्थितीत मंजुर व नवनिर्मित पदांची एकुण संख्या |
|---|---|---|---|---|
| ४,७९९ | ४,१४० | ६५९ | २,११७ | ६,९१६ |

यापुर्वी सादर केलेल्या आकृतीबंधामध्ये नमुद केलेली पदसंख्या ही महानगरपालिका आस्थापनेवरील एकुण ४७९९ मंजुर पदांव्यतिरीक्त नवनिर्मित २,११७ पदांचा समावेश करण्यात आला आहे. त्यास मान्यता मिळाल्यास एकुण ६,९१६ पदे होतील. लेखा विभागाच्या दिनांक ३०.०३.२०१७ रोजीच्या पत्रानुसार सन २०१५-१६ चा महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ३०.४२% असुन सदरची वाढीव पदे ही आगामी काळात शहरातील वाढती लोकसंख्येचा विचार करून आवश्यकतेनुसार आस्थापना खर्चाच्या मर्यादेत टप्प्या टप्प्याने भरण्यात येतील.

करीता सोबतच्या परिशिष्ट-अ नुसार सुधारित आकृतीबंधास मान्यता मिळणेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ सादर.

श्रीमती समीना शेख :महत्वाचा प्रस्ताव असतांना ऐनवेळी का आला? आता दोन तास अगोदर प्रस्ताव मिळाला. अभ्यासासाठी वेळ द्यावा. त्यानंतर हा पुढील सभेत प्रस्ताव घ्यावा.

श्री.अफसर खान :दैनिक वेतन कर्मचारी २०-२५ वर्षापासून काम करीत आहेत. त्यांचे पदाचा यात कुठेही उल्लेख नाही. त्यांचा समावेश करून प्रस्ताव यावा.

श्री.राजगौरव वानखेडे:मागिल बैठकीत यावर चर्चा झाली. रोजंदारी कर्मचारी यांचा यात समावेश केला नाही. नाशिक,सोलापूर,मालेगाव,नागपूर,नगर महापालिकेतील रोजंदारी कर्मचारी यांना सेवेत कायम केले आहे. या मनपातील २०४ अस्थायी कर्मचारी यांचा यात नावासहीत प्रस्ताव असावा शासनाकडे पाठवावे.

श्री.अफसर खान :सोलापूर मनपातील कर्मचारी यांना ठराव घेवून शासनाकडे पाठविला व त्यास मंजूरी घेऊन तेथील कर्मचारी यांना कायम केले. अशाच प्रकारचा प्रस्तावाची एक प्रत मा.आयुक्त यांचेकडे देत आहे तसा प्रस्ताव आणून मंजूरी घ्यावी शासनाकडे पाठवावे. २०-२५ वर्षापासून या मनपात कर्मचारी अस्थायी सेवा करीत आहे. त्यांचा विचार करावा.

मा.महापौर :या विषयावर स्वतंत्र बैठक लावण्यात येईल.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत स्वतंत्र बैठक आयोजीत करण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्रमांक ११७३:-** **(आस्थापना अधिकारी-१)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५६(१) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचे मॉडेल सेवा प्रवेश नियम तयार करण्याबाबत शासनाकडून वेळोवेळी आदेश व निर्देश प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेचे प्रारुप सेवा प्रवेश नियम तयार करून दिनांक ०२.०१.२०१५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करुन हरकती व सुचना मागविण्यात आल्या होत्या व प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांवर निर्णय घेण्यासाठी दिनांक २१.०५.२०१५ रोजीच्या आदेशान्वये ०६ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती.

तद्नुषंगाने एकुण ३० अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या हरकती/सुचना प्राप्त झाल्या होत्या. त्यावर समितीने संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिनांक ०५.०६.२०१५ रोजी सुनावणी देऊन घेतलेल्या निर्णयाची प्रत यासोबत परिशिष्ट-A वर जोडली आहे. समितीने घेतलेल्या निर्णयानुसार राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमात आवश्यक त्या ठिकाणी (अ.क्र.४,१०,३६,३७,४५, ११४,१२२,१२३,१७७,१८१,१८२) बदल करण्यात आलेले आहेत. सुधारित महाराष्ट्र महानगरपालिका सेवा प्रवेश नियमाची प्रत यासोबत परिशिष्ट-B वर जोडली आहे.

दिनांक ०७.०७.२०१७ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने दिलेल्या निर्देशानुसार अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सेवा प्रवेश नियमाबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या.

करीता, सोबतच्या परिशिष्ट-B नुसार सुधारित महाराष्ट्र महानगरपालिका सेवा प्रवेश नियमास मान्यता मिळणेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.महापौर :हा सेवा भरती नियमाचा विषय आहे आकृती बंध विषया बरोबर हा विषय घेतला जाईल. स्वतंत्र बैठकीत घेऊ.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत आकृतीबंधाच्या विषयासोबत हाही विषय स्वतंत्र बैठकीत घेण्यास मंजुरी देण्यात आली.

**<u>विषय क्रमांक ११७४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे चिकलठाणा येथील सरकारी मालकीचे गट क्रमांक २१६,२१७ व २१८ हे सन-१९९१ चे मंजुर विकास योजनेनुसार आरक्षण क्रमांक ११ विटभट्टी (Brick Kiln) या वापरासाठी आरक्षीत आहे. सदर विकास योजना सुधारित करण्याचे काम सुरु असून त्या अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार प्रारुप विकास योजना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यात सदर क्षेत्र हे आरक्षण सी-२० पार्क या वापरासाठी प्रस्तावित केले आहे.

या आरक्षणाचे एकुण क्षेत्र ५० एकर एवढे आहे. मात्र प्रारुप सुधारित विकास योजना प्रसिध्द झाल्यानंतर मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे आव्हान देण्यात आले असता मा.उच्च न्यायालय यांनी ही कार्यवाही रद्दबातल ठरविली आहे. या निर्णयास मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

उपरोक्त आरक्षणाच्या क्षेत्रापैकी ६० आर एवढी गट क्रमांक २१८ मधील उत्तर-पुर्व कोपऱ्यातील शिव रस्त्यास लागुन असलेले क्षेत्र महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) यांना ३३ के.व्ही.उपकेंद्रासाठी देण्यासाठी मंजुर विकास योजनेतील आरक्षणात बदल करावा या बाबत मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी दि.२३.०५.२०१६ रोजी पत्र देऊन सुचित केले आहे. या उपकेंद्रामुळे या सर्वच रहिवाशी, वाणिज्य, औद्योगिक व वैद्यकीय प्रकल्पासाठी लाभ होणार आहे. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल प्रस्ताव विषय क्र.९०० नुसार दि.१८.०२.२०१७ (का.प.क्र.३५) रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये सादर करण्यात आला. यास सर्वसाधारण सभेची मान्यता झाली व ठरावानुसार याबाबत पुढील कार्यवाही अंतर्गत अधिसूचना ही दैनिक लोकमत, दैनिक पुण्यनगरी या दि.२३.०५.२०१७ रोजी व दि.०१.०६.२०१७ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये जाहीर प्रसिध्दीस देण्यात आले. ३० दिवसाच्या विहीत मुदतीमध्ये याबाबत एकही लेखी सुचना व आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही.

करीता, उक्त गौण फेरबदल मसुदा/प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव पाठविणे आहे. त्यासाठी सदर फेरबदल प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यास अंतिम मंजुरी व पुढील कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

प्र.सहा.संचालक(न.र):गट नं २१८ चिकलठाणा हे जुन्या मंजूर विकास योजनेनुसार विटभट्टयासाठी आरक्षीत होते.

श्री.रामेश्वर भादवे :न्यायप्रविष्ठ प्रकरण आहे तर चर्चा करता येते का?

श्री.रेणुकादास वैद्य :आरक्षण हटविण्यासंदर्भात मा.न्यायालयाच्या सुचना काय आहे?

प्र.सहा.संचालक(न.र):हा प्रस्ताव ऑलरेडी मंजूर केला. सुचना हरकती मागविल्या होत्या. एकही ऑब्जेक्शन नाही. म्हणून कायम करण्यासाठी हा प्रस्ताव ठेवला

श्री.रेणुकादास वैद्य :आरक्षण हटवायचे आहे. असे दिले. आरक्षण बदलायला. मा.कोर्टाने मज्जाव केला असतांना असा प्रस्ताव घेता येतो का?

प्र.सहा.संचालक(न.र):या बाबत लिगल ओपनियन घेतले. मा.कोर्टाचे निर्देश हे डी रिझर्व साठी आहे ते आपण चेंज करीत नाही. आरक्षणाचा पर्पज चेंज करीत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :कन्टेम्ट ऑफ कोर्ट होणार नाही का?

उपअभियंता :तसे होणार नाही. लिगल ओपनियन घेतले आहे.

श्री.राजू शिंदे :कन्टेम ऑफ कोर्ट झाल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहिल. ही जागा एमएसईबीला कशा प्रकारे देणार आहे?

उपअभियंता :ही शासकीय जागा आहे. शासन देणार आहे.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे चिकलठाणा येथील सरकारी मालकीचे गट क्रमांक २१६,२१७ व २१८ या आरक्षणाच्या क्षेत्रापैकी केवळ गट क्र.२१८ मधील उत्तर-पुर्व कोपऱ्यातील शिव रस्त्यास लागुन असलेले ६० आर एवढे क्षेत्र महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) यांना ३३ के.व्ही.उपकेंद्रासाठी देणे असल्याने मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून नियमाप्रमाणे केवळ तेवढ्या क्षेत्रापुरता गौण फेरबदलाचा मसुदा/प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास अंतिम मंजुरी देण्यात येते. तसेच पुढील कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११७५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सद्यस्थितीत औरंगाबाद शहरातील शहर बस वाहतुक राज्यपरिवहन महामंडळा मार्फत चालविण्यात येत असून एस.टी.महामंडळ केवळ ३२ बसेसच्या माध्यमातुन ही सेवा पुरवित आहे. औरंगाबाद शहर स्मार्ट सिटी होण्याच्या दृष्टीने सक्षम सार्वजनिक परिवहन व्यवस्था असणे अत्यंत गरजेचे आहे. शहर बस वाहतुक सेवा सक्षम करण्याच्या दृष्टीने शहरातील प्रमुख अंतर्गत रस्त्यांवर महानगरपालिकेच्या वतीने १३ मिनी बसेस (आसन क्षमता ३४) सुरु करण्यात आल्या तर सार्वजनिक परिवहन व्यवस्थेत सुधारणा करणे शक्य होणार आहे. तसेच पर्यटकांच्या सुविधेसाठी वेरुळ, अजिंठा या मार्गावर देखील किमान ०२ वातानुकूलीत लक्झरी बसेस (०१ बस ४० आसन क्षमतेची व ०१ बस १९ आसन क्षमतेची) सुरु करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या वतीने शहर बस वाहतुक सेवेसाठी १३ मिनिबसेस खरेदी करण्याच्या दृष्टीने महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, टाटा मोटर्स, स्वराज माजदा, अशोक लिलॅन्ड इत्यादी उत्पादक कंपन्यांच्या स्थानिक डिलर्स कडून दरपत्रके मागविण्यात आली आहेत. तुलनात्मक दृष्ट्या महिंद्रा कंपनीच्या टुरिस्टर या मॉडेलचे दर सर्वात कमी म्हणजेच रुपये १९,२७,४२५/- प्रतिबस असुन १३ बसेस खरेदीसाठी रुपये २,५०,५६,५२५/- खर्च अपेक्षीत आहे. तसेच लक्झरी बसेसपैकी ४० आसन क्षमता असलेली महिंद्रा कंपनीची बस (एअर सस्पेन्शन, वातानुकूलीत, बॅकरेस्ट सिट) खरेदी करण्यासाठी रुपये २७,७३,०८७/- आणि १९ आसन क्षमता असलेली स्वराज माजदा कंपनीची बस (वातानुकूलीत पुशबॅक सिट) खरेदी करण्यासाठी रुपये २०,४२,०८३/- खर्च अपेक्षित आहे. या प्रमाणे १३ सिटी बसेस व ०२ लक्झरी बसेस खरेदी करण्यासाठी सध्याच्या दराने रुपये २,९८,७१,६९५/- खर्च अपेक्षित असून वास्तविक खरेदीच्या वेळी या दरात वाढ होवू शकते. तसेच या बसेसचे आरटीओ फिटनेस पासिंग करून घेण्यासाठी आणि इंशुरन्ससाठी वेगळा खर्च येणार आहे. भविष्यातील संभाव्य दरवाढ व अंशुरन्स/आरटीओ पासिंगसाठी होणारा खर्च विचारात घेता शहर बस वाहतुक सुविधा सक्षम करण्यासाठी महानगरपालिकेस रुपये ३५० लक्ष निधीची आवश्यकता भासणार आहे. सदरील निधीच्या उपलब्धतेसाठी महाराष्ट्र शासनाच्या “नाविण्यपूर्ण योजना” या योजने अंतर्गत प्रस्ताव सादर करणे उचित होणार आहे.

करीता, औरंगाबाद शहरातील शहर बस वाहतुक सक्षम करण्याच्या दृष्टीने बसेस खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नाविण्यपूर्ण योजना या योजने अंतर्गत रुपये ३५० लक्ष निधी मिळण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रस्ताव कोणी ठेवला? खुलासा करावा.

कार्य.अभियंता(श्री.सिकंदर अली):३४ बसेस एमएसआरडीसी मार्फत होत आहे. त्यांनी काही रूट बंद केले. यात १५ बसेस ठराव दिला. २.५८ कोटी बसेससाठी लागणार. नाविन्यपुर्ण योजनेमध्ये हा प्रस्ताव दिला. डीपीडीसीकडून यासाठी पैसे घेण्याचा प्रयत्न करीत आहोत.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.परीवहन मंत्री महोदय व माझे बोलणे झाले. एस.टी.महामंडळ या बाबतीत काहीही कार्यवाही करणार नाही. ही सेवा मनपानेच दिली पाहिजे. असे म्हटले होते. या प्रस्तावात असंख्य चुका, एक तर १३ बसेसच का ठरविल्या? कोठे कोठे त्या देणार आहे? या शहराच्या नागरीकांना ही सेवा दिली पाहिजे. विरोध नाही. बाकीची व्यवस्था काय असणार?कशी करणार? हे प्रस्तावात यायला पाहिजे होते.

कार्य.अभियंता :जे रूट १३ बंद केले, त्यासाठी बस घेत आहोत. पुर्ण शहरामध्ये नंतर बसेस येईल. एमएसआरडीसीच चालणार आहे.

श्री.दिलीप थोरात :१३ बस घेऊन चालविणार कोण आहे? यंत्रणा कोण राबविणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :ते चालविणार एनओसी आहे का? चुकीचा व काही माहिती नसतांना खुलासा करीत आहे. चांगला डिपीआर तयार करावा. जास्तीच्या बसेस घ्याव्यात. शासन पैसे देणार आहे.

श्री प्रमोद राठोड :यात एक्स्प्रेशन ऑफ इन्ट्रेस कॉल केले पाहिजे. काय काय करणार आहे? सर्व ॲड करावे.

| | |
|---|---|
| श्री.रेणुकादास वैद्य | :डीपीआर करावा. किती बस लागणार आहे? मनपाची तयारी काय आहे? खाजगी लोकांची मदत घेणार काय? सर्व यावे. |
| मा.आयुक्त | :शहरातील नागरीकांना सोय व्हावी. यासाठी प्रस्ताव दिला. टप्प्या-टप्पयाने हे करणार आहोत. यासाठी स्मार्ट सिटी डीपीडीसीकडून निधी मिळेल. याची सांगड घालून हे करीत आहे. ही सुरूवात आहे. शासनाकडून पैसे मिळत असेल तर प्रस्ताव पाठविण्यास हरकत नसावी. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :पुर्ण शहरासाठीचे नियोजन करावे. प्लॅनींग होत नाही, त्यामूळे योजना पुर्ण होत नाही. मागतांना १३ च बस का मागतो? पुर्ण नियोजन करावे. |
| कार्य.अभियंता | :१३ रूट बंद झाले म्हणून १३ बस घेत आहोत. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :स्मार्ट सिटीशी याची सांगड कशी घालणार आहे? एक तर पुर्ण नियोजन करून हे समोर यावे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :पुर्ण शहराचे प्लॅनींग करावे स्मार्ट सिटीकडे हे शहर जात आहे. यात कंपनीचे नाव दिले ते योग्य वाटत नाही. डीपीआर फायनल करावा. एक्स्प्रेशन ऑफ इन्ट्रेस कॉल करावे. यात असे दिले की, वास्तविक खरेदीच्या वेळेस दरवाढ होऊ शकते. नेमके काय करीत आहे? कळत नाही. |
| श्री.दिलीप थोरात | :हे सर्व कारभार कोण चालविणार आहे? खाजगी ऑपरेटकडून चालविण्यास हरकत नाही. तसा प्रस्ताव मागवावा. सिटी बस घेऊन खाजगी ऑपरेटर कडून चालवू शकतो. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :यापूर्वी अकोला प्रवासी संघटना याचा अनुभव आला आहे. सर्व शक्यता पडताळून पहावी. डीपीआर तयार करावा. टप्प्याने हा प्रयोग करावा. स्मार्ट सिटीचा वृत्तपत्रातून आम्ही वाचतो. त्याची माहिती समोर येत नाही. |
| श्री.सचिन खैरे | :पर्यटनाच्या दृष्टीने औरंगाबाद दर्शन असा प्रस्तावही ठेवण्यात यावा. शासनाकडे पाठवावे. |
| मा.महापौर | :बस कोणत्या निधीतून खरेदी करणार आहे. सविस्तर प्रस्ताव एकत्रित करून सादर करण्यात यावा. उर्वरीत **सर्व ऐनवेळचे विषय मंजूर.** |

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत बस कोणत्या निधीतून खरेदी करणार आहे. यावर कोणाचे नियंत्रण असणार आहे. सर्व सविस्तर प्रस्ताव एकत्रित रित्या करून सादर करण्यात यावा.

**<u>विषय क्रमांक ११७६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रांतीचौक प्रभागातील क्रांतीचौक येथील झाशी राणी उद्यानामध्ये झाशी राणीचा पुतळा पूर्वीप्रमाणेच उभारण्यात यावा व त्यासोबतच त्या उद्यानात स्वामी रामानंदतीर्थ यांचा पुतळा उभारण्यात यावा. या पुतळा उभारणीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवून शासनाची प्रशासकीय मंजुरी घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करून प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाविण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर, श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य, श्री.कचरु छगनराव घोडके, श्री.दिलीप गंगाधर थोरात,

**अनुमोदक:-** श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड,श्री.राजगौरव हरिदास वानखेडे, श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप,

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीचौक प्रभागातील क्रांतीचौक येथील झाशीची राणी उद्यानामध्ये झाशीच्या राणीचा पुतळा पूर्वीप्रमाणेच उभारण्यास व त्यासोबतच या उद्यानात स्वामी रामानंदतीर्थ यांचा पुतळा उभारण्यास मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे पुतळा उभारणीसाठी शासनाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११७७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत स्थळ बदलाचा व लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.३६ अंतर्गत नारेगाव येथील दशमान गोसावी समाजाच्या स्मशान भूमीचा विकास करणे. SCR.No.४० | वॉर्ड क्र.३६ अंतर्गत नारेगाव स्मशान भूमी विकासीत करणे. SCR.No. | ५ लक्ष |
| २ | SCR-Ward-5, p.no.40. रुपये २०,००,०००/- मधून रुपये १०,००,०००/- वळती करून द्यावेत. | वॉर्ड क्र.३६ अंतर्गत ब्रिजवाडी येथील स्मशान भूमी विकसीत करणे. SCR.No. | ५ लक्ष |

**सुचक:-** श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-**श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र. ३६ येथे खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.३६ अंतर्गत नारेगाव येथील दशमान गोसावी समाजाच्या स्मशान भूमीचा विकास करणे. SCR.No.४० | वॉर्ड क्र.३६ अंतर्गत नारेगाव स्मशान भूमी विकासीत करणे. SCR.No. | ५ लक्ष |
| २ | SCR-Ward-५, p.no.४०. रुपये २०,००,०००/- मधून रुपये १०,००,०००/- वळती करून द्यावेत. | वॉर्ड क्र.३६ अंतर्गत ब्रिजवाडी येथील स्मशान भूमी विकसीत करणे. SCR.No. | ५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११७८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४ पडेगाव अंतर्गत शिवपूरी भागात अद्यापपर्यंत पिण्याचे पाण्याची पाईप लाईन टाकण्यात आलेली नाही. या भागात पाण्याची पाईप लाईन नसल्याने या भागातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. या भागात या भागातील नागरिकांसाठी मुलभूत सोई-सुविधासाठी पिण्याचे पाण्याची जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे. या कामासाठी अंदाजे रक्कम रुपये ३०.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे. करीता या कामासाठी दलित वस्ती सुधार योजने

अंतर्गत रक्कम रुपये ३०.०० लक्ष निधी उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुर करून निधी उपलब्धतेसाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-** श्रीमती मनिषा विनोद लोखंडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४ पडेगाव अंतर्गत शिवपूरी भागात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी टाकणेसाठीच्या कामासाठी रु.३०.०० लक्षचा निधी उपलब्ध होणे करीता प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११७९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४ पडेगाव अंतर्गत शिवपूरी भागात अद्यापपर्यंत रस्त्याचे काम करण्यात आलेले नाही. या भागातील रस्ते अत्यंत खराब झालेले असून पावसाळ्यात या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल निर्माण होऊन या परिसरातील नागरिकांची तसेच विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. या भागात मोठ्या प्रमाणात गरीब व मध्यमवर्गीय नागरिक राहतात. या भागात नागरिकांच्या सोईसाठी रस्त्याचे काम करणे आवश्यक आहे. रस्त्याचे काम करण्यासाठी या भागातील नागरिक वारंवार मागणी करीत आहेत. या भागातील नागरिकांसाठी मुलभूत सोई-सुविधा अंतर्गत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटींग करणे आवश्यक आहे. या कामासाठी अंदाजे रक्कम रुपये २०.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे. करीता या कामासाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रक्कम रुपये २०.०० लक्ष निधी उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुर करून निधी उपलब्धतेसाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-** श्रीमती मनिषा विनोद लोखंडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४ पडेगाव अंतर्गत शिवपूरी भागात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटींग करणेच्या कामासाठी र.रु.२०.०० लक्षचा निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११८०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४ अंतर्गत गरीब व हातावर काम करणारे कष्टकरी नागरिक मोठ्या प्रमाणात राहतात. या नागरिकांना मुलभूत सोई-सुविधा मागील बऱ्याच वर्षापासून मिळालेल्या नाहीत. या भागात ड्रेनेज लाईनची सुविधा नसल्याने नागरिकांना उघडयावर शौचास जावे लागत असून त्यामुळे या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. या नागरिकांसाठी मुलभूत सोई सुविधा ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक असून या कामासाठी रक्कम रुपये ०१.०० कोटी निधी आवश्यक आहे.

करीता, या वॉर्डातर्गत अन्सार कॉलनी, वाणीनगर, न्यु अन्सार कॉलनी, कासंबरी दर्गा व मिसबाह कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक असून या कामासाठी अल्पसंख्याक

निधीमधून रक्कम रुपये ०१.०० कोटी निधी उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-** श्रीमती ज्योती जयेश अभंग

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४ अंतर्गत अन्सार कॉलनी, वाणीनगर, न्यु अन्सार कॉलनी, कासंबरी दर्गा व मिसबाह कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी र.रु. ०१.०० कोटी अल्पसंख्याक निधीमधून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११८१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६१, मधील खालील कामे अल्पसंख्याक विकास योजना करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.६१ मधील रस्ते विकसीत करुन कॉंक्रेटींग करणे. | २० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.६१ अंतर्गत विविध गल्ल्यांत नवीन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | १५ लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.६१ अंतर्गत विविध ठिकाणी पोल व दिवे लावणे. | २० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.६१ कुशिनारा हौ.सोसायटी येथे विविध दैनंदिन मुलभूत सुविधा व देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | २० लक्ष |

**सुचक:-** श्री. जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी **अनुमोदक:-** श्री.खान फेरोज मोईनोद्दीन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६१, मध्ये खालील विविध विकास कामे करण्यासाठी अल्पसंख्याक विकास योजनेअंतर्गत निधी मिळण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.६१ मधील रस्ते विकसीत करुन कॉंक्रेटींग करणे. | २० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.६१ अंतर्गत विविध गल्ल्यांत नवीन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | १५ लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.६१ अंतर्गत विविध ठिकाणी पोल व दिवे लावणे. | २० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.६१ कुशिनारा हौ.सोसायटी येथे विविध दैनंदिन मुलभूत सुविधा व देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | २० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११८२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६१, मधील कुशिनारा हौसिंग सोसायटी व परिसर ही दलित वसाहत असून तसेच येथे मनपाचे अनेक गोरगरीब सफाई मजुर/मजुरीन राहतात. येथील खालील कामे दलित वस्ती सुधार योजना (विशेष अनुदान) अंतर्गत करण्यासाठी प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव पाठविण्यासाठी शिफारस करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामांचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.६१ कुशिनारा हौसिंग सोसायटी व परिसरातील रस्ते विकसीत करुन कॉंक्रेटींग करणे. | ५० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.६१ कुशिनारा हौसिंग सोसायटी व परिसरातील विविध गल्लयात नवीन मोठ्या व्यासाची व विविध आकाराची ड्रेनेज लाईन टाकणे. | ५० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.६१ कुशिनारा हौसिंग सोसायटी व परिसरातील विविध ठिकाणी पोल व दिवे लावणे आणि विद्युतीकरणाचे विविध नवीन व दुरुस्तीचे कामे करणे. | ३० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.६१ कुशिनारा हौसिंग सोसायटी येथे विविध दैनंदिन मुलभूत सुविधा व देखभाल दुरुस्तीचे कामे करणे. | २० लक्ष |

**सुचक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी **अनुमोदक:-**श्रीमती शेख समिना शेख इलियास
मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६१, मधील कुशिनारा हौसिंग सोसायटी व परिसर या दलित वसाहतींमध्ये दलित वस्ती सुधार योजना (विशेष अनुदान) अंतर्गत खालील विविध विकास कामे करण्यासाठी निधी प्राप्त होणेकरीता प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामांचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.६१ कुशिनारा हौसिंग सोसायटी व परिसरातील रस्ते विकसीत करुन कॉंक्रेटींग करणे. | ५० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.६१ कुशिनारा हौसिंग सोसायटी व परिसरातील विविध गल्लयात नवीन मोठ्या व्यासाची व विविध आकाराची ड्रेनेज लाईन टाकणे. | ५० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.६१ कुशिनारा हौसिंग सोसायटी व परिसरातील विविध ठिकाणी पोल व दिवे लावणे आणि विद्युतीकरणाचे विविध नवीन व दुरुस्तीचे कामे करणे. | ३० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.६१ कुशिनारा हॉऊसिंग सोसायटी येथे विविध दैनंदिन मुलभूत सुविधा व देखभाल दुरुस्तीचे कामे करणे. | २० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ११८३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चेतना नगर, रमाई वसाहत सर्वे नं.२१६ येथे त्या भागातील ५००० (पाच हजार) नागरीकांच्या सोयी सुविधांसाठी विपश्यना केंद्र गरीब मुला मुलींसाठी वाचनालय, व्यायामशाळा व अशोक स्तंभ उभारणे, संरक्षण भिंत, फर्निचर, संगणक प्रशिक्षण, केंद्रासाठी संगणक इत्यादी साहित्य उपलब्ध करणे इ.कामासाठी रु.२.५० कोटी सामाजीक न्याय विभाग, मंत्रालय मार्फत विशेष निधी उपलब्ध करून देणे बाबत शासनाकडे प्रस्ताव मंजुरीस्तव पाठविणे बाबत.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग

**अनुमोदक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे, श्रीमती सुनिता रामराव चव्हाण

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चेतना नगर, रमाई वसाहत सर्वे नं.२१६ येथे या भागात विपश्यना केंद्र, वाचनालय, व्यायामशाळा व अशोक स्तंभ उभारणे, संरक्षण भिंत, फर्निचर, संगणक प्रशिक्षण, केंद्रासाठी संगणक इत्यादी साहित्य उपलब्ध करणेसाठीच्या कामासाठी र.रु.२.५० कोटी सामाजीक न्याय विभाग, मंत्रालय मार्फत विशेष निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ११८४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती सुनिता सदाशिव ढेपले ह्या औरंगाबाद येथील रहिवाशी आहेत. त्या सध्या नाशिक महानगरपालिकेत सन २००८ पासुन वैद्यकीय विभागात एएनएम (आरोग्य सेविका) या पदावर रुपये ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० या वेतनश्रेणीत कार्यरत आहेत. त्यांचे कुटूंब औरंगाबाद येथे असल्याने त्यांना कुटुंबाची देखभाल करण्यात अडचणी येत आहेत. तरी त्यांची बदली नाशिक महानगरपालिके मधून औरंगाबाद महानगरपालिका येथे उपरोक्त नमुद पदावर अथवा समकक्ष पदावर करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे **अनुमोदक:-** श्री.रामेश्वर बाबुराव भादवे

मा.महापौर :विषय मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती सुनिता सदाशिव ढेपले ह्या सध्या नाशिक महानगरपालिकेत सन २००८ पासुन वैद्यकीय विभागात एएनएम (आरोग्य सेविका) या पदावर रुपये ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० या वेतनश्रेणीत कार्यरत आहेत. त्यांचे कुटूंब औरंगाबाद येथे असल्याने त्यांची बदली नाशिक महानगरपालिके मधून औरंगाबाद महानगरपालिका येथे उपरोक्त नमुद पदावर अथवा समकक्ष पदावर करण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ११८५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद शहरातील पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाकरीता एकुण रुपये ५,४५,४९,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीनुसार वॉर्डनिहाय विविध एजन्सीकडून कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने पथदिवे देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येत आहे.

मा.स्थायी समिती सभेचा विषय क्रमांक १८४ दिनांक ७/०४/२०१७ नुसार दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंत मुदतवाढ वाढीवखर्चासह रुपये ४,१९,५१,०००/- ला कार्योत्तर मान्यता घेण्यात आली आहे. कामाचा खर्च रुपये ५० लक्षच्या पुढे जात आहे. वाढीव खर्च विद्युत देखभाल दुरुस्ती (शहर व उद्याने) या लेखाशिर्षकातून करण्यात येईल. पथदिवे देखभाल दुरुस्तीचे काम अत्यावश्यक सेवेतील असल्याने दिनांक ३१/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढीसह रुपये ४,४५,००,०००/- च्या वाढीव खर्चास प्रशासकीय मान्यता तसेच कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीचे काम अत्यावश्यक सेवेतील असल्याने शहरातील पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीचे कामास दिनांक

३१/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढीसह रुपये ४,४५,००,०००/- च्या वाढीव खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११८६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई-सुविधांचा विकास करण्याच्या योजनेअंतर्गत रु.१५०/-कोटी (रुपये एकशे पन्नास कोटी) अनुदान (१००% अनुदान) मिळण्यासाठी शासनाकडे मागणी करण्यात आलेली असून त्यापैकी १०० कोटी अनुदान शासनाने मंजुर केलेले आहे. सदर मुलभूत सोई-सुविधांचा विकास करण्याच्या योजनेअंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण, कॉंक्रेटींग करणे व त्याच्याशी संबंधीत कामे करण्यात यावी व त्यासाठीची यापुर्वी रस्त्यांची यादी मंजुर केलेली आहे, ती यादी सुधारीत करण्यात येत असून, त्यानुसार ज्या रस्त्यांचा विकास करावायाचा आहे त्याची यादी सोबत जोडलेली आहे.

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई-सुविधांचा विकास करण्याच्या योजनेअंतर्गत सदरील रस्त्यांची कामे करण्यात यावीत व त्याप्रमाणे सोबतच्या यादीस मान्यता देऊन ती यादी शासनाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविणेकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे, श्री.गजानन भानुदास मनगटे, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड,
**अनुमोदक:-**श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी, श्री.कचरु छगनराव घोडके, श्रीमती निकाळजे आशा विजय
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई-सुविधांचा विकास करण्याच्या योजनेअंतर्गत शासनाकडून अनुदान मिळण्यासाठी मागणी करण्यात आल्यानुसार रु.१५०/- कोटी (रुपये एकशे पन्नास कोटी) (१००% अनुदान) पैकी मंजुर रु.१०० कोटी अनुदानामधून रस्त्यांच्या विकासांची कामे करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच सदर शासकीय अनुदानातून विकसीत करावयाच्या रस्त्यांच्या सुधारीत यादीस मान्यता देण्यात येऊन ठराव शासनाकडे पुढीलकार्यवाहीस्त पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**टिप:-**उपरोक्त यादीतील रस्त्यांच्या एकुण ५० कामांपैकी ज्या रस्त्यांच्या कामांस शासन अनुदान मिळणार नाही अशा रस्त्यांची कामे डिफर पेमेंट तत्वावर महानगरपालिका फंडातून करण्यात यावीत. महानगरपालिका फंडातून करावयाच्या डिफर पेमंट तत्वावरील रस्त्यांच्या कामांसाठी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात येते.

**रस्त्यांची यादी**

| SR. NO | ROAD NAME |
|---|---|
| 1 | Improvement & White Topping of Road From Chikhalthana Govt. Hospital To Chaudhari Colony |
| 2 | Improvement & White Topping of Road From Soham Motars Jalna Road To Mahalaxmi Chowk |
| 3 | Improvement & White Topping of Road From Shahu Nagar (Ramnagar Nagar) To Morya Mangal Karyalaya 12th Cidco Scheme via Vishranti Nagar & Sadhashiv Nagar |
| 4 | Improvement & White Topping of Road From Seven Hill To Azad Chowk To Chhatrapati Sambhaji Maharaj Chowk T.V Center |
| 5 | Improvement & White Topping of Road From Bajrang Chowk To Chistiya |

| SR. NO | ROAD NAME |
|---|---|
| | Colony |
| 6 | Improvement & White Topping of Road From Makai Gate To Bi-Bi Ka Makbara |
| 7 | Improvement & White Topping of Road From Nirala Bazar To A. M.C. Office Gate Vai Kahdkeshwar |
| 8 | Improvement & White Topping of Road From Peer Bazar To Janki Hotel Via Ekta Chowk Sutgirni Chowk |
| 9 | Improvement & White Topping of Road From Akashvani to Trimurti Chowk to Gajanan Maharaj Mandir & Trimurti Chowk to Chetak Ghoda |
| 10 | Improvement & White Topping of Road From Sevayojana Office To Bandu Vaidya Chowk |
| 11 | Improvement & White Topping of Road From MIT Collage To Khandoba Mandir Satara |
| 12 | Improvement & White Topping of Road From Santaji Police Chowki To Gangasagar Society Via Water Tank At Nakshatrawadi |
| 13 | Improvement & White Topping of Road From Itkheda Mahanagar Palika School to Nath Vally School |
| 14 | Improvement & White Topping of Road From Harsul Tea Point To Dr. Bhopale Home |
| 15 | Improvement & White Topping of Road From Jawahar Police Station To Savarkar Chowk |
| 16 | Improvement & White Topping of Road From Kamgar Chowk to High Court |
| 17 | Improvement & White Topping of Road From Jai Bhavani Chowk To Sainik Way Bridge |
| 18 | Improvement & White Topping of Road From Weekly Market Chikalthana To Sawangi By Pass Road |
| 19 | Improvement & White Topping of Road From Harsul Ward No. 1 Different Roads |
| 20 | Improvement & White Topping of Road From VIP Store to Pandariba & Aurangabad Book Store to Shani Mandir Anguri Bagh |
| 21 | Improvement & White Topping of Road From Hotel Panchwati To Kokanwadi |
| 22 | Improvement & White Topping of Road From Maharastra Distilleries To Blue Bells Residency |
| 23 | Improvement & White Topping of Road From Siddharth Chowk To Taj Hotel |
| 24 | Improvement & White Topping of Road From Sillekhana To Laxman Chawadi |
| 25 | Improvement & White Topping of Road From Dhoot Hospital To Murtujapur |
| 26 | Improvement & White Topping of Road From Ahilyadevi Holkar Chowk To Railway Track Vishranti Nagar |
| 27 | Improvement & White Topping of Road From Vijay Chowk To Kalikamata Mandir To Raj Corner |
| 28 | Improvement & White Topping of Road From Laximan Chavadi. Kailas Nagar To MGM Hospital |
| 29 | N1 Police Chowki To Prozhon Mall Corner |
| 30 | Improvement & White Topping of Road From Ajubai Mandir To Gade Hospital and Chhabda Tyre To Shradhha Hospital |

| SR. NO | ROAD NAME |
|---|---|
| 31 | Improvement & White Topping of Road From Azad Chowk To Bajarang Chowk |
| 32 | Improvement & White Topping of Road From Ekanath Rang Mandir To Guru Teg Bahadur School |
| 33 | Improvement & White Topping of Road From Azad chowk To A M.C. Office Gate Vai Ram Mandir Kiradpura |
| 34 | Improvement & White Topping of Road From Agrasen Chowk To Excise Office Road |
| 35 | Improvement & White Topping of Road From Hotel Amarprit Chowk To Shanurmiya Darga Ekta Chowk Via Savarkar Chowk |
| 36 | Improvement & White Topping of Road City Chowk to Paithan Gate |
| 37 | Improvement & White Topping of Road From Satish Nagre Home To Vanjari Mangal Karyalaya Hanuman Chowk |
| 38 | Improvement & White Topping of Road From Siddharath Chowk To MIT College (Via Tarun Bharat) |
| 39 | Improvement & White Topping of Road From Sangram Nagar Flyover To Pratap Nagar Samshanbhumi |
| 40 | Improvement & White Topping of Road From Shakil Medical Juna Bazar To Kileark |
| 41 | Improvement & White Topping of Road From Ambedkar Chowk To Misarwadi |
| 42 | Improvement & White Topping of Road From Mata Ramabai Ambedkar Entry Gate (Mauli Chowk ) To Ganga Bawadi , Mauli Chowk to nalla & ATM Road- Nandanvan colony |
| 43 | Improvement & White Topping of Road From Chausar Nagar To Shiv Mandir |
| 44 | Improvement & White Topping of Road From SBOA School To Ambika Nagar Bhagatsing Nagar |
| 45 | Improvement & White Topping of Road From Harsul Jail To Smruti Van |
| 46 | Improvement & White Topping of Road From Janki Hotel To Mehersing Naik School |
| 47 | Improvement & White Topping of Road From Hanuman Mandir Jai Bahavani Nagar To Zhenda Chowk |
| 48 | Improvement & White Topping of Road From Shahaganj Chaman To Nijjamuddin Darga |
| 49 | Improvement & White Topping of Road From Mahatma Phule Statue Aurangpura To Nehru Bhawan & Aurangapura Bhaji Mandi to Barudgar Nalla Juna Bazar |
| 50 | Improvement & White Topping of Road From Omkareshwar Chowk Ulkanagari to Sant Ekanath Hospital Khiwansara Vihar |

**टिप:-** उपरोक्त यादीतील रस्त्यांच्या एकुण ५० कामांपैकी ज्या रस्त्यांच्या कामांस शासन अनुदान मिळणार नाही अशा रस्त्यांची कामे डिफर पेमेंट तत्वावर महानगरपालिका फंडातून करण्यात यावीत. महानगरपालिका फंडातून करावयाच्या डिफर पेमेंट तत्वावरील रस्त्यांच्या कामांसाठी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात येते.

**विषय क्रमांक ११८७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पातील खालील काम रद्द करून प्रभागात आवश्यक असणारे दुसरे विकास कामे करणे बाबत स्थळ बदलाचा व लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | ०१ सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर झोन क्र.०६ पान क्र.५१ अनुक्रमांक ०१ वर वार्ड क्र.९१ जयभवानीनगर अंतर्गत नाल्यावर पुल बांधणे. रक्कम रुपये ४५.०० लक्ष | १. वॉर्ड क्र.९१ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे,पेव्हर ब्लॉक दुरुस्ती करणे तसेच इतर फुटकळ कामे करणे. रक्कम रुपये ४५.०० लक्ष. |

**सुचक:-**श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंडे **अनुमोदक:-**श्रीमती बबीता विजय चावरीया

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९१ येथे सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पातील खालील काम रद्द करून प्रभागात आवश्यक असणारे दुसरे विकास कामे करणे बाबत स्थळ बदलास व लेखाशिर्ष बदलास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | ०१ सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर झोन क्र.०६ पान क्र.५१ अनुक्रमांक ०१ वर वार्ड क्र.९१ जयभवानीनगर अंतर्गत नाल्यावर पुल बांधणे. रक्कम रुपये ४५.०० लक्ष | १. वॉर्ड क्र.९१ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे,पेव्हर ब्लॉक दुरुस्ती करणे तसेच इतर फुटकळ कामे करणे. रक्कम रुपये ४५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११८८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा वॉर्ड क्र.४६, नवाबपुरा अंतर्गत चंपाचौक ते हिंदी विद्यालय पर्यंत १०० फुट मुख्य रस्त्याचे काम त्वरीत सुरू करण्यात येणार आहे.

करीता, या रस्त्याचे काम सुरू करण्यापुर्वी भुमिगत गटार योजनेअंतर्गत चंपाचौक ते हिंदी विद्यालय पर्यंतच्या रस्त्यावर दोन्ही बाजुने जलनि:स्सारण वाहिनी टाकण्याचे काम त्वरीत करण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.खान फेरोज मोईनोद्दीन **अनुमोदक:-**श्रीमती खान सायरा बानो अजमल

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४६, नवाबपुरा अंतर्गत चंपाचौक ते हिंदी विद्यालय पर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुने भुमीगत गटार योजने अंतर्गत जलनि:स्सारण वाहिनी टाकण्याच्या कामास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ११८९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२६ मधील नेहरु नगर भागात रस्ते व ड्रेनेज लाईनची समस्या असल्याने रहिवासीयांना फार त्रास होत आहे. रस्ते खराब असल्याने रहिवासीयांना रहदारी तथा वाहतुकीस फार त्रास होत आहे. तसेच ड्रेनेज लाईन जुनी व जागो जागी खराब असल्याने वारंवार चोकअप होते व त्यातील घाण, मलमुत्रामुळे रहिवासीयांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.

सदरील परिसरात जास्त प्रमाणात अल्पसंख्यांक समाजाचे रहिवासी राहत असल्याने त्यांचे राहणीमान उंचाविण्यासाठी व दैनंदिन समस्यांचे निवारण करण्यासाठी खालील कामे अल्पसंख्यांक निधीतून करण्यासाठी मंजुर करून पुढील कार्यवाही प्रशासनाने तात्काळ करावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>कामांचे नाव:-</u>**

१. वॉर्ड क्र.२६ नेहरुनगर मध्ये विविध ठिकाणच्या रस्त्यांचे कॉंक्रेटींग करणे-रू.३० लक्ष
२. वॉर्ड क्र.२६ नेहरुनगर मध्ये विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे-रू.२० लक्ष

**सुचक:-**श्रीमती शेख नरगीस शेख सलीम **अनुमोदक:-**श्रीमती नसीम बी सांडू खॉं
मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२६ मधील नेहरुनगर येथे अल्पसंख्यांक निधीतून विविध भागात रस्त्याचे कॉंक्रेटिंग करण्याकरीता रु.३० लक्ष व विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याकरीता रु.२० लक्ष निधी उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ११९०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास करणे" या योजने अंतर्गत निधी मिळणे बाबत.

या निधी मधून वॉर्ड क्र.११३ अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करण्यासाठी रक्कम रुपये ५० लाखाचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड **अनुमोदक:-** श्री.रमेश भानुदास जायभाय
मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास करणे" या योजने अंतर्गत वॉर्ड क्र.११३ अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करण्यासाठी रक्कम रुपये ५० लाखाचा निधी उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ११९१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराची सध्याची लोकसंख्या १५ लक्ष इतकी आहे. शहरात जवळपास अडीच ते तीन लक्ष इतक्या मालमत्ता असून महापालिकेने कर आकारणी केलेल्या महापालिनगरपालिकेच्या रेकॉर्डवर असलेल्या मालमत्तांची संख्या २ लक्ष ३ हजार इतकी आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कराची एकूण मागणी ८४ कोटी असून, आज पर्यंतची थकबाकी रक्कम रुपये ३०६ कोटी इतकी आहे. प्रत्येक वर्षी थकबाकीची रक्कम वाढत जाते असा

अनुभव असून ३०६ कोटी रूपयांची मालमत्ता कराची थकबाकी वसुली करणे महानगरपालिकेपुढे मोठे आव्हान आहे.

वास्तविक पाहता शहराचा वाढता व्याप आणि शहरातील मालमत्तांची संख्या विचारात घेता, मालमत्ता कराच्या माध्यमातून महानगरपालिकेस ३५० ते ४०० कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे. परंतु अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने प्रत्येक मालमत्तेपर्यंत पोहचणे शक्य होत नाही. तसेच सन १९९९ नंतर मालमत्तांचे सर्वेक्षण तसेच पुनर्मुल्याकंन झालेले नाही. बहुतांश मालमत्तांमध्ये नव्याने बांधकामे झालेली असून बहुमजली इमारती झालेल्या आहेत. तथापि ह्या ठिकाणी असलेल्या मालमत्तांना आकारण्यात आलेला जुना मालमत्ता कर वसुल करण्यात येत आहे. तसेच शहरातील अनेक भागामध्ये नवीन बांधकाम झालेल्या बहुतेक मालमत्तांना कर आकारणी न झाल्यामुळे महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात महसुली उत्तन्न बुडत आहे.

त्याचप्रमाणे वसुलीच्या तुलनेत वसुलीवर होणा-या खर्चाचा आढावा घेतला असता, वसुलीसाठी (कर्मचारी वेतन, वाहनांवरील खर्च, स्टेशनरी, दिवाबत्ती इत्यादी) ८.५० ते ९.०० टक्के इतका खर्च होत आहे. जो वसुलीच्या तुलनेत अतिशय जास्त आहे. सध्यस्थितीत महापालिकेचा आस्थापना खर्च ३५ टक्के पेक्षा जास्त असल्यामुळे नवीन कर्मचारी भरती करता येत नाही.

वरील परिस्थितीचा विचार करता मालमत्ता कराचे उत्पन्न अतिशय कमी असून त्याचा विपरीत परिणाम शहराच्या विकासावर होताना दिसतो. मुख्यतः रस्ते, वीज, ड्रेनेज, पाणीपुरवठा यासारख्या नागरी सुविधा पुरविण्यासाठी पुरेशा निधी अभावी अडचणी निर्माण होत आहेत.

या परिस्थितीचा साकल्याने विचार करता, महापालिकेमध्ये एकूण मालमत्ता, नवीन मालमत्तांना कर निर्धारण करणे, विभागातर्फे तयार केलेले डिमांड बिल (मागणी देयक) वाटप करणे आणि थकबाकी व चालु मागणीचा मालमत्ता कराची वसुली करणे ही कामे करण्यासाठी सर्व्हिस प्रोव्हायडर (सेवा उपलब्ध करुन देणारी एजन्सी) ची नियुक्ती करणेसाठी देकार/ऑफर मागविणे करिता आवश्यक कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड,श्री. भाऊसाहेब उत्तमराव जगताप

**अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे,श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन

मा.महापौर :-प्रस्ताव मंजुर.नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिकेमध्ये एकूण मालमत्ता, नवीन मालमत्तांना कर निर्धारण करणे, विभागातर्फे तयार केलेले डिमांड बिल (मागणी देयक) वाटप करणे आणि थकबाकी व चालु मागणीच्या मालमत्ता कराची वसुली करणे ही कामे करण्यासाठी सर्व्हिस प्रोव्हायडर (सेवा उपलब्ध करुन देणारी एजन्सी) ची नियुक्ती करणेसाठी देकार/ऑफर मागविणे करिता नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ११९२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराची सध्याची लोकसंख्या १५ लक्ष इतकी आहे. शहराचा विस्तार झपाटयाने होत आहे. वाढती लोकसंख्या व वाढत्या वसाहती विचारात घेता शहरात कचरा देखील मोठया प्रमाणात निर्माण होत आहे. शहरातील कचरा उचलून डम्पींग ग्राउंड पर्यत वाहतुक करणे यासाठी रुपये ८५ ते ९० कोटी इतका वार्षिक खर्च येत आहे. तरीदेखील साफसफाईच्या संदर्भात नागरिक व स. सदस्यांच्या तक्रारी असल्याचे दिसून येते. प्रदुषणाचे प्रमाण

वाढल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा अनिष्ट परिणाम होतांना दिसतो. नागरिकांचे आरोग्य धोक्यात येते. प्रदुषणाच्या बाबतीत आपल्या शहराचा क्रमांक २९९ आलेला आहे, ही बाब आपल्यासाठी भूषणावह नक्कीच नाही. ही परिस्थिती बदलणे आवश्यक आहे.

शहरातील कचरा उचलण्यासाठी प्रतिटन जवळपास रु १४००/- इतका खर्च सध्या येत आहे. हा खर्च अपेक्षेपेक्षा जास्त आहे. महापालिकेची सध्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता कचरा वाहतुकीसाठी नवीन वाहने खरेदी करणे शक्य होत नाही.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, शहरात निर्माण होणारा कचरा उचलणे व कचऱ्याची संपूर्णपणे वाहतुक करणे ही कामे करण्यासाठी सर्व्हिस प्रोव्हायडर (सेवा उपलब्ध करुन देणारी एजन्सी) ची नियुक्ती करणेसाठी देकार/ऑफर मागविणे करिता आवश्यक कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप

**अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे, श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन

मा.महापौर :-प्रस्ताव मंजुर. नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात निर्माण होणारा कचरा उचलणे व कचऱ्याची संपूर्णपणे वाहतुक करणे ही कामे करण्यासाठी सर्व्हिस प्रोव्हायडर (सेवा उपलब्ध करुन देणारी एजन्सी) ची नियुक्ती करणेसाठी देकार/ऑफर मागविणे करिता नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११९२/१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अत्रिणी बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था औरंगाबाद यांनी अर्ज देऊन विनंती केलेली आहे की, महानगरपालिकेची बंद अवस्थेत असलेली एन-९, सिडको येथील शालेय इमारत संस्थेस भाडेतत्वावर मिळावी. या संस्थेमार्फत महापालिकेच्या बंद असलेल्या शालेय इमारतीमध्ये CBSE शाळा सुरू करीत असून ज्यामध्ये महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी काही प्रमाणामध्ये मनपा शाळेतील गरजु व गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याचा मानस आहे. महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना भौतीक सुविधा योग्य व तज्ञ शिक्षकाचे मार्गदर्शन याद्वारे मिळणार असल्याने मनपा शाळेच्या गरीब, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांच्या यशासाठी संस्थेमार्फत CBSE पॅटर्न नुसार दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा लाभ मिळणार आहे.

अनेक वर्षापासून महानगरपालिकेच्या बंद असलेल्या शाळेच्या इमारती विनावापर पडून असल्यामुळे त्यापासून कोणत्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नाही. उलट इमारतीच्या देखभाल दुरूस्ती अभावी इमारती जिर्ण अवस्थेत जात आहेत. या बाबी विचारात घेता, संस्थेच्या मागणीप्रमाणे आणि संस्थेतर्फे मनपा शालेय विद्यार्थ्यांना CBSE पॅटर्नचे शिक्षण मोफत दिले जाणार असल्याने तसेच शालेय इमारतींसाठी रेडीरेकनर दराप्रमाणे भाडे आकारणी करून एन-९ येथील बंद असलेली शालेय इमारत अत्रिणी बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था औरंगाबाद या संस्थेस नेहमीच्या अटीशर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके **अनुमोदक:-श्री.**राजु रामराव शिंदे

मा.महापौर :-प्रस्ताव मंजुर. नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अत्रिणी बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था औरंगाबाद या संस्थेच्या मागणी केल्यानुसार आणि संस्थेतर्फे काही प्रमाणात मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना CBSE पॅटर्नचे मोफत शिक्षण देण्याचे संस्थेकडून हमी घेऊन, शालेय इमारतींसाठी रेडीरेकनर दराप्रमाणे भाडे आकारणी करून एन-९ येथील बंद असलेली शालेय इमारत उपरोक्त संस्थेस नेहमीच्या अटीशर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११९२/२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील रस्ते विकसीत करण्यासाठी शासनाकडून येणाऱ्या निधीतून तसेच ५० कोटी डिफर्ड पेमेंटवर रस्ते विकसीत करण्यात येणार आहे. जुन्या औरंगाबाद शहरातील खालीलप्रमाणे रस्ते अत्यंत वर्दळीच्या तसेच रहदारीसाठी महत्वाचे असल्याने सदरील रस्त्यांचा डिफर्ड पेमेंट मध्ये करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या यादीत समावेश करून सदरील कामे तात्काळ सुरु करण्यासाठी मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**रस्ते :-**

१. पोलीस मेस ते कटकट गेट माजी उपमहापौर श्री.मुजीबशाह आलम खान यांच्या घरापर्यंत,
२. नेहरुभवन ते औरंगपुरा पाठक फोटो स्टुडिओ पर्यंत,
३. किराडपुरा राम मंदीर ते औरंगाबाद महानगरपालिका मुख्य कार्यालय टाऊन हॉल पर्यंत,
४. नवाबपुरा चौक ते मोंढा नाका पर्यंत.

**सुचक:-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन

**अनुमोदक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे, श्री.सिद्दीकी नासेर तकियोद्दीन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील रस्ते विकसीत करण्यासाठी शासनाकडून येणाऱ्या निधीतून तसेच ५० कोटी डिफर्ड पेमेंटवर विकसीत करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या यादीत खालील रस्ते समाविष्ट करून सदरील रस्त्यांची कामे सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते.

१. पोलीस मेस ते कटकट गेट माजी उपमहापौर श्री.मुजीबशाह आलम खान यांच्या घरापर्यंत,
२. नेहरुभवन ते औरंगपुरा पाठक फोटो स्टुडिओ पर्यंत,
३. किराडपुरा राम मंदीर ते औरंगाबाद महानगरपालिका मुख्य कार्यालय टाऊन हॉल पर्यंत,
४. नवाबपुरा चौक ते मोंढा नाका पर्यंत.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा:-**

श्री.नंदकुमार घोडेले :स्मार्ट सिटीचा वृत्तपत्रातून आम्ही वाचतो. त्याची माहिती समोर येत नाही. स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचा अहवाल दर महिन्याला येतो. त्याप्रमाणे स्मार्टसिटीचे माध्यमातून काय काम होते? प्रत्येक महिन्यात माहिती समोर यावी. ग्रीनफिल्ड रद्द करण्याच्या हालचाली सुरू असे वाचले. चिकलठाणा-नक्षत्रवाडी येथेही नाही. याची माहिती दर महिन्याच्या सभेत यावी.

कार्य.अभियंता-बीओटी :स्मार्टसिटी संदर्भात स्पेशल पर्पज व व्हकलचे नियोजन आले आहे. बोर्ड बैठक घेत आहेत. जे डीपीआर मान्य केला, त्या प्रस्तावावर कार्यवाही होत आहे. एप्रिल मध्ये सीएचटू ए एजन्सी फायनल झाली. आरएफडी तयार करीत आहे.

मा.आयुक्त :स्मार्ट सिटी मध्ये एक ग्रीनफिल्ड व दुसरे पॅन सिटी कॅम्प्युंटंट ग्रीन फिल्ड साठी चिकलठाणा भागात ५०० एकर जमिन शेतकरी यांचेशी चर्चा करून त्यांना प्लॉट वगैरे देऊन घ्यावी लागेल. तेथे टीपी स्कीम करावी लागेल व स्मार्ट व्हिलेज विकसीत करायचे आहे. पॅन सिटीमध्ये अर्बन ट्रान्सपोर्ट, आयसीचा, सॉलीड वेस्ट मॅनेजमेंन्टचे, ई-ऑफीस, लाईट कॉन्पयुंडट आहे. १७४० कोटीचा प्रकल्प, ग्रीन साठी ११४० व उर्वरीत पॅन सिटीसाठी आहे. ग्रीन सिटीसाठी टीपी स्कीम करावी लागेल. सभागृहाची मंजूरी होईल. त्यानंतर त्यास १८ महिन्याचा कालावधी लागेल. पॅन सिटीमध्ये अर्बन ट्रान्सपोर्ट व सॉलीड वेस्ट मॅनेजमेन्ट चा डीपीआर तयार करण्याचे एजन्सीला सांगितले. एजन्सी जबलपूर, इंदौरला जाऊन आली. काहींसाठी डीपीआर तयार करण्याची गरज नाही. जसे स्मार्ट ऑफिस, जसे सभागृहाचा हॉल सुंदर करू शकतो, कर्मचारी हजेरी फेस रिडींग कॅमेरेद्वारे घेऊ शकतो, आयपी फोन सर्वांना देऊ शकतो. ई-ऑफिस करू शकतो. ऑन लाईन इमारत परवानगी देऊ शकतो. हे सर्व बोर्ड संचालक यांची बैठक होईल त्यावेळी घेऊन जे डीपीआर विना तयार करू शकतो. त्या कामास सुरूवात होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :एजन्सी फायनल झाली का? वर्क ऑर्डर झाली का? प्रत्यक्ष काम केव्हा सुरू होणार आहे?

श्री.नंदकुमार घोडेले :नेमके काय काम स्मार्ट सिटीमध्ये होत आहे? सभागृहाला माहिती दिली पाहिजे.

मा.महापौर :स्वच्छ भारत अभियान जसा विषय येतो तसाच विषय स्मार्ट सिटी संदर्भातील माहितीचा यावा.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

.

दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - [४४]

## गुरुवार दिनांक २०.०७.२०१७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.

**स.पालिका सदस्या श्रीमती सिमा गणपत खरात (प्रभाग क्रमांक-२८)**

**प्रश्न क्रमांक ८५२:-**

६० लाख रुपये खर्च करून रस्ता स्वच्छतेसाठी जी मशीन खरेदी केली होती. ती सध्या कुठे आहे व आतापर्यंत किती रस्ते स्वच्छ केले?

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (वॉर्ड १,२,३ व ८), महानगरपालिका औरंगाबाद.**

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.३३४ दिनांक १८.१०.२०१३ अन्वये शहरातील प्रमुख रस्त्यांच्या साफसफाईसाठी स्विपींग मशिन खरेदी करण्याचे आदेश मा.सर्वसाधारण सभेने दिले आहेत. मजुरांद्वारे रस्त्यांची झाडाई करण्यास जास्तीचा वेळ लागत असल्यामुळे तसेच मजुरांद्वारे झाडाई केल्यास डस्ट (धुळ) उचलता येत नसल्यामुळे रोड स्विपींग मशिन खरेदी करण्याचे निर्देश मा.सर्वसाधारण सभा दिले होते. मा.सर्वसाधारण सभेच्या निर्देशा प्रमाणे सदरील मशिन जुलै-२०१५ पासुन रोड झाडाई व डस्ट क्लिनींगसाठी कार्यरत आहे. या स्विपींग मशिनद्वारे जालना रोड, जळगांव रोड, व्हीआयपी रोड, स्टेशन रोड, अदालत रोड इत्यादी प्रमुख रस्तयांची रात्रपाळीत रोटेशन पध्दतीने सफाई करण्यात येते. स्विपींग मशिन मध्ये धुळ ओढून घेतली जात असून, व्हॅक्युम सिस्टीम असल्यामुळे झाडाईद्वारे निघालेली डस्ट वाहनाच्या कंटेनर मध्ये ओढून घेतली जात असून दररोज सरासरी ६ ते ८ टन डस्ट उचलण्यात येत असल्यामुळे प्रमुख रस्त्यांवरील धुळीचे प्रमाण नियंत्रीत होण्यास मदत होत आहे.

या स्विपींग मशिनद्वारे दररोज सरासरी १० मजुरांचे, झाडाईचे काम केले जाते. तसेच रोड झाडाई नंतर निघालेला कचरा वाहनात भरण्यासाठी वेगळ्या मनुष्यबळाची आवश्यकता पडत नाही. स्विपींग मशिनद्वारे प्रमुख रस्त्याची झाडाई करतांना वाहतुकीला अडथळा होवु नये म्हणून ही मशिन रात्रपाळीत चालविण्यात येते. तथापी, पाऊस पडल्यानंतर ओल्या रस्त्यावरील धुळ स्विपींग मशिनच्या व्हॅक्युम सिस्टीमद्वारे ओढली जात नसल्यामुळे पाऊस असेल त्या दिवशी मशिन बंद ठेवावी लागते.

स्विपींग मशिनद्वारे रोटेशन पध्दतीने झाडाई करण्यात येत असलेले रस्ते खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | स्विपींग करण्यात आलेल्या रस्त्यांचा तपशिल |
|---|---|
| १. | सिडको बसस्टॅन्ड ते सिडको एन-७ रस्त्याच्या दोन्ही बाजु |
| २. | सिडको एन-७ ते जाधववाडी रस्त्याच्या दोन्ही बाजु |
| ३. | जाधववाडी ते हर्सुल टी पॉईन्ट रस्त्याच्या दोन्ही बाजु |
| ४. | हर्सुल टी पॉईन्ट ते अण्णाभाऊ साठे चौक रस्त्याच्या दोन्ही बाजु |
| ५. | अण्णाभाऊ साठे चौक ते मिलकॉर्नर रस्त्याच्या दोन्ही बाजु (सध्या हा रस्ता खराब झाल्यामुळे झाडाई बंद आहे.) |
| ६. | मिल कॉर्नर ते बाब पेट्रोल पंप रस्त्याच्या दोन्ही बाजु आणि बाबापंप ब्रिज |
| ७. | रेल्वेस्टेशन ते अहिल्याबाई होळकर चौक ते रस्त्याच्या दोन्ही बाजु |
| ८. | क्रांतीचौक ते अहिल्याबाई होळकर चौक ते रस्त्याच्या दोन्ही बाजु |

| | |
|---|---|
| ९. | बाबा पेट्राल पंप ते सतिश मोटर्स सिग्नल रस्त्याच्या दोन्ही बाजु |
| १०. | क्रांतीचौक ब्रिज पासुन मोंढानाका ब्रिज रस्त्याच्या दोन्ही बाजु |
| ११. | मोंढा नाका ब्रिजवरील चारही साईड आणि ब्रिज ते आकाशवाणी रस्त्याच्या दोन्ही बाजु |
| १२. | आकाशवाणी ते सेवनहील रस्त्याच्या दोन्ही बाजु आणि सेवनहील ब्रिजवरील चारही साईड |
| १३. | सेवनहील ते मुकूंदवाडी ब्रिज व मुकूंदवाडी ब्रिज वरील रस्त्याच्या चारही बाजु |
| १४. | मुकूंदवाडी ते धुत हॉस्पीटल रस्त्याच्या दोन्ही बाजु |
| १५. | धुत हॉस्पीटल ते चिकलठाणा रस्त्याच्या दोन्ही बाजु |

सदरील रोड स्विपींग मशिनद्वारे मागील दोन वर्षाच्या कालावधीत सर्वसाधारणपणे २५०० कि.मी. रस्त्यांची झाडाई करण्यात आली असून त्याद्वारे जवळपास ३००० टन डस्ट उचलण्यात आली आहे. नव्याने तयार होत असलेल्या कॉंक्रीट रस्त्यांच्या साफसफाईसाठी देखील या स्विपींग मशिनचा वापर अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

**प्रश्न क्रमांक ८५३:-**

शहरामध्ये एकुण किती मंगल कार्यालय आहेत? व किती मंगलकार्यालयांनी मनपाची एन.ओ. सी.घेतली आहे.

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक ८५४:-**

सिडको-हडको लोकवस्तीमध्ये जे मोबाईल टॉवर आहे त्यापैकी किती जणांनी मनपाची परवानगी घेतली आहे? व परवानगीचे निकष काय आहेत?

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे देण्यात आलेल्या मोबाईल टॉवर परवानगीची यादी व मोबाईल टॉवर करीताच्या नियमावलीची प्रत यासह जोडून देण्यात येत आहे.

**प्रश्न क्रमांक ८५५:-**

सिडको-हडको मध्ये किती खाजगी दवाखाने आहेत? त्यापैकी किती जणांनी मनपाची परवानगी घेतली आहे? दवाखान्यामधील कचऱ्याचे वर्गीकरण कसे केले जाते? व कचरा उचलण्याचे काम सध्या कोणती कंपनी करते?

**उत्तर:- आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.**

सिडको-हडको मध्ये एकुण ११० रुग्णालय/नर्सिंग होम असून सदरील नोंदणी औरंगाबाद महानगरपालिकेकडे करण्यात आलेली आहे.

सदरील रुग्णालय/नर्सिंग होममधील निर्माण होणाऱ्या जैविक कचऱ्याची विल्हेवाट औरंगाबाद महानगरपालिकेने नेमलेल्या कंत्राटदारामार्फत (मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस) कलर कोड बॅगमध्ये वर्गीकरण करून संकलित केली जाते व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट पाटोदा शिवार येथील प्रकल्पात केली जाते.

**स.पालिका सदस्य श्री.नितीन दशरथ साळवी (प्रभाग क्रमांक-७४)**

**प्रश्न क्रमांक ८५६ ते ८५८:-**

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्रश्न क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ८५६ | महानगरपालिका औरंगाबाद नगर रचना | सोबत यादी जोडण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | विभागामार्फत जुन-२०१७ पर्यंत किती रेखांकन मंजुर झालेले आहेत? त्याची गट नंबर, सर्व्हे नंबर, सी.टी.एस.नंबर, मिळकत धारकाचे नाव व दिनांक यांची यादीसहीत सविस्तर माहिती देणे. | |
| ८५७ | रेखांकन मंजुर करतांना अंतर्गत रस्ते, खुली जागा, यांचे क्षेत्र, महापालिकेच्या नावे झाल्याशिवाय (सातबारा) किती रेखांकन मंजुर केले? सातबारा नावे न करता अंतीम रेखांकन मंजुर केले असतील ते कोणत्या अधिकरान्वये केले? असे किती प्रकरणे आहेत? त्याची मंजुरी (प्रशासनाची) घेतली काय? असे किती प्रकरणे आहेत? त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी. | या बद्दलची माहिती संकलीत करण्यात येत आहे. संकलीत करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर माहिती देण्यात येईल. |
| ८५८ | रेखांकन मंजुर करतांना व स्वतंत्र भुखंडावर बांधकाम परवानगी मंजुर करतांना त्याजागेला मंजुर करण्यात आलेला पोच रस्ता सार्वजनिक वापराचा आवश्यक आहे का? असल्यास पोच रस्त्याचे क्षेत्र मनपाच्या नावाने हस्तांतरीत करणे बंधनकारक आहे का? असल्यास हस्तांतरीत प्रकरणांची यादी देणे आवश्यक असल्यास पोच रस्त्याचे क्षेत्र मनपाकडे हस्तांतरीत न करता किती रेखांकने मंजुर केलेले आहेत? केले असल्यास कायदेशीर तरतुदींची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. | रस्ता सार्वजनिक असून आवश्यक आहे. |

दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.